
ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४५ अंक ९ पाने ५६ एप्रिल २०१८ मूल्य २२रु.



## ईशान्य भारत

ईशान्येकडील राज्यांबाबतचा आर्थिक दृष्टिकोन
- मंजुला वधवा

बांबू मिशन - आर्थिक उत्कर्षासाठीचे एक साधन
- निरेंद्र देव

भारताच्या विकासाला गती देणारी कृत्रिम बुध्दिमत्ता
- डॉ. अविक सरकार

(विशेष लेख)
पूर्वोत्तर क्षेत्र आणि प्रशासनासमोरील आव्हाने
- नरेशचंद्र सक्सेना

(फोकस)
ईशान्य भारतातील कौशल्यविकास
- इबु संजीब गर्ग

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




### जाहिरात दर पत्रक

| | |
|---|---|
| ब्लॅक अँड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अँड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्‌जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने ७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केंद्रीय सदन, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ बी, ७०१ सी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिद्ध केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४५ ❖ ❖ अंक ९ ❖ ❖ एप्रिल २०१८ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**
संपादक
**उमेश उजगरे**
मुखपृष्ठ
**गजानन धोपे**

## अनुक्रमणिका


- ईशान्य भागाच्या विकासातील आव्हाने आणि मार्ग - सी. के. दास ५
- ईशान्येकडील राज्यांबाबतचा आर्थिक दृष्टिकोन - मंजुला वधवा १०
- मुख्य प्रवाहात ईशान्य भारत -एस.जे. चिरु १७
- पूर्वोत्तर क्षेत्र आणि प्रशासनासमोरील आव्हाने (विशेष लेख) -नरेशचंद्र सक्सेना २१
- ईशान्य भारतातील कौशल्यविकास (फोकस) - इबु संजीब गर्ग २७
- शिक्षणासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद - शालींदर शर्मा आणि डॉ शशीरंजन झा ३२
- बांबू मिशन - आर्थिक उत्कर्षासाठीचे एक साधन - निरेंद्र देव ३५
- ईशान्य भारत: सद्यस्थिती व आव्हाने - डॉ. विजय गायकवाड ३९
- ईशान्येतील महिलांना मुख्य प्रवाहात आणताना - डॉ. शैलेंद्र चौधरी, मिहीन डोलो आणि डिम्पल एस. दास ४३
- भारताच्या विकासाला गती देणारी कृत्रिम बुद्धिमत्ता - डॉ. अविक सरकार ४८


## सूचना

**'योजना'** हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाश विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजना मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मते-विचार त्या-त्या लेखकांची असतात. सरकार किंवा लेखक कार्यरत असलेल्या संस्था त्या मतांशी/विचारांशी सहमत असतीलच असे नव्हे. लेखांमध्ये वापरण्यात आलेले नकाशे/ध्वज हे केवळ प्रातिनिधिक आहेत. राजकीय नकाशा तसेच भारताचा अथवा अन्य देशाचा राष्ट्रध्वज म्हणून ते न्यायालयीन बाबींसाठी ग्राह्य नसतील. स्पर्धा परीक्षा पुस्तक प्रकाशक तसेच मार्गदर्शक संस्थाच्या योजना मासिकातील जाहिरातींमध्ये केलेल्या दाव्यांची वाचकांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अशा जाहिरातींमधील मजकुराबाबत 'योजना' कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. योजना मासिकातील मजकुराचे लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत:पुन:प्रकाशन किंवा पुन: प्रसारण तसेच 'योजना' मासिकाच्या नावाचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करण्यास मनाई आहे.

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

संपादकीय

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# ईशान्येला संजीवनी देताना

जेव्हा आपण ईशान्येचा विचार करु लागतो तेव्हा काझीरंगाचे गेंडे, मेघालयातील काळे ढग, बांबूपासून बनवलेल्या वस्तू सुंदर हातमागावर विणलेले कापड ऑर्चिड आणि महत्त्वाचे म्हणजे चहाचे मळे डोळयासमोर उभे राहतात. आपल्या पूर्वीच्या शाळा महाविद्यालयात आपल्यासोबत शिकायला असलेली ईशान्येकडील मुले-मुली ही आठवतात.

पण केवळ सुंदर पर्यटन स्थळे विस्मयकारक सुंदर हस्तकलेच्या वस्तू आणि तिथले मैत्रीपूर्ण लोक म्हणजे ईशान्य नव्हे. या भागाला स्वत:चे असे स्वतंत्र अस्तिव आहे. त्याच्या वैशिष्टयपूर्ण भौगोलिक स्थानामुळे ते भारताच्या मुख्य भूभागापासून अलग झाले आहे. ईशान्येकडील सात भगिनी आणि सिक्कीम यांचे एक स्वतंत्र अस्तिव आणि संस्कृती विकसित झाली आहे आणि ती उर्वरित भारतापासून वेगळी आहे. सर्व नियोजनाच्या विषयात आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम, नागालँड, अरुणाचल प्रदेश, मणीपूर, आणि सिक्कीम या आठ राज्यांचा स्वतंत्र विचार केला जातो. यामुळे हा विभाग हा देशातील इतर भागांहून भिन्न आणि असाधारण धरला जातो.

भौगोलिकदृष्टया अलग असल्याने आणि वेगळा समजला गेल्याने हा विभाग दुर्लक्षित आहे. आणि अनेक क्षेत्रातील विकासात मागे राहिला आहे. शेतीचे कमी उत्पन्न, बँकांकडून कर्जाचा कमी पुरवठा मोठया औद्योगिक क्षेत्राची वानवा, पायाभूत सुविधांचा अभाव या सर्वांमुळे समावेशक वाढीमध्ये अडथळा निर्माण झाला आहे. ईशान्य भारताच्या समतोल आणि समांतर विकासासाठी सरकार अनेक पावले उचलत आहे. Act East या धोरणाला सत्यात आणण्यासाठी विद्यमान सरकार विशेष भर देत आहे. यामुळे या भागात विशेष आशा निर्माण झाली आहे.

मेघालयातील मेंढीपठार ते आसाममधील गुवाहाटी यासाठी रेल्वेमार्गाची योजना, ONGC त्रिपुरा कंपनीच्या युनिट-२ विद्युत प्रकल्पाचे देशार्पण, भारतातील सर्वात मोठया लांबीच्या पुलाची (९.१५km) आसाममधील ढोला साडिया येथे उभारणी, IIT गुवाहाटीची कोलशिला बसवून कामाला सुरुवात इत्यादी मुळे ईशान्येकडील विकासाचा वेग वाढला आहे.

ईशान्य भारतासंबंधीच्या अर्थसंकल्पातील तरतूद ही आता वाढली आहे. आता ती साधारण ४८००० कोटी रुपये इतकी आहे.

शेती हेच ईशान्य भारतासाठी अजूनही चरितार्थासाठी मुख्य साधन आहे. मात्र शेतीचे कमी उत्पादन आणि पारंपारिक झूम इत्यादी लागवडीच्या पध्दतींमुळे या प्रदेशात अजूनही उदरनिर्वाहाचा प्रश्न भेडसावतो आहे. या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी सरकारने राष्ट्रीय बांबू मिशनची पुनर्रचना केली आहे.

दळणवळणाच्या सोयींचा अभाव हा या प्रदेशाच्या विकासात मोठा अडथळा आहे. रेल्वे आणि रस्ते याव्दारे असलेले निकृष्ट दळणवळण आणि अत्यंत कमी असलेले हवाई दळणवळण यामुळे अर्थव्यवस्था अत्यंत मंदावली आहे.

सरकारने आता पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली आहे. एकंदर ५८८६ कोटी या चार वर्षात या भागातील रेल्वचे जाळे सुधारण्यासाठी दिले आहेत. नवीन रस्ते, पूल इ. तील गुंतवणुकीसाठी २०१४-२०१९ या वर्षांसाठी दोन लाख कोटीची तरतूद केली आहे. या भागातील ५० विमानतळांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी रु. १०१४ कोटींची तरतूद केली आहे. यामुळे ईशान्य भारताचे देशातील इतर भागांशीच नव्हे तर म्यानमार, भूतान, बांगलादेश या सारख्या शेजारी राष्ट्रांशीही दळणवळण सुधारणार आहे. सध्या चालू असलेल्या विद्युत प्रकल्पांसाठी १२९२ कोटी राखून ठेवले आहेत तर नव्याने विकसित होणाऱ्या सौर उर्जा प्रकल्पांसाठी २३४ कोटीची वाढीव तरतूद केली आहे.

शिक्षणाच्या आणि कौशल्य विकासाच्या सोयींचा अभाव असल्याने तरुण वर्ग हा प्रदेश सोडून इतर राज्यातील संस्थांमध्ये प्रवेश घेत आहे. या प्रदेशात नोकऱ्यांची कमतरता असल्यानेही नोकरीच्या शोधात तरुण स्थलांतरित होत आहेत. रोजगार निर्माण मिशन आसाम राज्य उपजीविका मिशन, मेघालय राज्य कौशल्य विकास सोसायटी इत्यादी कौशल्य विकासाच्या योजना सुरु झाल्याने ईशान्य भारतातील तरुणांना नवीन क्षेत्रे खुली होत आहेत. यामुळे अर्थातच स्थलांतरित होण्याची गरज राहात नाही.

या प्रदेशातील महिला पूर्वीपासूनच दबून राहिलेल्या आहेत. स्वमदत गटांची निर्मिती इत्यादी सुधारणांमुळे या भागातील महिलांच्या सबलीकरणाला मदत झाली आहे. NERCOMP अर्थात ईशान्य भारत पठारी भाग समाज संसाधन व्यवस्थापन योजना व नैसर्गिक संसाधने व्यवस्थापन गट इत्यादीमुळे या सबलीकरणाला चालना मिळत आहे.

ईशान्य भारताला भारतातील राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत सामील करुन घेण्यासाठी आणि ईशान्येकडील समाजाच्या सर्व स्तरांच्या विकासासाठी हे प्रयत्न नव्याने चालू आहेत. ईशान्येकडील लोक हे विकास दृष्टया वा सांस्कृतिक दृष्टया देशातील इतर भागातील लोकांहून वेगळे धरले जाणार नाहीत हे यातून साध्य होत आहे.

■■■

मिमांसा

# ईशान्य भागाच्या विकासातील आव्हाने आणि मार्ग

सी. के. दास



**ईशान्येकडच्या राज्यांमधला फक्त तीस ते पस्तीस टक्के भाग सखल किंवा सपाट जमिनींचा आहे, तो ही बहुतेक करुन ब्रम्हपुत्रा, बराक आणि इंफाळ यांच्या तीन खोऱ्यांमध्ये विभागला आहे. उरलेला सर्व भाग डोंगराळ आहे. ईशान्येकडच्या सुमारे तीन चतुर्थांश भागाचे भूनोंदविषयक सर्वेक्षण अजूनही बाकी आहे. या मोठ्या प्रमाणावरच्या असर्वेक्षित जमिनीबाबत व्यक्तिगत मालकी हक्क स्पष्ट करणाऱ्या योग्य आणि प्रमाणिकृत नोंदी अजूनही उपलब्ध नाहीत.**

भारत देशाच्या ईशान्य भागातल्या प्रदेश किंवा ईशान्येकडच्या राज्यांमध्ये अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा या आठ राज्यांचा समावेश होतो. या सर्व राज्यांचा मिळून भौगोलिक प्रदेश २,६२,१७९ वर्ग किलोमीटर्स इतका होतो. देशातल्या राजस्थान, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र यांसारख्या मोठ्या राज्यांपेक्षा ईशान्येच्या राज्यांचे क्षेत्रफळ खूप कमी आहे. सिलीगुडी जवळच्या चिंचोळ्या भागाने (चिकन-नेक या नावाने सामान्यत: ओळखल्या जाणाऱ्या भागाने) ईशान्येकडची राज्ये देशाशी जोडली गेली आहेत. हा प्रदेश पाच वेगवेगळ्या देशांशी जोडलेला आहे. बांग्लादेश, भूतान, चीन, नेपाळ आणि म्यानमार या पाच देशांच्या सीमा ईशान्य भारताला जोडून आहेत. ईशान्येकडच्या राज्यांमधला फक्त तीस ते पस्तीस टक्के भाग सखल किंवा सपाट जमिनींचा आहे, तो ही बहुतेक करुन ब्रम्हपुत्रा, बराक आणि इंफाळ यांच्या तीन खोऱ्यांमध्ये विभागला आहे. उरलेला सर्व भाग डोंगराळ आहे. ईशान्येकडच्या सुमारे तीन चतुर्थांश भागाचे भूनोंदविषयक सर्वेक्षण अजूनही बाकी आहे. या मोठ्या प्रमाणावरच्या असर्वेक्षित जमिनीबाबत व्यक्तिगत मालकी हक्क स्पष्ट करणाऱ्या योग्य आणि प्रमाणिकृत नोंदी अजूनही उपलब्ध नाहीत.

ईशान्येकडच्या राज्यांच्या एकूण क्षेत्रफळाचा विचार करता, गेल्या शतकाच्या सुरुवातीला या भागाची लोकसंख्या अभावितपणे प्रमाणाबाहेर वाढल्याचे दिसून येते. सन १९०१ मध्ये जेव्हा संपूर्ण भारताची लोकसंख्या २९ कोटी इतकी होती तेव्हा ईशान्य भारताची लोकसंख्या ४४ लाख होती. सन २०११ मध्ये भारताची लोकसंख्या १५६ कोटी (यामधे भारताची लोकसंख्या १२१ कोटी अधिक पाकिस्तानची १८ कोटी अधिक बांग्लादेशची १७ कोटी लोकसंख्या एकत्र केली आहे कारण १९०१ मध्ये हे तीन वेगळे देश म्हणून अस्तित्वात आलेले नव्हते. त्यामुळे सन १९०१ मधली भारताची लोकसंख्या याचा अर्थ आताच्या या तीन देशांची मिळून बनलेल्या भागाची लोकसंख्या) मात्र ईशान्य भारताची लोकसंख्या वाढून २०११ मध्ये ४५० लाख झालेली दिसते. यावरुन असे दिसून येते की १९०१ ते २०११ या कालावधीत भारताची लोकसंख्या ५.४ इतक्या पटीने वाढली मात्र ईशान्य भारताची लोकसंख्या दहापटीपेक्षाही जास्त वाढली. आजूबाजूच्या प्रदेशातून ईशान्य भारतात येणाऱ्या

स्थलांतरीतांचे प्रमाण इतके वाढले आहे की या भागाची सरासरी भूधारण क्षमता फक्त १ हेक्टर इतकीच राहिली आहे.

या भागात अत्यंत जास्त प्रमाणात पडणारा पाऊस आणि जगातली सगळ्यात मोठी नदी ब्रुम्हपुत्रा आणि तिच्या सत्तरहून अधिक उपनद्यांचे ईशान्य भारतातले अस्तित्व यांच्या उल्लेखाशिवाय ईशान्य भारताचे चित्र संपूर्णपणे स्पष्ट होणे अशक्य आहे. ईशान्य भारतात सरासरी वर्षाला अडीच हजार मिलीमीटर इतका पाऊस पडतो. ब्रम्हपुत्रा नदीचा आकार लक्षात घेतला तर त्या मानाने तिथे खोरे चिंचोळे आहे. मोठ्या प्रमाणावर पडणारा पाऊस, ब्रम्हपुत्रा आणि बराक नद्यांची मोठी नदीपात्रे आणि चिंचोळी, अरुंद खोरी यांमुळे ईशान्य भारतात नेहमीच भयानक पूर, जमिनीची मोठ्या प्रमाणावर झीज, दरडी कोसळणे, अनेक ठिकाणी वाळूचे थर जमा होणे यांसारख्या नैसर्गिक आपत्ती येत असतात. या कारणांनी अनमोल अशा सुपीक शेतजमिनीच्या बऱ्याचशा भागांचे नुकसान होते आणि परिणामी या भागाच्या सरासरी भूधारण क्षमतेत आणखीन घसरण होत जाते.

आतापर्यंतच्या नोंदींनुसार असे दिसते की १९५० मध्ये आसामला ८.५ रिश्टर क्षमतेचा जो मोठा भूकंप झाला, त्यानंतर तिथे पूर येण्याचे आणि जमिनीची झीज होण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. आतापर्यंत पाच ते सहा हजार वर्ग किलोमीटर इतक्या क्षेत्रफळाची नद्यांच्या प्रवाहामुळे धूप झाली आहे. यामुळे राज्यातले लाखो लोक बेघर आणि भूमिहीन झाले आहेत. जमिनीची धूप आणि दरडी कोसळणे यामुळे बाधित झालेल्या ईशान्येकडच्या भूमिहीन जनतेचे पुनर्वसन करणे आणि जमिनीची धूप या संकटाला राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून मान्यता देणे आणि या आपत्तीने बाधित जनतेला नुकसानभरपाई मिळवून देणे ही या भागातल्या जनतेची अत्यावश्यक गरज आहे.

या सर्व नैसर्गिक तसेच स्थलांतरासारख्या मानवनिर्मित आपत्तीला तोंड द्यावे लागत असून

---

**ईशान्य भारतात सरासरी वर्षाला अडीच हजार मिलीमीटर इतका पाऊस पडतो. ब्रम्हपुत्रा नदीचा आकार लक्षात घेतला तर त्या मानाने तिथे खोरे चिंचोळे आहे. मोठ्या प्रमाणावर पडणारा पाऊस, ब्रम्हपुत्रा आणि बराक नद्यांची मोठी नदीपात्रे आणि चिंचोळी, अरुंद खोरी यांमुळे ईशान्य भारतात नेहमीच भयानक पूर, जमिनीची मोठ्या प्रमाणावर झीज, दरडी कोसळणे, अनेक ठिकाणी वाळूचे थर जमा होणे यांसारख्या नैसर्गिक आपत्ती येत असतात.**

---

सुध्दा देशाच्या विभाजनाच्या काळात ईशान्य भागाची आर्थिक परिस्थिती उर्वरित देशासारखीच होती. मात्र सन १९४७ पासून ईशान्य भारताला खालील प्रमुख ऐतिहासिक घटनांना सामोरे जावे लागले. या घटनांनी ईशान्य भागाचे स्वरुप अंतर्बाह्य बदलून टाकले आणि अनेक क्षेत्रांमधील या भागाच्या विकासाची गती मंदावली. या घटना खालीलप्रमाणे आहेत:-

a) देशाची फाळणी:-

फाळणीमुळे ईशान्य भागाला उर्वरित देशाशी जोडणारे मुख्य रस्ते, रेल्वेमार्ग आणि नद्यांमधून जलमार्गाने होणारी वाहतूक हे सर्व दळणवळणाचे मार्ग अचानक बंद झाले.

b) सन १९६२ मध्ये झालेले चिनी आक्रमण:-

सन १९६२ मधे चिनी सैन्याने अरुणाचल प्रदेशावर (त्या काळात हा प्रदेश नेफा म्हणून ओळखला जात होता) आक्रमण केले आणि काही काळाने ते मागे घेतले. यामुळे लगेच ईशान्य भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यापेक्षा काही काळा वाट बघावी, पुन्हा आक्रमणाचा धोका उद्भवत नाही ना, याचा अंदाज घ्यावा असा विचार काही मोठ्या खाजगी गुंतवणुकदारांमध्ये निर्माण झाला. हे बरोबर की चूक हा वादाचा मुद्दा बाजूला ठेवला तरी त्याकाळात मोठी गुंतवणूक थांबल्यामुळे ईशान्य भागाचा विकास मंदावला आणि प्रगती खुंटली हेच खरे.

c) सन १९७१ मधला बांग्लादेश मुक्ती संग्राम:-

या मुक्ती संग्रामाच्या काळात बांग्लादेशमधून कोट्यवधी निर्वासितांनी ईशान्य भारताच्या काही राज्यांमधे प्रवेश केला. यातले बहुसंख्य निर्वासित नंतर बांग्लादेशात परत गेले असले तरीही बांग्लादेशच्या सीमेजवळच्या ईशान्य भारताच्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसंख्येच्या प्रमाणात बदल झाल्याचे लक्षात येते. गेल्या शतकात सत्तरच्या दशकाच्या शेवटापासून आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मणिपूर या राज्यांमधे बंडाळीचा मोठा प्रश्न निर्माण झाला. आताच्या मिझोराम आणि नागालँड या भागात गेल्या शतकात पन्नास आणि साठच्या दशकात बंडाळीमुळे विकाससंबंधीच्या

समस्या निर्माण झाल्या. त्यानंतर अर्थातच केंद्र आणि राज्य सरकारने विविध उपाययोजना केल्यामुळे बंडाळी हा या भागात आता तितकासा चिंतेचा विषय राहिलेला नाही.

गेल्या चार दशकांमधे सक्षम अधिकाऱ्यांसमोर शरण आलेल्या हजारो स्थलांतरीतांचे पुनर्वसन करण्याच्या कामामुळे त्याचा परिणाम ईशान्य भागावर झाल्याशिवाय राहिला नाही.

ईशान्य भारतात स्थानिक नागरिकांची लोकसंख्या तीन कोटींपेक्षा कमीच असेल. तरी ज्या गटात वीस हजार पेक्षा कमी सदस्यसंख्या आहे असे शंभर गट अस्तित्वात आहेत. असे अनेक पूर्वीपासूनचे गट दुर्लक्षित राहिले आहेत.

आपण आधी बघितलेल्या नैसर्गिक आणि इतिहासातल्या आव्हानांखेरीज ईशान्य भारतातल्या प्रजेला अजून काही महत्वाच्या आव्हानांना सामोरे जावे लागते.

a) कमी कृषी उत्पादन (सुमारे २००० किलो तांदूळ प्रति हेक्टर) तांदूळ हे या प्रदेशातील मुख्य पीक आहे.

b) पिकांची कमी तीव्रता (सुमारे १.५)

c) सिंचन क्षेत्राचे कमी प्रमाण

d) रासायनिक खतांचा कमी वापर

e) बँकांकडून कमी कर्जपुरवठा. ईशान्य भागात कर्ज आणि ठेवी यांचे गुणोत्तर पन्नास टक्क्यापेक्षा कमी आहे.

f) या भागातल्या सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण वर्षभर कुठल्याही भागात लागवडीची चांगल्या दर्जाची अवजारे आणि प्रमाणित बियाणांची कमतरता

g) छोटी गोदामे, मोठी साठवणाची गोदामे, शीत गोदामे इत्यादी सोयींची कमतरता

h) काही ठिकाणची अपवादात्मक उदाहरणे वगळता उर्वरित भागात उत्तम आधुनिक, सुसज्ज बाजाराची किंवा मंडीची अनुपलब्धता

**मुक्ती संग्रामाच्या काळात बांग्लादेशमधून कोट्यवधी निर्वासितांनी ईशान्य भारताच्या काही राज्यांमधे प्रवेश केला. यातले बहुसंख्य निर्वासित नंतर बांग्लादेशात परत गेले असले तरीही बांग्लादेशच्या सीमेजवळच्या ईशान्य भारताच्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसंख्येच्या प्रमाणात बदल झाल्याचे लक्षात येते. गेल्या शतकात सत्तरच्या दशकाच्या शेवटापासून आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मणिपूर या राज्यांमधे बंडाळीचा मोठा प्रश्न निर्माण झाला.**

i) राष्ट्रीय सरासरी वीज वापराचा विचार करता तुलनेत अत्यंत कमी दरडोई वीज वापर

j) सिंचनासाठी विजेचा वापर करण्याचे कमी प्रमाण

k) औद्योगिक दृष्ट्या उपयुक्त अशा लोह, ॲल्युमिनियम, तांबे, जस्त, कथील, निकेन तसेच शिसे यासारखे धातु आणि अभ्रक, गंधक यासारख्या वस्तुंच्या खाणींची अनुपलब्धता

l) चांगल्या दर्जाच्या कोळशाच्या मोठ्या साठ्याची कमतरता. ईशान्य भारतात मिळणाऱ्या कोळशात गंधकाचे प्रमाण जास्त असल्यामुळे हा कोळसा औद्योगिक वापरासाठी निरुपयोगी आहे.

m) अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि नर्सिंग इत्यादी शाखांच्या शिक्षणासाठी पॉलिटेक्निक आणि मोठ्या संस्था ईशान्य भारतात संख्येने कमी आहेत.

n) ईशान्य भारतामध्ये शिक्षकांसाठी प्रशिक्षण हा मोठा मुद्दा आहे. या प्रदेशातल्या एकूणच शिक्षणाचा सामान्य दर्जा सुधारण्याकडे तातडीने लक्ष द्यायला हवे या भागातल्या शाळांमध्ये गणित आणि शास्त्र शिकवण्यासाठीचा दर्जा सुधारण्यासाठी काही पावले लवकरच उचलायला पाहिजेत.

o) चार तेल शुध्दीकरण आणि दोन खनिज तेल कंपन्या हे वगळता कोणत्याही मोठ्या उद्योगांची उभारणी या भागात झालेली नाही.

आसाम आणि ईशान्येच्या इतर भागांमधे रेल्वेमार्ग, चहाचे मळे, तेल आणि तांदूळ यांच्या फॅक्टरींची उभारणी गेल्या शतकापासूनच झालेली आहे, हे खरच आहे. गेल्या काही दशकांमधे ईशान्येकडच्या राज्यांमध्ये रस्ते, रेल्वे तसेच हवाई वाहतूक आणि दूरसंचार क्षेत्रांद्वारे संपर्क क्षेत्रांमधे लक्षणीय सुधारणा झाली आहे. गेल्या दोन दशकांमध्ये या भागात अनेक नव्या विद्यापीठांची, वैद्यकीय महाविद्यालयांची आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांची स्थापना झाली आहे. ईशान्येत आता भारतीय

तंत्रज्ञान संस्था (IIT) आणि भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) यांची देखील स्थापना झालेली आहे.

या भागातल्या व्यक्तींचे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरी दरडोई उत्पन्नाच्या सत्तर टक्के आहे. इथले साक्षरतेचे प्रमाण मात्र राष्ट्रीय साक्षरता प्रमाणाच्या (७४.०४) साधारणत: बरोबरीने म्हणजे ७४.४८ इतके आहे.

वर चर्चा केलेल्या आव्हानांमुळे स्वातंत्र्यानंतर सात दशकांनी देखिल ईशान्य भारत तुलनेने मागासलेलाच राहिला आहे. या भागातल्या मोठ्या उत्पादक आणि औद्योगिक कंपन्यांच्या अभावामुळे या भागाचे भविष्य प्रामुख्याने खालील क्षेत्रांच्या विकासावर अवलंबून आहे.

a) उद्यानविद्या आणि पुष्पवर्धन शाखांसह संपूर्ण कृषीक्षेत्र

b) दुग्धोत्पादन उद्योग

c) शेळीपालन उद्योग

d) डुक्करपालन उद्योग

e) कुक्कुटपालन उद्योग

f) बदक पालन उद्योग

g) मत्स्यपालन उद्योग

h) अन्न आणि मांस प्रक्रिया उद्योग

i) पर्यटन व्यवसाय

j) रेशीम उत्पादन, विणकाम आणि हातमाग तसेच वस्त्रोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी धाग्यांचे उत्पादन आणि वस्त्रांच्या पध्दतीत अधिक सुधारणा

k) सेंद्रीय चहा, सेंद्रिय अन्न, मशरुम आणि मधाचा उत्पादन व्यवसाय

l) दिब्रुगडच्या ब्रम्हपुत्रा क्रॅकर आणि पॉलिमर्स लिमिटेड या कंपनीने उत्पादित केलेल्या कमी, जास्त घनतेच्या पॉलिइथिलीन पासून प्लॅस्टिकच्या वस्तूंचे उत्पादन

m) मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या बांबू, बेत, ज्यूट, भाताची तुसे आणि औषधी वनस्पतींवर आधारीत लघु आणि मध्यम उद्योगांची उभारणी

n) स्थानिक पातळीवर मुबलक प्रमाणात उपलब्ध आले आणि हळद यांच्या दर्जात सुधारणा आणि पॅकेजिंगसाठी उद्योग यंत्रणा विकसित करणे

**गेल्या काही दशकांमधे ईशान्येकडच्या राज्यांमध्ये रस्ते, रेल्वे तसेच हवाई वाहतूक आणि दूरसंचार क्षेत्रांद्वारे संपर्क क्षेत्रांमधे लक्षणीय सुधारणा झाली आहे. गेल्या दोन दशकांमध्ये या भागात अनेक नव्या विद्यापीठांची, वैद्यकीय महाविद्यालयांची आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांची स्थापना झाली आहे. ईशान्येत आता भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) आणि भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) यांची देखील स्थापना झालेली आहे.**

o) स्थानिक नद्या आणि झऱ्यांमध्ये उपलब्ध असलेल्या मोठ्या पाणीसाठ्याचा वापर जलविद्युत निर्मितीसाठी आणि सिंचन सुविधा पुरवण्यासाठी करणे

p) वस्त्रनिर्मिती, औषध निर्माण उद्योग, कागद निर्मिती आणि साखर निर्मिती यांच्यासाठी उद्योगांची उभारणी करणे (मोठ्या प्रमाणातले पर्जन्यमान आणि मातीतील आर्द्रतेचे जास्त प्रमाण या दोन्ही गोष्टी ईशान्य भारतात ऊस, डाळी, तेलबिया आणि ऑर्किडसारख्या महागड्या फुलांच्या उत्पादनासाठी पोषक ठरतात.

q) व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, नर्सिंग, निमवैद्यकीय औषधनिर्माण शास्त्र शिकवणाऱ्या संस्था, रोहित्र दुरुस्तीचे आणि टीव्ही, वातानुकूलित यंत्रे, वॉशिंग मशिन, वाहने, फ्रिज, यासारख्या वस्तूंच्या दुरुस्तीचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची पुरेशा प्रमाणात स्थापना करणे

ईशान्य भाग सांस्कृतिक दृष्ट्या खूप संपन्न आहे आणि या प्रदेशातल्या युवकांमधे संगीत, नृत्य आणि चित्रकला इत्यादींमधे प्रचंड प्रतिभाशक्ती आहेत. जर या भागात गायन, नृत्य आणि संगीताशी संबंधित विविध वाद्ये वाजवणे शिकवणाऱ्या शाळा पुरेशा प्रमाणात उभारल्या गेल्या तर स्थानिक युवकांना या क्षेत्रात रोजगार उपलब्ध होतील.

वर उल्लेख केलेल्या क्षेत्रांमध्ये जर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली आणि पिकांच्या उत्पादनाची तीव्रता जर २ ते २.५ पट वाढली तर या भागातल्या स्थानिक रहिवाशांना पुरेशा प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. विविध बँकांच्या शाखांच्या संख्येत वाढ आणि कर्ज तारण आणि ठेव यांच्या गुणोत्तरात वाढ या गोष्टी सुध्दा ईशान्य भागात करणे गरजेचे आहे. ईशान्येतल्या लोकांमधे संपूर्ण आर्थिक आणि आधुनिक डिजिटल जीवन राहणीमानाचा अंतर्भाव करण्यासाठी तातडीने या भागात दूरसंचाराद्वारे संपर्क सुधारण्याची गरज आहे.

सध्या ईशान्य भागाचा सर्वसमावेशक विकास होण्यासाठी केंद्र सरकारने अनेक कौतुकास्पद पावले उचलली आहेत. 'ॲक्ट इस्ट पॉलिसी'ला सत्यात आणण्यासाठी केंद्राने हाती घेतलेल्या नवनवीन प्रभावी उपायांमुळे ईशान्येतल्या लोकांच्या मनात खूप आशेचे किरण निर्माण झाले आहेत. ईशान्य भारताची कवाडे देशाच्या उर्वरित भागाला आणि आग्नेय आशियातील देश तसेच बांग्लादेश, नेपाळ, भूतान यांच्यासाठी खुली करायची असतील तर या भागाला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्रीय आणि संपन्न बनवावे लागेल. वर दिलेल्या देशांना ईशान्य भारतातील राज्यांशी रस्ते, रेल्वेमार्ग, नद्यांद्वारे आणि हवाई मार्गांनी जोडल्यामुळे आपोआपच या दोघांमध्ये माणसांची, मालाची, तंत्रज्ञानाची आणि आधुनिक तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण वाढीला लागेल. वर उल्लेख केलेल्या सर्व परदेशामधल्या नागरिकांसाठी ईशान्य भारताच्या सर्व राज्यांमधे धार्मिक, पर्यावरणीय, साहसी आणि आरोग्य पर्यटनाच्या सुविधा आणि त्यासाठीच्या सोयीची व्यवस्था करता येईल. या प्रकारच्या पर्यटनाला प्रोत्साहन देण्यामुळे ईशान्य भागातले नागरिक आणि वर उल्लेख केलेल्या विविध देशांमधले ईशान्य भारताला लागून असणारे प्रदेश यांच्या दरम्यानचे सांस्कृतिक आणि शैक्षणिक नातेसंबंधांमधे सुधारणा होईल.

विकासाचे फायदे सर्व लाभार्थ्यांपर्यंत योग्य आणि न्याय प्रमाणात पोहोचावेत यासाठी ईशान्येतल्या स्थानिक, पूर्वापारपासून तिथे राहणाऱ्या विविध गटांसाठी विशेष आणि तातडीच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. प्रसार माध्यमांमधे अशा बातम्या आल्या आहेत की ईशान्येतल्या अनेक स्थानिक गटांपैकी ११ गटांच्या भाषा आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. कारण या भाषा बोलणाऱ्या दहा हजारपेक्षा कमी व्यक्ती सध्या जिवंत आहेत. विकासाच्या प्रक्रियेतून काही लहान आणि दुर्लक्षित स्थानिक गट टाळले किंवा वगळले जात नाहीत ना? याकडे विशेष लक्ष द्यायला हवे.

ईशान्येमधले प्रदूषणविरहित वातावरण आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व

**ईशान्य भारताची कवाडे देशाच्या उर्वरित भागाला आणि आग्नेय आशियातील देश तसेच बांग्लादेश, नेपाळ, भूतान यांच्यासाठी खुली करायची असतील तर या भागाला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्रीय आणि संपन्न बनवावे लागेल. वर दिलेल्या देशांना ईशान्य भारतातील राज्यांशी रस्ते, रेल्वेमार्ग, नद्यांद्वारे आणि हवाई मार्गांनी जोडल्यामुळे आपोआपच या दोघांमध्ये माणसांची, मालाची, तंत्रज्ञानाची आणि आधुनिक तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण वाढीला लागेल.**

असलेल्या युवकांची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता यामुळे या भागात इलेक्ट्रॉनिक उद्योग आणि बीपीओ उभारण्याचा निर्णय घेणे राज्यकर्त्यांना अत्यंत सोपे आहे.

या भागामधली तीव्र बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी काही उपाय अमलात आणता येतील. उदाहरणार्थ रेल्वे, राष्ट्रीयीकृत बॅंका, केंद्रीय निम-लष्करी दलात (यात आसाम रायफल्स देखिल येतात), विमान कंपन्या, तेल शुध्दीकरण केंद्र आणि इतर मोठ्या केंद्र सरकारने अधिग्रहीत केलेल्या संस्था या सर्व ठिकाणी ईशान्य भारतातल्या युवकांना नोकरी देण्याचे प्रमाण वाढवता येईल.

शेवटी काय, तर ईशान्य भारतातल्या लोकांना कृषी, उद्योग आणि व्यवसाय या सर्वच क्षेत्रांमधे विकास साधण्यासाठी काही विशेष सुविधा उपलब्ध करुन देताना काही गोष्टींसाठी तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे. वनजमीन नसलेल्या भागाचे भूमापन सर्वेक्षण, जमिनीच्या नोंदी अद्ययावत करणे, संबंधित जमीन कायद्यातल्या तरतुदींनुसार सर्व पात्र व्यक्तिंना जमिनीच्या मालकीचे हक्क देणे यासारख्या जमीनविषयक सुधारणा केल्यामुळे विकासाबरोबरच सर्व पात्र नागरिकांना जमीनविषयक समान हक्क मिळतील.


■■■

*लेखक आसाम राज्याचे माजी अतिरिक्त मुख्य सचिव असून ईशान्य भारत परिषदेचे विद्यमान सदस्य आहेत. त्यांनी आसाम आणि मेघालय राज्यामध्ये सनदी अधिकाऱ्याच्या रुपात अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.*

email : ck.das09@gmail.com

# ईशान्येकडील राज्यांबाबतचा आर्थिक दृष्टिकोन

**मंजुला वधवा**



**इंडिया स्पेन्ड रीसर्चच्या संशोधनानुसार मेघालयची आर्थिकवाढ ही देशातील मोठे राज्य असलेल्या मध्यप्रदेशहून अधिक आहे. मध्य प्रदेशची वाढ ९.५ टक्के तर मेघालयची ९.७ टक्के आहे. अरूणाचल प्रदेशची वाढ ही गुजरातपेक्षा अधिक आहे. एकट्या कर्नाटकात १२.९ दशलक्ष लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत तर सगळ्या ईशान्येत मिळून १२.८ दशलक्ष लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. त्रिपुरा मध्ये बेरोजगारीचा दर सर्वात अधिक आहे.**

ईशान्येकडील सात बहिणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या राज्यात शेजारी सिक्कीमचाही समावेश होतो. या राज्यांना आपल्या देशात वेगळे स्थान आहे. त्याचे कारण त्यांची सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय , भौगोलिक तसेच ऐतिहासिक वैशिष्ट्ये वेगळी आहेत. त्रिपुरा व मिझोराम ही आपल्या देशातील जास्त साक्षरता असलेली राज्ये आहेत. आसामचा चहा उद्योग चीननंतर जगात दुसरा मानला जातो. आसाममध्ये आशियातील पहिली तेल विहीर दिग्बोईला सुरू झाली. सध्या जर आपण या ईशान्येकडील राज्यांचे चित्र बघितले तर इंडिया स्पेन्ड रीसर्चच्या संशोधनानुसार मेघालयची आर्थिकवाढ ही देशातील मोठे राज्य असलेल्या मध्यप्रदेशहून अधिक आहे. मध्य प्रदेशची वाढ ९.५ टक्के तर मेघालयची ९.७ टक्के आहे. अरूणाचल प्रदेशची वाढ ही गुजरातपेक्षा अधिक आहे. एकट्या कर्नाटकात १२.९ दशलक्ष लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत तर सगळ्या ईशान्येत मिळून १२.८ दशलक्षलोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. त्रिपुरा मध्ये बेरोजगारीचा दर सर्वात अधिक आहे. तेथील शहरी भागात २५.२ टक्के बेरोजगारी आहे. नागालँड मध्ये २३.८ टक्के बेरोजगारी आहे. ही आकडेवारी २०११-१२ मधील आहे. या सर्व आठ राज्यांचा औद्योगिक क्षेत्रातील वाटा हा वाढला असून कृषी व इतर क्षेत्रातील वाटा घटला आहे. ईशान्येकडील राज्यात ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात बेरोजगारी अधिक आहे. ते देशातील कल बघता त्याच्याशी जुळणारे आहे. येथील दारिद्र्याचा विचार केला तर मणिपूर सर्वात गरीब तर सिक्कीम सर्वात श्रीमंत राज्य आहे. वसाहतवादी काळापासून ईशान्येकडील भाग हा आर्थिक वाढीतील असमानतेचा साक्षीदार आहे. ब्रिटीशांसाठी ईशान्येकडील राज्ये म्हणजे कोळसा, नैसर्गिक वायू,वने व चहा यासारख्या कच्च्या मालाचे कोठार होते. ही सगळी साधनसंपत्ती ब्रिटीशांनी वापरली. ती देशाच्या इतर भागात प्रक्रियेसाठी पाठवली. या भागाला कधीच फायदा झाला नाही याचे कारण ब्रिटिशांनी येथे प्रक्रिया व उत्पादन केंद्रे सुरू केली नाहीत. या भागातील वाहतूक व दळणवळण सुविधांकडे लक्ष दिले गेले नाही. फाळणीनंतर बांगलादेशबरोबरचा व्यापार थांबला होता. त्यामुळे त्या भागाचे आर्थिक नुकसान झाले. उर्वरित देश व ही राज्ये यांच्यात दरी पडत गेली. अलिकडच्या काळात चित्र सुधारत आहे. भारतातील सरासरी परिस्थितीपेक्षा या राज्यांची

कामगिरी तुलनेने चांगली आहे. स्त्री व पुरूष यांचा मनुष्यबळ विकास निर्देशांक चांगला आहे. पण आर्थिक वाढ मात्र चांगली नाही. आता याचा जरा खोलात जाऊन विचार केला तर त्यामागची काही कारणे दिसून येतात.

**भौगोलिक घटक-** यात ईशान्येकडे सत्तर टक्के पर्वतीय प्रदेश आहे. त्यात तीस टक्के जनता सामावलेली आहे. तीस टक्के पठारी प्रदेश आहे. त्यात सत्तर टक्के लोकसंख्या सामावलेली आहे. या प्रदेशांकडे जाण्याचे मार्ग दुर्गम आहेत. कारण त्याला भौगोलिक परिस्थिती जबाबदार आहे. उर्वरित भारताशी त्यांचा वाहतूक संपर्क नीट नाही. या भागात पूर व दरडी कोसळणे हे प्रकार ब्रह्मपुत्रा व आसामच्या बराक खोऱ्यात नेहमी होतात. त्यामुळे आसामच नव्हे तर ईशान्येकडील सर्वच राज्यांना आर्थिक दबावास तोंड द्यावे लागते.

**पायाभूत सोयींचा अभाव-** या राज्यांच्या आर्थिक मागासलेपणाचे पायाभूत सोयींचा अभाव हे एक कारण आहे. ईशान्येकडील राज्ये रस्ते, जलमार्ग, ऊर्जा यात मागे आहेत. सामाजिक व शैक्षणिक संस्थांचे जाळे कमी आहे. आरोग्य सुविधांचा अभाव आहे. ईशान्येकडे राष्ट्रीय मार्ग केवळ ६ टक्के तर राष्ट्रीय महामार्ग केवळ १३ टक्के आहेत. रस्त्यांचा दर्जाही चांगला नाही. कोंडी असलेले रस्ते, खंडित वीजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची कमतरता यामुळे ही राज्ये मागे पडली आहेत.

**औद्योगिक वाढीला मर्यादा-** स्वातंत्र्याच्यावेळी आसाममध्ये थोडेसे औद्योगिक क्षेत्र होते. त्यात वसाहतवादी भांडवलदारांचे वर्चस्व होते. चहाची लागवड व उत्पादन यांचा त्यात समावेश होता. काही प्रमाणात कोळसा खाणी, तेल व तेल शुद्धीकरण कारखाने,प्लायवूड उत्पादन व वन उत्पादने यांचाही भाग त्यात होता. स्वातंत्र्यानंतर आसाममध्ये उद्योग राहिलेच नाहीत. कारण देशाच्या उर्वरित भागाशी त्याचा संपर्क तुटत गेला. त्यामुळे गुंतवणूक झाली नाही. नैसर्गिक संपदा हा येथील औद्योगिक विकासाचे बलस्थान होऊ शकतो. यात राष्ट्रीय जलविद्युत महामंडळ. गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड (गेल) ऑइल अँड नॅचरल गॅस कार्पोरेशन यांचा मोठा सहभाग आहे. झाडे पाडण्यावर बंदी आल्याने जंगल उत्पादनांशी संबंधित काही उद्योग बंद पडले. १९९५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने वृक्षतोडीला बंदी केली होती. स्थानिक भांडवल, विपणन, वाहतूक यात अनेक अडचणी आहेत. त्यामुळे या भागाचा औद्योगिक विकास झाला नाही. चहा उद्योग येथे जुनाच आहे. तो विसाव्या शतकाच्या प्रारंभी सुरू झाला. आसाममध्ये तो एक उत्पादन उद्योग आहे. पण त्यामुळे मुख्य प्रवाहातील आसामी लोक व तेथील मजूर याच्यात संघर्ष आहे. त्यात आरोग्य व इतर लाभाच्या मुद्द्यांचे प्रश्न आहेत.

**स्वातंत्र्याच्यावेळी आसाममध्ये थोडेसे औद्योगिक क्षेत्र होते. त्यात वसाहतवादी भांडवलदारांचे वर्चस्व होते. चहाची लागवड व उत्पादन यांचा त्यात समावेश होता. काही प्रमाणात कोळसा खाणी, तेल व तेल शुद्धीकरण कारखाने,प्लायवूड उत्पादन व वन उत्पादने यांचाही भाग त्यात होता. स्वातंत्र्यानंतर आसाममध्ये उद्योग राहिलेच नाहीत. कारण देशाच्या उर्वरित भागाशी त्याचा संपर्क तुटत गेला. त्यामुळे गुंतवणूक झाली नाही.**

**कृषी-** येथील आदिवासी लोकांचे कृषी हे उपजीविकेचे साधन आहे. सर्व राज्यांमध्ये कृषीचे स्वरूप वेगवेगळे आहेत. आंतरपिके वेगळी आहेत. भात हे या भागातले खरीपाचे महत्वाचे पीक आहे तर रब्बीमध्ये इतर पीके आहेत त्यात गहू, बटाटे, उस, डाळी व तेलबिया यांचे प्रमाण जास्त आहे. ईशान्येकडील भागात देशाच्या एकूण अन्नधान्य उत्पादनापैकी दीड टक्का उत्पादन होते. त्यातून सत्तर टक्के लोकसंख्येला उपजीविका मिळते. पूर्व व ईशान्येकडील राज्यात कृषी क्षेत्राची वाढ उर्वरित देशाच्या मानाने कमी आहे. हरित क्रांती ही वायव्येकडील राज्यांपुरती मर्यादित आहे. त्याचा ईशान्येला काही फायदा झाला नाही. एकूणच ईशान्येचे शेती उत्पादन अजूनही पारंपरिक आहे. पाटबंधारे सुविधा नाहीत. खतांचे प्रमाण फार कमी आहे. ईशान्येकडे झूम ही लागवड पद्धत वापरली जाते. एकूण सतरा लाख  हेक्टर क्षेत्रात जंगलतोड झाल्याने मातीची धूप झाली व तिची सुपीकता कमी होत गेली.

**नैसर्गिक स्त्रोत-** माती, पाणी, हिरवा भाजीपाला, हायड्रोकार्बन यांच्या रूपात ईशान्येकडे मोठी साधनसंपत्ती आहे. पण तरी तो भाग अविकसित राहिला कारण साधनसंपत्तीचे गैरव्यवस्थापन होऊन ते कमी होत गेले. तेथील जैवविविधताही धोक्यात आली आहे. नैसर्गिक स्त्रोतांचे कमी होणे हे खाणकाम, खत उद्योग, कागद उद्योग, सिमेंट उद्योग व अतिरेकी कारवाया यामुळ घडून आले आहे.

**वाहतूक व दळणवळण-** ईशान्येकडे या दोन्ही क्षेत्रात परिस्थिती वाईट आहे. रस्त्यांचा विकास फार कमी वेगाने सुरू आहे. त्याला काही भौगोलिक, सामाजिक, आर्थिक कारणेही आहेत. पंचवार्षिक योजनेत या भागातील रस्त्यांसाठी फार कमी तरतूद झाली आहे. फाळणीनंतर या भागाचे आर्थिक व इतरही नुकसान झाले. तेथे वस्तू खूप महाग मिळतात. वाहतूक सुविधा नसल्याने या भागाचा विकास कमी झाला आहे, भारताच्या रेल्वेच्या जाळ्यापैकी केवळ ४ टक्के रेल्वे सुविधा या भागात आहेत. नवीन बोंगायगावच्या पूर्वेला रेल्वेचे जाळे आहे पण ते मीटरगेज असल्याने अपुरे आहे. जीवनावश्यक वस्तू. पोलाद, सिमेंट, अन्नधान्य यांच्या वाहतुकीची सोय अपुरी आहे. जागतिकीकरण हे मोठे आव्हान या भागात आहे, ॲक्ट इस्ट धोरणामुळे भारताच्या पश्चिमी धोरणात बदल होऊन ते पूर्वकेंद्री होऊ लागले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करणे ईशान्येच्या राज्यांना जड जात आहे.

**सामाजिक असंघटन-** सामाजिक असंघटन हा एक समस्येचा मुद्दा आहे. समाजात उत्पादक प्रेरक घटकांचा अभाव असल्याने अशा क्षमता विहिन समाजात सांस्कृतिक भांडवलाचा अभावा जाणवतो. समाजाचे राहणीमान हे त्या समाजाला पेलण्यापेक्षाही जास्त उंचीचे असेल तर त्याचे आर्थिक विघटन होते. व त्यामुळे त्याची ओळख हरवली जाते. शिक्षण व्यवस्था येथे पूर्णपणे अपयशी आहे. अनेक कुटुंबातील लोकांनी मुलांना बाहेरच्या राज्यातील शाळात घातले आहे. यात धोरण लकवाही आहे. ब्रेन ड्रेनची समस्याही आहे.

अंमलीपदार्थांची नशा हा आणखी एक धोका आहे. येथील ३० टक्के युवक अंमली पदार्थांच्या आहारी गेले आहेत. एचआयव्ही, व एडस यांचे प्रमाण मणिपूर, नागालँड, मिझोराममध्ये वाढत आहे. ती चिंतेची बाब मानली जाते. १९७१ मध्ये भारत सरकारने ईशान्य मंडळाची स्थापन केली होती त्यात आठही राज्ये सदस्य होती. त्याचे मुख्यालय शिलाँगला होते. त्याचे काम ईशान्य भारत मंत्रालयाकडून चालते. सुरूवातीला ते सल्लागार मंडळ स्वरूपात होते, २००२ मध्ये त्याला नियोजन मंडळाची मान्यता मिळाली. ईशान्येकडील महत्वाच्या प्रश्नांवर या मंडळात चर्चा होते. ईशान्य विकास आर्थिक महामंडळ लिमिटेड ही संस्थाही स्थापन झाली आहे. त्यातून लघु, सूक्ष्म, मोठ्या उद्योगांना अर्थपुरवठा होतो. ईशान्य कृषी बाजार महामंडळ लिमिटेड , सिक्कीम, खाण महामंडळ लिमिटेड, ईशान्य हातमाग व हस्तकला विकास महामंडळही कार्यरत आहे.

**ईशान्येकडील भागात देशाच्या एकूण अन्नधान्य उत्पादनापैकी दीड टक्का उत्पादन होते. त्यातून सत्तर टक्के लोकसंख्येला उपजीविका मिळते. पूर्व व ईशान्येकडील राज्यात कृषी क्षेत्राची वाढ उर्वरित देशाच्या मानाने कमी आहे. हरित क्रांती ही वायव्येकडील राज्यांपुरती मर्यादित आहे. त्याचा ईशान्येला काही फायदा झाला नाही. एकूणच ईशान्येचे शेती उत्पादन अजूनही पारंपरिक आहे. पाटबंधारे सुविधा नाहीत. खतांचे प्रमाण फार कमी आहे. ईशान्येकडे झूम ही लागवड पद्धत वापरली जाते.**

ईशान्य विकास मंत्रालय हे सप्टेंबर २००१ मध्ये सुरु करण्यात आले. त्यात केंद्र सरकार हे मध्यवर्ती भूमिकेत आहे. सामाजिक आर्थिक विकासाच्या मुद्द्यावर त्यात भर दिला आहे. केंद्रीय मंत्रालये व आठ राज्ये यांच्यातील संवाद अडथळे दूर करण्याचा हेतू यात आहे. पायाभूत सुविधा व गुंतवणुकीतील अडथळ दूर करून. शिक्षण, वाहतूक, वीज, दळणवळण व आरोग्य या विषयांवर हे मंत्रालय काम करते. तेथील वीज क्षेत्रात एनइसीने मोठी भूमिका पार पाडली. रस्ते विकास, जलमार्ग यात एनइसीने मोठी भूमिका पार पाडली आहे. एनइसी स्थापन होण्यापूर्वी तेथील लागवडीखालचा भाग १२ टक्के होता. त्यामुळे कृषी उत्पादनांची मागणी व पुरवठा यात तफावत होती पण आता परिस्थिती बदलत आहे. उच्च दर्जाचे बियाणे ही आता समस्या राहिली नाही. पाटबंधारे, वाहतूक यातील गैरसोयी दूर होत आहेत. खतांची अनुपलब्धता दूर झाली आहे. कृषी व पूरक क्षेत्रात आता मोठे काम सुरू आहे. ईशान्य मंडळ उद्योग विकासाचा प्रयत्न करीत असून त्यात उद्योजकांची पहिली फळी तयार होत आहे. वेगवेगळे साधनसंपत्ती अहवाल व सर्वेक्षणे यातून ज्ञानविस्तार होत आहे. अनेक छोटे उद्योग या भागात सुरू झाले असून त्यात ईशान्य बाजार समित्या स्थापन झाल्या आहेत. त्यातून प्रदर्शने, कार्यशाळा व उद्योग बैठका यांना प्रोत्साहन मिळत आहे. रेशीमउद्योगालाही प्राधान्य देण्यात आले असून सिक्कीमसह अनेक राज्यात पर्यटनाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. परिसंस्था व पर्यावरणाचा

ऱ्हास रोखणे महत्वाचे आहे. ३४०० हेक्टर क्षेत्रात १७०० झुमिया कुटुंबे काम करीत आहेत. त्यातून पारंपरिक लागवड पद्धती बदलून नवीन पद्धतींचा वापर केला जात आहे. डिसेंबर २०१७ मध्ये ईशान्य विकासासाठी केंद्र सरकारने अनेक उपक्रम हाती घेतले. त्यात ईशान्य विशेष पायाभूत सुविधा विकास योजना महत्वाची आहे. त्यामुळे पायाभूत विकासातील दरी भरून निघणार आहे. सामाजिक क्षेत्रात शिक्षण व आरोग्याचे प्रकल्प राबवण्यात येत आहेत. यात अनेक योजना केंद्राच्या अर्थसहाय्यावर सुरू केल्या आहेत. एनएलसीपीआरमध्ये केवळ दहा टक्के वाटा राज्यांचा आहे. पुढील तीन वर्षात सरकार ५३०० कोटी रूपये या राज्यांना देणार आहे. तुइरियाल जलविद्युत प्रकल्प हा केंद्राचा मोठा प्रकल्प यात आहे. तो मिझोराममध्ये सुरू होत असून त्यातून वर्षाला २५१ दशलक्ष युनिट वीज निर्माण होणार आहे. मिझोराम हे अतिरिक्त वीज असलेले ईशान्येतील तिसरे राज्य असेल. आधी त्रिपुरा व सिक्कीम यांनी आर्थिक अडचणींवर मात करून मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती केली आहे. ईशान्येकडील राज्यात ९० टक्के केंद्राची मदत व १० टक्के राज्यांचा पैसा या प्रमाण योजना चालू आहेत. त्यामुळे ईशान्येकडील राज्य सरकारांचा त्यातला वाटा नगण्य आहे. राष्ट्रीय महामार्गात ३८०० कि.मीचे मार्ग या भागात मंजूर केले असून त्यावर ३२०० कोटी रूपये तीन वर्षात खर्च झाले आहेत. त्यात १२०० किलोमीटरचे रस्ते बांधून झाले आहेत. या राज्यांच्या राजधान्यांना रेल्वेच्या नकाशावर आणण्यासाठी केंद्राने विशेष रस्ते विकास कार्यक्रमात ६० हजार कोटी मंजूर केले आहेत. तीस हजार कोटी रूपये भारतमाला योजनेसाठी मंजूर केले असून त्याचा वापर पुढील दोन ते तीन वर्षात केला जाईल. ॲक्ट इस्ट धोरणात कलादन बहुमाध्यम वाहतूक प्रकल्प, दी री टेडिम रस्ता प्रकल्प व सीमावर्ती हाट म्हणजे बाजारपेठा असे उपक्रम आहेत. केंद्र सरकारने मिझोराममध्ये दोन पर्यटन प्रकल्प गेल्या दोन वर्षात मंजूर केले असून त्यांचा खर्च १९४ कोटी रूपये आहे. त्यातून पर्यटन व साहसी पर्यटन याला उत्तेजन मिळणार आहे. इतर पर्यटन प्रकल्पांसाठी ११५ कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत. बांबू हा येथील लाखो लोकांचा उपजीविकेचा प्रमुख घटक आहे. सरकारने आता बांबूला प्रतिबंधित वर्गातून बाहेर काढले आहे. आता बांबू उत्पादन, वाहतूक व विक्री यासाठी परवाना लागत नाही. त्यामुळे लाखो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. त्यामुळे २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याला हातभार लागणार आहे. २०१८-१९ या वर्षाचा अर्थसंकल्प पाहिला तर त्यात १०१४.०९ कोटी म्हणजे गेल्या वर्षीच्या पाच पट तरतूद पन्नास विमानतळांच्या पुनरूज्जीवनसाठी व हवाई पायाभूत सुविधांसाठी केली आहे. सिक्कीममधिल पाकयाँग, अरूणातलातील तेझू या विमानतळांचा त्यात समावेश असून नागरी हवाई वाहतूक उपलब्धता त्यामुळे वाढणार आहे. आर्थिक वाढ व विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत. उच्च साक्षरता दर, नैसर्गिक सौदर्य, इंग्रजी भाषिक लोकांची जास्त संख्या यामुळे यातील अनेक भाग हे चांगले पर्यटन केंद्रे म्हणून विकसित करता येतील.

**पुढील तीन वर्षात सरकार ५३०० कोटी रूपये या राज्यांना देणार आहे. तुइरियाल जलविद्युत प्रकल्प हा केंद्राचा मोठा प्रकल्प यात आहे. तो मिझोराममध्ये सुरू होत असून त्यातून वर्षाला २५१ दशलक्ष युनिट वीज निर्माण होणार आहे. मिझोराम हे अतिरिक्त वीज असलेले ईशान्येतील तिसरे राज्य असेल. आधी त्रिपुरा व सिक्कीम यांनी आर्थिक अडचणींवर मात करून मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती केली आहे. ईशान्येकडील राज्यात ९० टक्के केंद्राची मदत व १० टक्के राज्यांचा पैसा या प्रमाण योजना चालू आहेत.**

**ईशान्येच्या विकासासाठी सहास्तरीय धोरणाचा समावेश आहे.**

१. स्वयंशासन, सहभागात्मक विकास यातून लोकांचे सक्षमीकरण, समावेशक वाढीसाठी विविध पातळ्यांवर नियोजन

२. कृषी उत्पादन वाढवून ग्रामीण भागात संधीची उपलब्धता. पशुपालन, फलोद्यान, पुष्पोद्यान, मच्छिमारी, यातून उपजीविकेची नवी कृषी बाह्य साधने.

३. कृषी प्रक्रिया, जलविद्युत निर्मिती यावर आधारित काही भागांचा विकास.

४. कौशल्यविकासातून लोकांच्या क्षमतेत वाढ. सरकारी संस्थांच्या क्षमतेत वाढ.

५. खासगी क्षेत्रात गुंतवणुकीसाठी

प्रोत्साहन. विशेष करून पायाभूत सुविधात खासगी गुंतवणूक,

६. दूरदृष्टीच्या उपक्रमातील उद्दिष्टपूर्तीसाठी सरकार व खासगी क्षेत्रांचे एकत्रित काम.

अलिकडेच ३ फेब्रुवारी २०१८ रोजी गुवाहाटी येथे जागतिक गुंतवणूकदार परिषद झाली. त्यात एनडीए सरकारचा ईशान्येकडील राज्यांची भरभराट करण्याचा हेतू दिसून येतो. यात राज्यांमधील गुंतवणूक संधी दिसून आल्या. दक्षिण व आग्नेय आशियातील देश यात सहभागी होते. उत्पादन, सेवा, वीज,कृषी, अन्न प्रक्रिया, वाहतूक, माहिती तंत्रज्ञान, पेट्रोरसायने, कापड उद्योग, हस्तकला तसेच पर्यटन यात गुंतवणूक करता येईल. नवप्रवर्तन, उपक्रम, नवसंकल्पना, अंमलबजावणी या चार स्तरावर यात काम होणे गरजेचे आहे. सर्वसमावेशक वाढीबरोबरच सर्वसमावेशक विकास यात महत्वाचा आहे. त्यासाठी जाचक कायदे दूर करण्याची गरज आहे. स्थानिक लोकांचे सक्षमीकरण महत्वाचे आहे. त्यांच्या मूलभूत गरजा भागणे महत्वाचे असून ईशान्येच्या विकासासाठी सर्व संबंधित घटकांनी सर्वंकष वास्तववादी योजनेचा आराखडा तयार केला पाहिजे.

*जीएसडीपी पीसीआय व वाढीता दर यांची क्षेत्रनिहाय स्थिती*

| २०१६-१७ (अ) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जीएसडीपी | | दरडोई उत्पन्न | | वाढीचा दर जीएसडीपीच्या तुलनेत |
| अनु | राज्य | लोकसंख्या २०११ | सध्याच्या दराने रूपये कोटी | २०११-१२ च्या स्थिर दराने किंमती | एनएसडीपी रूपये सध्याच्या दराने किंमती | २०११-१२ च्या स्थिर दराने किंमती | २०११-१२ च्या किंमतीनुसार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | आंध्र | ८४,५८०,७७७ | NA | NA | NA | NA | NA |
| २ | अरूणाचल | १३८३७२७ | NA | NA | NA | NA | NA |
| ३ | आसाम | ३११२०५५७६ | NA | NA | NA | NA | NA |
| ४ | बिहार | १०४०९९४५२ | NA | NA | NA | NA | NA |
| ५ | छत्तीसगड | २५५४५१९८ | २९०१४० | २२३९३२ | ९१७७२ | ७१२१४ | NA |
| ६ | गोवा | १४५८५४५ | NA | NA | NA | NA | NA |
| ७ | गुजरात | ६०४३९६९२ | NA | NA | NA | NA | NA |
| ८ | हरयाना | २५३५१४६२ | NA | NA | NA | NA | NA |
| ९ | हिमाचल | ६८६४६०२ | NA | NA | NA | NA | NA |
| १० | जम्मू-काश्मीर | १२५४१३०२ | NA | NA | NA | NA | NA |

| २०१६-१७ (अ) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जीएसडीपी | | दरडोई उत्पन्न | | वाढीचा दर जीएसडीपीच्या तुलनेत |
| अनु | राज्य | लोकसंख्या २०११ | सध्याच्या दराने रूपये कोटी | २०११-१२ च्या स्थिर दराने किंमती | एनएसडीपी रूपये सध्याच्या दराने किंमती | २०११-१२ च्या स्थिर दराने किंमती | २०११-१२ च्या किंमतीनुसार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ११ | झारखंड | ३२९८८१३४ | NA | NA | NA | NA | NA |
| १२ | कर्नाटक | ६१०९५२९७ | NA | NA | NA | NA | NA |
| १३ | केरळ | ३३४०६०६१ | NA | NA | NA | NA | NA |
| १४ | मध्यप्रदेश | ७२६२६८०९ | ६४०४८४ | ४६५२१२ | ७२५९९ | ५१८५२ | १२.२१ |
| १५ | महाराष्ट्र | ११२३७४३३३ | NA | NA | NA | NA | NA |
| १६ | मणिपूर | २५७०३९० | NA | NA | NA | NA | NA |
| १७ | मेघालय | २९६६८८९ | २९५६७ | २४००५ | ७९३३२ | ६३६७८ | ६.६५ |
| १८ | मिझोराम | १०९७२०६ | NA | NA | NA | NA | NA |
| १९ | नागालँड | १९७८५०२ | NA | NA | NA | NA | NA |
| २० | ओदिशा | ४१९७४२१८ | ३७८९९१ | ३१४३६४ | ७५२२३ | ६१६७८ | ७.९४ |
| २१ | पंजाब | २७७४३३३८ | ४२७८७० | ३४८४८७ | १२८८२१ | १०३७२६ | ५.९३ |
| २२ | राजस्थान | ६८५४८४३७ | NA | NA | NA | NA | NA |
| २३ | सिक्कीम | ६१०५७७ | NA | NA | NA | NA | NA |
| २४ | तामिळनाडू | ७२१४७०३० | NA | NA | NA | NA | NA |
| २५ | तेलंगणा | | NA | NA | NA | NA | NA |
| २६ | त्रिपुरा | ३६७३९१७ | NA | NA | NA | NA | NA |
| २७ | उत्तर प्रदेश | १९९८१२३४१ | NA | NA | NA | NA | NA |
| २८ | उत्तराखंड | १००८६२९२ | NA | NA | NA | NA | NA |

| २०१६-१७ (अ) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जीएसडीपी | | दरडोई उत्पन्न | | वाढीचा दर जीएसडीपीच्या तुलनेत |
| अनु | राज्य | लोकसंख्या २०११ | सध्याच्या दराने रूपये कोटी | २०११-१२ च्या स्थिर दराने किंमती | एनएसडीपी रूपये सध्याच्या दराने किंमती | २०११-१२ च्या स्थिर दराने किंमती | २०११-१२ च्या किंमतीनुसार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २९ | पश्चिम बंगाल | ९१२७६११५ | | | | | |
| ३० | अंदमान व निकोबार | ३८०५८१ | NA | NA | NA | NA | NA |
| ३१ | चंडीगड | १०५५४५० | NA | NA | NA | NA | NA |
| ३२ | दिल्ली | १६७८७९४१ | ६२२३८५ | ४९८२१७ | ३०३०७३ | २४०३१८ | ८.२६ |
| ३३ | पुडुचेरी | १२४७९५३ | २९५५७ | २३६५६ | १९०३८४ | १५०३६९ | ७.४९ |
| ३४ | अखिल भारतीय | १२११०५६९५७३ | १५१८३७०९ | १२१८९८५४ | १०३२१९ | ८२२६९ | ७.१ |

*स्रोत– आर्थिक सांख्यिकी संस्था पंजाब, केंद्रीय सांख्यिकि संस्था नवी दिल्ली*

■■■

*लेखिका नाबार्डच्या चंदीगड येथील हरियाणा प्रादेशिक कार्यालयात सहाय्यक महाव्यवस्थापक आहेत. आकाशवाणी आणि दूरदर्शनवरील माहिती आणि चर्चाविषयक अनेक कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला आहे.*

*email : manjula.jaipur@gmail.com*

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी UNICODE (Mangal) किंवा KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, ही विनंती.

साध्य

# मुख्य प्रवाहात ईशान्य भारत

एस.जे.चिरु



**भारत देश हा घटनेनुसार चालतो. घटनेनुसार प्रत्येक राज्याचा कारभार चालतो. घटनेनुसार भारतातील प्रत्येक नागरिकांना मूलभूत कर्तव्ये आणि हक्क मिळाली आहेत. घटनेनंच प्रत्येक नागरिकाला प्रगती करण्याची संधी दिलीय. घटनेचा आधार घेऊनच मुख्यप्रवाहात आणणं ही संकल्पना आपण आत्मसात करु शकतो. त्यामुळेच भारतातील प्रत्येक राज्य हे मुख्य प्रवाहात आहे. पूर्वोत्तर राज्यात भारतातील इतर राज्यांपेक्षा साक्षरतेचं प्रमाण जास्त आहे .**

भारतातील पूर्वोत्तर राज्यांना मुख्य प्रवाहात कसं आणावं याविषयी नेहमीच चर्चा होत असते. धोरणकर्ते,कायदा आणि सुव्यवस्था राखणारे अधिकारी,पत्रकार,अभ्यासक यासंदर्भात मला नेहमीच प्रश्न विचारतात. बहुतेक प्रश्न पूर्वग्रह दूषित असल्यानं पर्वोत्तर राज्यासंदर्भात तिरस्कारयुक्त भावनाच या प्रश्नातून पाहायला मिळते. त्यामुळेच पूर्वोत्तर राज्यातील नागरिक या प्रश्नांवर भडकतात. या प्रश्नांमुळेच मी पूर्वोत्तर राज्य मुख्य प्रवाहात येणं म्हणजे नक्की काय याचा विचार करु लागलो.

भारतात मोठी विविधता आहे. विविध कला,संस्कृती,भाषा,धर्म,जाती-जमातींमुळे भारत देश समृद्ध झालाय. एवढी विविधता असूनही भारत देश एकसंघ आहे. त्यामुळेच मी आत्मविश्वासानं सांगू शकतो पूर्वोत्तर राज्य भारताचा अविभाज्य घटक आहेत. त्यामुळेच पूर्वोत्तर राज्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दक्षिण भारत,पंजाब,सौराष्ट्र आणि ओडिशापेक्षा विशेष प्रयत्न करणं खरंच गरजेचं आहे काय ?. तरीही पूर्वोत्तर राज्यांना मुख्य प्रवाहात आणणं गरजेचं आहे या लोकप्रिय मताचं परीक्षण करणं आवश्यक आहे.

### मुख्य प्रवाहात आणणं म्हणजे नक्की काय ?

भारतातील इतर राज्ये मुख्य प्रवाहात आहेत म्हणजे काय ? पूर्वोत्तर राज्य मुख्य प्रवाहात नाहीत असं का समजलं जातंय. भारत देश हा घटनेनुसार चालतो. घटनेनुसार प्रत्येक राज्याचा कारभार चालतो. घटनेनुसार भारतातील प्रत्येक नागरिकांना मूलभूत कर्तव्ये आणि हक्क मिळाली आहेत. घटनेनंच प्रत्येक नागरिकाला प्रगती करण्याची संधी दिलीय. घटनेचा आधार घेऊनच मुख्यप्रवाहात आणणं ही संकल्पना आपण आत्मसात करु शकतो. त्यामुळेच भारतातील प्रत्येक राज्य हे मुख्य प्रवाहात आहे. पूर्वोत्तर राज्यात भारतातील इतर राज्यांपेक्षा साक्षरतेचं प्रमाण जास्त आहे. पायाभूत क्षेत्र, औद्योगीकरण,ऊर्जा या क्षेत्रात उत्तर पूर्व राज्य मागे आहेत. तरीही आपण पूर्वोत्तर राज्ये मुख्य प्रवाहात नाहीत असं आपण म्हणू शकतो काय? सामाजिक आणि राजकीयदृष्टया उत्तर पूर्व राज्यातील नागरिकांमध्ये भारतातील इतर नागरिकांपेक्षा परकेपणा जाणवतो असं समजलं जातं. अंतर्गत आणि परकीय शक्तींमुळे पूर्वोत्तर भारत अशांत आहे. याचा अर्थ ही राज्ये भारतापासून वेगळी होत आहेत असा लावणं चुकीचं आहे. पूर्वोत्तर राज्यातील

नागरिकांच्या भारतीयत्वाबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यास या राज्यातील नागरिक दुरावू शकतात. याऊलट आज उत्तर पूर्व राज्यांमधील नागरिकांनी नोकरी,शिक्षण आणि रोजगारासाठी देशातील विविध भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतर केलंय. या स्थलांतरामुळेच पूर्वोत्तर राज्यांमधील प्रश्न समजण्यास मदत होतेय.

### स्थलांतराची परिस्थिती

गेल्या तीन दशकांमध्ये उत्तर पूर्व राज्यांमधील नागरिक नोकरी,रोजगार आणि शिक्षणासाठी देशाच्या विविध राज्यात स्थलांतर करत आहेत. या स्थलांतरामुळे पूर्वोत्तर राज्यातील नागरिक आणि इतर राज्यातील नागरिकांमध्ये संवाद वाढलाय. या संवादामुळे पूर्वोत्तर राज्यातील प्रश्न समजण्यास मदत होतेय. १९८० मध्ये पूर्वोत्तर राज्यातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी दिल्लीसारख्या मोठ्या शहरांकडे धाव घेताना दिसले. उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे विद्यार्थी पुन्हा त्यांच्या राज्यात परत गेले. माहिती क्रांतीनंतर पूर्वोत्तर राज्यातील विद्यार्थी देशभरात नोकरीच्या निमित्तानं इतर शहरांमध्ये स्थिरावलेत. पूर्वोत्तर राज्यातील साक्षरतेचं प्रमाण जास्त असल्यानं आयटी क्षेत्रात इंग्रजीचं ज्ञान असलेल्या या विद्यार्थ्यांना मोठी संधी मिळाली. त्यामुळे कॉलसेंटरमध्ये पूर्वोत्तर राज्यातील विद्यार्थ्यांना मोठी संधी मिळाली. एअर होस्टेस, पंचतारांकित हॉटेल्स, कॉल सेंटर, फ्रंट ऑफिस (स्वागत कक्ष) या ठिकाणी या राज्यातील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध झालाय. त्यामुळे दिल्ली, बंगळूर, पुणे, चेन्नई, कोलकत्ता, मुंबई या सारख्या महानगरांमध्ये पूर्वोत्तर राज्यातून मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालंय. दक्षिण भारत आणि

**अंतर्गत आणि परकीय शक्तींमुळे पूर्वोत्तर भारत अशांत आहे. याचा अर्थ ही राज्ये भारतापासून वेगळी होत आहेत असा लावणं चुकीचं आहे. पूर्वोत्तर राज्यातील नागरिकांच्या भारतीयत्वाबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यास या राज्यातील नागरिक दुरावू शकतात. याऊलट आज उत्तर पूर्व राज्यांमधील नागरिकांनी नोकरी,शिक्षण आणि रोजगारासाठी देशातील विविध भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतर केलंय. या स्थलांतरामुळेच पूर्वोत्तर राज्यांमधील प्रश्न समजण्यास मदत होतेय.**

इतर राज्यात बांधकाम क्षेत्रातील मजूर,चहाचे मळे या ठिकाणीही पूर्वोत्तर राज्यातील नागरिक काम करत आहेत

### स्थलांतराची कारणे

भारत देश आकारानं मोठा असल्यानं पूर्वोत्तर राज्यातील नागरिकांचं स्थलांतर मोठं भासत नाही. मात्र,संधी आणि प्रगतीसाठी पूर्वोत्तर राज्यातून मोठं स्थलांतर होत आहे. शुक्ला समितीनं चार कारणांमुळे स्थलांतर वाढल्याचं नमूद केलंय. पूर्वोत्तर राज्यांमध्ये मूलभूत आणि पायाभूत सोयी-सुविधांचा अभाव,संसाधनाचा अभाव त्यासोबतच पूर्वोत्तर राज्यातील नागरिकांना समजून न घेण्याच्या वृत्तीमुळे स्थलांतर वाढलंय. दर्जेदार शिक्षणाच्या अभावामुळे स्थलातंराचं प्रमाण वाढलंय. याशिवार पूर्वोत्तर राज्यातील अशांत परिस्थिती आणि राजकीय अस्थिरतेमुळेच स्थलांतरासाठी पूरक वातावरण तयार झालंय. उच्च शिक्षणासाठी नेहमीच कोलकत्ता,दिल्ली या शहरांना प्राधान्य दिले जातेय. प्रशासकीय अधिकारी,बँकर्स,वकील आणि अभ्यासक यांनी सुरुवातीला विद्यार्थी म्हणूनच स्थलांतर केलंय.

### स्थलांतरीतांचं जीवन

कॉलेज कॅम्पस,कॉल सेंटर,मॉल्स, पंचतारांकित हॉटेल्समध्य पूर्वोत्तर राज्यातील नागरिक मोठ्या प्रमाणात दिसू लागले आहेत. नोकरी आणि प्रगतीसाठी झालेल्या या स्थलांतरामुळे अनेक प्रश्नही निर्माण झालेत. पूर्वोत्तर राज्यातील नागरिक मोठ्या प्रमाणात खेड्यांमध्ये राहतात. खेड्यातील नागरिक सामाजिकदृष्ट्या जोडलेला असतो. त्यामुळे महानगरातील जीवनशैलींशी जळवून घेणं सुरुवातीला विद्यार्थ्यांना अवघड गेलं. त्यासोबतच पूर्वोत्तर राज्यातील नागरिक दिसायला वेगळे असल्यानं त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात हल्लेही झाले आहेत. दिल्ली आणि बंगळुरु सारख्या महानगरांमध्ये पूर्वोत्तर राज्यातील नागरिकांवर हल्ले झाले आहेत. विनयभंग,बलात्कार आणि खून या सारख्या गंभीर प्रकारांना स्थलांतरीत नागरिकांना सामोरं जावं लागतंय. मानवी तस्करीही मोठ्या प्रमाणात होतेय. पूर्वोत्तर नागरिकांना समजून घेऊन पूल बांधण्याऐवजी दुरावा वाढतोय.

### असुरक्षित पूर्वोत्तर स्थलांतरीतांसाठी संरक्षण

सप्टेंबर २०१४ मध्ये दिल्लीमध्ये अरुणाचल प्रदेशातील १९ वर्षीय नीडो तानिया हिचा खून झाल्यानंतर पूर्वोत्तर राज्यातील स्थलांतरांचा प्रश्न ऐरणीवर आलाय. या घटनेनंतर केंद्र सरकार आणि राज्य सरकारला या

प्रश्नाची दाहकता समजली. पूर्वोत्तर राज्यातील स्थलांतरीत नागरिकांच्या संरक्षण आणि अधिकारासाठी केंद्र सरकारनं बेजबरुआ समितीची स्थापना २१ फेब्रुवारी २०१४ रोजी केली. बेजबरुआ समितीच्या सर्व शिफारशी केंद्र सरकारनं स्वीकारल्या आहेत. समितीच्या शिफारशीनुसार अनेक महानरांमध्ये पूर्वोत्तर राज्यातील स्थलांतरीतांसाठी समाज कल्याणकारी समिती स्थापन करण्यात आल्यात. स्थानिक प्रशासन आणि स्थलांतरीत नागरिक यांचा दुवा म्हणून कल्याणकारी समिती काम करत आहे. समितीच्या सर्व शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी मोठा कालावधी लागणार आहे. या शिफारशींची अंमलबजावणी केल्यानं पूर्वोत्तर राज्यातील नागरिकांवर हल्यांचं प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. यासोबतच पूर्वोत्तर नागरिकांना समजावून घेणंही गरजचें आहे. संवाद आणि विचारांच्या देवाण-घेवाणीतून दुरावा कमी होण्यास मदत होणार आहे. स्थलांतरीत नागरिकांसाठी प्रशासनावर अवलंबून राहणं धोकादायक ठरू शकते. यामुळेच सोहार्दपूर्ण वातावरणासाठी सामाजिक संघटनाचा समावेश महत्वाचा ठरु शकतो. चांगल्या समाजासाठी स्थलांतरीत नागरिकांसोबतच भेदभाव करणं धोकदायक ठरू शकतो. भविष्यात मोठ्या प्रमाणात पूर्वोत्तर राज्यातून नागरिकांचं स्थलांतरांचं प्रमाण वाढणार आहे. बेजबरुआ समितीच्या शिफारशी प्रभावीपणे राबवल्यास भावी पिढींसाठी फायदेशीर ठरणार आहे.

### पूर्वोत्तर राज्यांचं भविष्य

गेल्या २५ वर्षात भारताचा आर्थिक विकास वेगाने होतोय. भारताची वाटचाल आर्थिक महासत्तेकडे होतेय. आर्थिक विकास साधण्यासाठी देशभरातील नागरिक देशभरात स्थलांतरीत होणार आहेत. यासंदर्भामुळेच उत्तर पूर्व राज्यातील तरुण देशभरात स्थलांतर करतील हे चांगल्या अर्थव्यवस्थेचं लक्षण ठरणार आहे. मात्र, पूर्वोत्तर राज्यातलं वाढतं स्थलांतर काळजीचं ठरतंय. उच्च शिक्षणाच्या सुविधेचा अभाव,आरोग्य सुविधांची वानवा,संसाधनाची कमरता,मंदावलेला आर्थिक विकास, अशांतता,भ्रष्टाचारी आणि अकार्यक्षम प्रशासन या कारणांमुळे पूर्वोत्तर राज्यांमधून स्थलांतर वाढत आहे. उच्च शिक्षणाचा अभाव असल्यानं पूर्वोत्तर राज्यामधून विद्यार्थ्यांचं होणारं स्थलांतर भूषणावह नाही. एकेकाळी शिलाँग शिक्षणासाठी प्रसिद्ध होतं.


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______ date ______

Name (in block letters) : ______

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______

Phone No. / email : ______

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

**आर्थिक विकास साधण्यासाठी देशभरातील नागरिक देशभरात स्थलांतरीत होणार आहेत. यासंदर्भामुळेच उत्तर पूर्व राज्यातील तरुण देशभरात स्थलांतर करतील हे चांगल्या अर्थव्यवस्थेचं लक्षण ठरणार आहे. मात्र, पूर्वोत्तर राज्यातलं वाढतं स्थलांतर काळजीचं ठरतंय. उच्च शिक्षणाच्या सुविधेचा अभाव,आरोग्य सुविधांची वानवा,संसाधनाची कमरता,मंदावलेला आर्थिक विकास, अशांतता,भ्रष्टाचारी आणि अकार्यक्षम प्रशासन या कारणांमुळे पूर्वोत्तर राज्यांमधून स्थलांतर वाढत आहे.**

मात्र,या भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी दिल्ली,चेन्नई,पुणे,कोलकत्ता आणि मुंबईला जात आहेत. ही महानगरे महाग असल्यानं शिक्षणाचा खर्चही वाढतोय. उत्तर पूर्व राज्यांमध्ये आयटी,पर्यटन,अन्न प्रक्रिया उद्योग,वैद्यकीय व्यवसाय आणि खानपान व्यवसायात नोकरीच्या संधी नसल्यानं मानवी संसाधनांना या राज्यांना मुकावं लागतंय.चांगलं मानवी संसाधन राज्याबाहेर गेल्यानं या राज्यांचा विकासही खुंटलाय.

पूर्वोत्तर राज्याच्या विकासासाठी केंद्र सरकारने वेगळा विभाग निर्माण केलाय. या विभागामार्फत या राज्यांच्या विकासासाठी प्रयत्न केले जातात. पूर्वोत्तर राज्य प्रगतीपथावर यावं यासाठी केंद्र सरकारकडून रेल्वे,रस्ते,विमान वाहतूक,जलवाहतूक,दूरसंचार आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जातेय. यासोबतच या राज्यात लहान,मध्यम स्वरुपाचे उद्योग उभारावेत यासाठी खास प्रयत्न केले जात आहेत. केंद्र सरकारच्या ''लूक ईस्ट'' धोरणामुळे पूर्वोत्तर राज्ये विकासाच्या ट्रॅकवर येणार आहेत. यासाठी ''लूक ईस्ट'' धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे केल्यास सरकारच्या प्रयत्नांना यश मिळणार आहे.भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, ''भारतातील सर्व राज्य विकसीत झाल्यानंतरच देशाचा विकास होणार आहे. मला पूर्वोत्तर राज्ये मागास राहावीत यासाठी कोणतही कारण दिसत नाही. पूर्वोत्तर राज्यांचा विकास हा होणारच.'' पंतप्रधानाचा हा आशावादच पूर्वोत्तर राज्यांसाठी विकासपर्वाची नांदी ठरु शकणार आहे.

■■■

*लेखक तामिळनाडू सरकारच्या कृषी उत्पन्न आणि पणन विभागाचे आयुक्त आहेत.*

*email : sjchiru@gmail.com*

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

विशेष लेख

# पूर्वोत्तर क्षेत्र आणि प्रशासनासमोरील आव्हाने

**नरेशचंद्र सक्सेना**



**सिक्कीम, त्रिपुरा आणि काही प्रमाणात मिझोराम या राज्यांचा अपवाद वगळता, आर्थिक विकासाचा विचार करता इतर राज्यांनी विशेष प्रगती केलेली दिसत नाही. १९७० च्या सुरवातीपर्यंत आसाम हे देशातील एक समृध्द राज्य होते. परंतु ती परिस्थिती पुढील चार दशकात राहीली नाही. त्यानंतर त्यांची प्रत्येक क्षेत्रात घसरण सुरु झाली. पूर्वोत्तर किंवा ईशान्य भारतातील ७० टक्के लोकसंख्या आसाममध्ये वास्तव्यास आहे.**

भारतातील पूर्वोत्तर क्षेत्र हे एक मागासलेले क्षेत्र असून वैशिष्ट्यांच्या स्वरुपात सांगायचे झाल्यास अल्प दरडोई उप्तन्न, खाजगी गुंतवणीकीचा अभाव, गतीहीन भांडवल निर्मिती, पायाभूत सुधारणांचा अभाव भौगोलिक दृष्ट्या एकाकी प्रदेश नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपूरा उपयोग उदा. नैसर्गिक खनिज संपत्ती जलविद्युत निर्मितीतील संभाव्य क्षमता, विपुल वनसंपत्तीचा अपूरा वापर इ.इ त्यांचे कर महसुलींचे प्रमाण तसेच अंतर्गत महसुलांचे प्रमाण इतके अल्प आहे की केंद्राकडून हस्तांतरीत होणाऱ्या मदतीवर अवलंबुन रहावे लागत असते. स्थानिक धनिक मंडळी स्थावर मालमत्तेत गुंतवणूक करतात मात्र उद्योगक्षेत्र जोखमीचे असून त्यापासुन दूर राहीलेले चांगले असा विचार करतात. राज्यांमधील रिधीय स्थाने भुप्रदेशाच्या दृष्टीने पायाभूत सुधारणांचा अभाव यामुळे औद्योगिक प्रगतीला खीळ बसलेली आहे.

सिक्कीम, त्रिपुरा आणि काही प्रमाणात मिझोराम या राज्यांचा अपवाद वगळता, आर्थिक विकासाचा विचार करता इतर राज्यांनी विशेष प्रगती केलेली दिसत नाही याचा उल्लेख तक्ता क्र. १ मध्ये केला आहे. १९७० च्या सुरवातीपर्यंत आसाम हे देशातील एक समृध्द राज्य होते. परंतु ती परिस्थिती पुढील चार दशकात राहीली नाही. त्यानंतर त्यांची प्रत्येक क्षेत्रात घसरण सुरु झाली. आसामच्या लोकसंख्येची व्याप्ती ही, पूर्वोत्तर प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या ७० टक्के इतकी आहे. मात्र प्रगतीचे कोणतेही निर्देशक वापरले तरी हे राज्य आळसावलेले दिसते. या राज्याने आपली प्रगती रोखली आहे.

२००४-०५ च्या स्थिर किंमतीवर आधारित पूर्वोत्तर प्रदेशांचे दरडोई उत्पन्न पूर्वोत्तर प्रदेशाकडे भारत सरकारने अधिक लक्ष पुरवणे गरजेचे असले तरी राज्यांची कटू वास्तवाची वस्तुस्थिती लपून राहत नाही. प्रगतीचा वेग त्यांनी वाढवायला हवा. प्रशासन गतीमान करायला हवे. सर्व समावेशक प्रगतीचे लक्ष्य हे आर्थिक प्रगती दारिद्र्य निर्मूलन, सामाजिक निर्देशकांत प्रगती असामानतेत कमी आणणे ही सारी महत्वाची उद्दिष्टे आहेत. या साऱ्यांची तजवीज करतानाच पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. असे असताना या सुक्ष्म धोरणांची अमंलबजावणी करताना पूर्वोत्तर राज्यांमध्ये सुप्रशासन आणि जबाबदारीने काम पाहणाऱ्या पारदर्शी शासनाची आवश्यकता आहे. अन्यथा उत्तमातील उत्तम धोरणे कायदे फक्त

| | २००५-०६ | २०१५-१६ | वार्षिक वाढ दर २००५-१६ |
|---|---|---|---|
| अरुणाचल प्रदेश | २६८७० | ३९१०७ | ३.८२ |
| आसाम | १७०५० | २६४१३ | ४.४७ |
| मणिपूर | १९४७९ | २६३०१ | ३.०५ |
| मेघालय | २५६४२ | ३८६०१ | ४.१८ |
| मिझोराम | २५८२६ | ४४७७३ | ५.६६ |
| नागालँड | ३३०७२ | ५०३२७ | ४.२९ |
| सिक्कीम | २९००८ | ९२३२८ | १२.२७ |
| त्रिपुरा | २५६८८ | ५५३२२ | ७.९७ |
| भारत | २८६३९ | ५२८३३ | ६.३२ |

कागदावर उतरवलेले दिसतील किंवा क्षती झालेली दिसेल. दुर्दैवाने पूर्वोत्तर राज्यस्तरीय किंवा जिल्हा स्तरीय प्रशासन अत्यंत ढिसाळ आहे. निधीचा पूरेपूर वापर करण्यास ते समर्थ नसून कामांवर देखरेखीचा अभाव आणि हवे तेवढे उत्पादन मिळवण्यास असमर्थ आहे. विकासाच्या कामांना प्रेरीत करणारे किंवा सामाजिक स्तरावर मार्गदर्शक असे हे महत्वाचे घटक आहेत. यासाठी काही उदाहरणे खालील प्रमाणे आहेत.

**निधींचा वापर**

आपल्याला माहीत आहेच कि पूर्वोत्तर प्रदेशाच्या विकासाकरिता केंद्रीय मंत्रालयाने शाश्वत निधी म्हणून त्यांच्या अर्थसंकल्पीय निधी पैकी १० टक्के निधी राखून ठेवायला हवा. या पैकी खर्च न झालेला निधी केंद्राच्या (NLCPR) मध्ये जमा करायला हवा. काही ठिकाणी प्रकल्पांची उभारणी थोड्यावेळात होते. काही ठिकाणी निधी अभावी विलंब होतो. याचे कारण केंद्रातर्फे एकत्रित ठिकाणी निधी हस्तांतरीत केलेला नसतो. संपूर्ण निधी वापरण्याची या राज्यांची क्षमताही नसते. काही कामांचा हंगाम कमी कालावधीचा असल्यामुळे प्रकल्पांमध्ये अडथळे येतात.

पूर्वोत्तर राज्यांसाठी असलेल्या केंद्रीय मंत्रालयाच्या वेबसाईटवर अशी माहीती उपलब्ध आहे की सन २००० ते सन २०१० पर्यंत (NLCPR) च्या राखीव निधी मध्ये १७२१३ कोटी जमा आहेत. त्यापैकी फक्त ८७९६ कोटी रु पूर्वोत्तर राज्यांना देण्यात आले आहेत. म्हणजेच एकूण रकमेच्या फक्त ५० टक्के रक्कम २०११ पर्यंत खर्च करण्यात आली आहे. याचाच अर्थ राज्यांकडून प्रशासकीय मंत्रालयाला चांगले प्रस्तावच पाठवण्यात येत नाहीत. येथे खर्चासंबंधी नरेगाचे उदाहरण घेणे संयुक्तिक ठरेल. आसाम व मणीपूर या राज्यांनी २०१६-१७ मध्ये (पूर्वोत्तर प्रदेशात ही दोन्ही राज्ये गरीब मानली जातात) फक्त रु . १६३०/ आणि ४९५३/ रुपये ग्रामीण गरीबांवर खर्च केले तेच प्रमाण केरळ रु. १५६५७/- तेलंगणाचा समावेश असलेल्या आंध्रप्रदेशात रु. ११९४२/- इतके होते.

आशियाई विकास बँक (ADB) तसेच जागतिक बँकेने पूर्वोत्तर राज्यांसाठी पुरस्कृत केलेले अनेक प्रकल्प केवळ ह्या संबंधीचे उपचार पूर्ण करु न शकल्यामुळे अपूर्णावस्थेत आहेत. याचा परिणाम म्हणून प्रकल्पामधल्या आवश्यक इतक्या खर्चाची मर्यादा ते गाठू शकलेले नाहीत. रेल्वे प्रकल्पांचीही तीच अवस्था हि राज्ये रेल्वे प्रकल्पांसाठी भूमी हस्तांतरण करु शकली नाहीत कि वनभूमी साठीची प्रक्रिया पूर्व करु शकलेले नाहीत. अतारांकित प्रश्न क्र. २७८ दि. २२ जुलै २०१५ साठी पूर्वोत्तर खात्यांचा मंत्रालयाने हे मान्य केले की प्रकल्पांना विलंब होत आहे. याची कारणे अशी की प्रकल्पांना दिलेली मंजुरी आणि त्या करिता मंजूर केलेला निधी या दरम्यान झालेले काल हरण

प्रकल्पासाठी उपयोगिता प्रमाणपत्र राज्यांना वेळेवर सादर न

करता येणे, भूमी हस्तांतरण तसेच वनजमिनीसाठीची प्रक्रिया पूर्व न करणे राज्यांची कायदा व सुवव्यस्था परिस्थिती पर्जन्यमानाचे प्रमाण खुप असल्याने काम करण्यासाठी वेळ कमी.. इ.इ.

नियंत्रक व महालेखापाल यांच्या सन २०१५- च्या भाग १ स्वच्छतेसंबंधी अहवालामध्ये नमूद केल्या प्रमाणे मणिपूर मध्ये ग्रामीण भागाच्या गरजा आणि आवश्यकतेच्या मापदंडावर हा प्रकल्प निष्काम ठरला. पायाभूत आणि विश्वसनीय अशी माहितीच उपलब्ध झाली नाही. ज्या समाजासाठी हा प्रकल्प राबवण्यात आला होता त्या समाजाचा प्रकल्प अंमलबजावणी धोरणात सहभाग नव्हता. आर्थिक व्यवस्थापन पुरेसे नव्हते. परिणामी निधी मंजूर करण्यास विलंब झाला. राज्यांनी देण्याच्या निधीमध्ये कमतरता दिसून आली बराचसा निधी राखीव ठेवण्यात आला. अमान्य अशा खर्चापोटी निधी वापरण्यात आला होता. जे खर्च टाळता आले असते ते टाळले गेले नाहीत. स्वच्छतागृहांच्या बाबतीत लाभार्थींसाठी मुल्यांकन पध्दती नियम वगैरे दिसून आले नाहीत किंवा स्वच्छतागृहांच्या देखभालीविषयी गंभीरता दिसली नाही.

**देखरेख आणि मुल्यमापन पध्दतीत सुधारणा**

सद्य परिस्थितीत सर्व थरातील अधिकाऱ्यांचा बराचसा वेळ माहीती गोळा करणे आणि माहिती प्रस्तुत करणे यावरच जातो. परंतु या माहीतीचा उपयोग सुधारात्मक आणि उपचारात्कम किंवा पृथःकरण करण्याकरीता होताना दिसत नाही. कारण हि माहिती एकतर वरीष्ठांकडे पाठवली जाते किंवा विधानसभेमध्ये प्रश्नोत्तरांसाठी वापरली जाते. जी काही माहीती गोळा केली जाते. ती नियमित तपासासाठी जतन केली जात नाही. माहीतीच्या सत्यतेची खात्री पटवून घेण्यासाठी विविध खाती अपयशी ठरतात. त्याचप्रमाणे माहितीच्या उत्तरदायित्त्वाविषयीही अनभिज्ञता दिसते.

उदाहरणच द्यावयाचे झाल्यास पूर्वोत्तर राज्य शासनांच्या माहीतीनुसार 'अ' वर्ग कुपोषित मुलांची टक्केवारी १ टक्के हून कमी आहे. परंतु स्वयंप्रेरणेने केलेल्या युनिसेफ सारख्या संस्थांच्या २०१४ च्या अहवालानुसार हेच प्रमाण मणीपूर सारख्या राज्यात ३.५ टक्के आहे. तर मेघालय त्रिपुरा सारख्या राज्यामध्ये हे प्रमाण तब्बल १६ टक्के इतके आहे.

**तक्ता क्र. २**

| | सरकारी आकडेवारीनुसार | युनिसेफच्या आकडेवारीनुसार |
|---|---|---|
| अरुणाचल प्रदेश | ०.०० | १३.३० |
| आसाम | ०.८६ | ७.०० |
| मणिपूर | ०.०२ | ३.५० |
| मेघालय | ०.१४ | १६.०० |
| मिझोराम | ०.३१ | ६.२० |
| नागालँड | ०.२ | ७.९० |
| सिक्कीम | ०.०७ | ६.५० |
| त्रिपुरा | ०.२५ | १६.८० |
| भारत | १.६१ | ९.४० |

*'अ' वर्ग कुपोषित मुलांची टक्केवारी*

तीव्र कमी वजनांच्या मुलांची टक्केवारी शासन माहीती विरुध्द युनिसेफची आकडेवारी या माहितीचा ताळमेळ तातडीने घालणे आवश्यक आहे. या प्रकीयेमध्ये सुधारणा होणे अपेक्षित आहे. त्यामुळे विश्वसनीय अधिकृत आणि ताळमेळ घालणे शक्य होईल असे दिसून येते की राज्य शासने आकडेवारी चुकीची सांगतात. त्यांना हि माहिती जिल्हास्तरावरुन उपलब्ध होत असते. माहीतीच्या उत्तरदायित्वाला काही अर्थच उरत नाही.

**इ गव्हर्नन्सला चालना**

इ गव्हर्नन्सची ही माहिती व तंत्रज्ञानाची देणगी आहे. गव्हर्नसच्या माध्यमातून शासन व्यवहार सुकर परिणामकारक आणि पारदर्शी होतात इ गव्हर्नन्स मध्ये तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. ज्या द्वारे पारदर्शकता आणता येते शासन आणि जनता यातील अंतर नष्ट होते. वाटेतील अडथळे दूर होतात. शिवाय लोकांचा शासनामधील सहभाग वाढवता येतो व मुख्य म्हणजे लोकांच्या रोजच्या जीवनावर होणाऱ्या परिणामांबद्दल जागरुकता येते. इ गव्हर्नन्सला उत्तम भवितव्य आहे. सर्वसामान्य जनतेसाठी असे असले तरी सुशिक्षीत आणि व्यावसायिकापुरते ते आता तरी मर्यादित आहे. आणि म्हणुन सर्व सामान्य जनतेमध्ये या बद्दल अनभिज्ञता दिसून येते.

जागतिक बँकेने आसाम राज्याबद्दल केलेल्या २०१४ च्या निरिक्षण अहवालामध्ये असे म्हटले आहे की (अहवाल क्र एसीएस २७४०) इ गव्हर्नन्स साठी माहीती व तंत्रज्ञान संप्रेषणा साठीचे सर्वसमावेशक धोरण उपलब्ध नव्हते. शासन सेवा पुरविण्यासाठी जी चौकट हवी असते तिचा अभाव होता. त्याच बरोबर तंत्रज्ञानाला जोड देण्याकरिता पोषक वातावरणही नव्हते. सर्व साधारणपणे माहीती व तंत्रज्ञान विषयक धोरण ठरविताना परंपरागत मुद्यांवर जोर दिला गेला पाहिजे. त्या संबंधीच्या कामांमधील अडथळे दूर करण्याबद्दल भाष्य हवे. समांतर हाताळणी व्यवस्था हवी विस्तृत नेटवर्क हवे, विविध ठिकाणी माहिती केंद्र असावीत माहीती व तंत्रज्ञान बळकटीकरण

**जागतिक बँकेने आसाम राज्याबद्दल केलेल्या २०१४ च्या निरिक्षण अहवालामध्ये असे म्हटले आहे की (अहवाल क्र एसीएस २७४०) इ गव्हर्नन्स साठी माहीती व तंत्रज्ञान संप्रेषणा साठीचे सर्वसमावेशक धोरण उपलब्ध नव्हते. शासन सेवा पुरविण्यासाठी जी चौकट हवी असते तिचा अभाव होता. त्याच बरोबर तंत्रज्ञानाला जोड देण्याकरिता पोषक वातावरणही नव्हते. सर्व साधारणपणे माहीती व तंत्रज्ञान विषयक धोरण ठरविताना परंपरागत मुद्यांवर जोर दिला गेला पाहिजे.**

हवे, दर्जा हवा कार्यशैली हवी आणि तंत्रज्ञानाच्या आणि वापराच्या दृष्टीतून भविष्यात होणारी वाढ लक्षात घेता प्रमाणित मॉडेल हवे. प्रत्येक खात्याने माहीती तंत्रज्ञान संप्रेषण आराखडा तयार करून घ्यायला हवा. समांतर हाताळणी व्यवस्था तयार करायला हवी. बँकांच्या गरजा काय आहेत हे पहायला हवे. क्षमता निर्माण करायला हवी आणि शेवटी केंद्राकडे असलेल्या सोयी सुविधा मागवून त्यांचा कुशलतेने वापर करायला हवा. असे केल्याने कार्यक्षमतेत वाढ तर होईलच आणि कामाचे उत्तरदायित्व ठरवता येईल.

अशाच तऱ्हेच्या अहवालावरही लक्ष वेधणे गरजेचे आहे. १० व्या सर्वसाधारण आढावा मिशनने (२०१७) राष्ट्रीय आरोग्य मिशनचा आढावा घेतला नागालँडमध्ये त्यांना असे लक्षात आले की आरोग्य सेवाकरिता असलेल्या माहीती तंत्रज्ञानाच्या मूलभूत सेवाही कमी प्रमाणात होत्या. आरोग्य सेवांसाठी पुढाकार घेतलेला नव्हता टेलीमेडीसिन अस्तित्वात नव्हती. गरजेनुसार जे धोरण असायला हवे ते नव्हते. त्याचप्रमाणे आरपीएच बद्दल (पुनरुत्पादक आणि बाल आरोग्य) वानवाच होती. साधे नोंदणी रजिस्टर देखील नव्हते. वस्तुसुची व्यवस्थापनाचे संगणीकीकरण देखील झालेले दिसले नाही. लाभार्थिची शोध घेणारी यंत्रणा कुचकामी होती. भुप्रदेशाच्या कठीणाईमुळे असलेले तंत्रज्ञान वापरण्यात अडथळे येत होते. फिजीकल कनेक्टीवीचा अभाव दिसून आला. चांगले नेटवर्क नव्हते फोन तसेच इंटरनेट कमी प्रमाणात आढळले. सेवांचे संगणकीकरण योग्य न झाल्याने कमीशन देयकांचा अनुशेष वाढला. परिणामी 'आशा' परिचारीकाचे वेतन रखडले त्रिपुरामधील धलाई जिल्ह्यात हे आढळून आले.

याउलट भारतातील अनेक राज्यांनी संगणीकीकरणाचा या टोकापासून त्या टोकापर्यंत वापर केला. उद्दीष्ट्ये व सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा सहा राज्यांमधील तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. त्या मध्ये आसाम बिहार छत्तिसगड कर्नाटक, उत्तरप्रदेश, प. बंगाल यांचा समावेश होता. केंद्रीय मंत्रालयाने अभ्यास केला (या अभ्यास गटाचे

नाव होते उद्दीष्टीत सार्वजनिक वितरण व्यवस्था निवडक राज्ये २०१५) त्यांचे निष्कर्ष खालिल प्रमाणे होते :-

★ छत्तिसगड येथे एकूण लाभार्थीच्या केवळ २ टक्के इतक्या अपवर्जन त्रुटी होत्या तर

आसामला त्याच ७१ टक्के इतक्या होत्या.

★ छत्तिसगड मध्ये सर्वातकमी लिकेजेस आढळून आले त्या खालोखाल बिहार मध्येही अशीच स्थिती आढळून आली तुलनेने आसाम उ. प्रदेश आणि प. बंगाल मध्ये लिकेजेस अधिक होते.

★ दक्षता आणि देखरेख आसाम मध्ये सर्वात कमी आढळून आली.

★ दारीद्र्य रेषेखालील कार्ड (BPC) मिळवण्याकरिता आसाममध्ये रु ३०००/- इतकी रक्कम मोजण्यात आली. छत्तिसगड मध्ये हे प्रमाण नगण्य आहे.

★ कचट आणि बोंगायगाव येथील लाभार्थिना त्यांना मंजूर झालेल्या धान्यापैकी पूर्णत: कधीच मिळत नाही. पुरवठादारांकडून प्रति कार्ड ३ ते ४ किलोची कपात केली जाते. ते त्याचं समर्थन करतात त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वाहतूक खर्च शासना कडून मिळत नाही.

**अनावश्यक नोकरशाही**

वर उल्लेख केलेल्या प्रशासकीय/कमतरता या अनेक राज्यांना लागू आहेत, त्यापैकी दोन विशिष्ट अडथळे पूर्वोत्तर राज्यांना लागू आहेत. त्यापैकी एक म्हणजे योजना बाह्य खर्च हा खर्च फार मोठ्या प्रमाणात असण्याचे कारण आणि प्रवर्गामधील गरज नसलेले कर्मचारी उदा. कारकुन, शिपाई वगैरे वगैरे या कारणांमुळे पूर्वोत्तर राज्यांना योजना राबविण्याकरिता निधी कमी पडतो. केंद्र सरकार मुक्तपणे निधी मंजूर करत असताना देखील ही परिस्थिती आहे. उदाहरणाच दाखवायचे झाल्यास आसाम राज्यांचा २०१४-१५ चा दरडोई नियोजित खर्च रु. ५७७५/- इतका ठरवला होता तोच खर्च गरीब लोकसंख्या अधिक असलेल्या छत्तिसगड राज्यांचा रु. १२८०७/- इतका होता याचे प्रमुख कारण मोठ्या प्रमाणावर वेतनावर झालेला खर्च दोन राज्यांची तुलना खालील तक्ता क्र. 3 मध्ये स्पष्ट केली आहे.

पूर्वोत्तर राज्यांमधील प्रशासकिय सेवांचे वैशिष्ट्य म्हणजे अकार्यक्षम कर्मचारी आणि त्याचा प्रशासनावर होणारा नकारात्मक परिणाम. तिथे फार मोठ्या प्रमाणात अकार्यक्षमतेची लागण झाली आहे. सहाय्यक कर्मचारी अत्यंत बेफिकीर आहे. त्यांच्या कामाचा सुमार दर्जा त्याच्या जोडीला भरमसाट पगाराचे बील. परिपूर्ण अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या जोडीला असलेला स्किल मिक्स (कौशल्याधारातील) कर्मचारी वर्ग, ज्याच्या बद्दल समाजात अनादर आहे ते अकार्यक्षम आहेत. यात अनेक कारकुन चालक शिपाई आदींचा समावेश आहे असे असले तरी समाजसेवांमध्ये अत्यंत गरजेचे असलेले कौशल्याधारीत कर्मचाऱ्यांची

**तक्ता क्र. ३**

| | आसाम | छत्तीसगढ |
|---|---|---|
| क्षेत्रफळ (००० चौ. किमी) | १३५ | ७८.४ |
| लोकसंख्या (कोटीमध्ये) | ३.१२ | २.५५ |
| दारिद्रयरेषेखालील शेकडेवारी (२०११-१२) | ३२ टक्के | ४० टक्के |
| फायनान्स कमिशन डिव्होल्यूशन २०१५-१६ (कोटी) | १७४०१ | १३४९० |
| योजना आराखडा (रू. कोटीमध्ये) | १८००० | ३२७१० |
| योजना आराखडा दरडोई २०१४-१५ | ५७७५ | १२८०७ |
| शासकीय कर्मचारी ००० | ३१६ | १२२ |

*दरडोई नियोजित खर्च तुलना*

वानवाही दिसून येते. या मध्ये डॉक्टर नर्स न्यायाधिश पोलीस आदी कर्मचारी यांचा समावेश आहे. संमिश्र अशी ही कर्मचाऱ्यांची भरती आहे. कामाचे डूप्लीकेशन जाणवते त्याच बरोबर कामे निसटूनही जात असतात. अशी अवस्था खात्यांतर्गत आहे. त्याचप्रमाणे खात्यांबाहेर ही जाणवते. असमाधानकारक संरक्षित प्रणाली ही प्रकर्षाने जाणवते. असमाधान कारक मानव संशोधन व्यवस्थापन ही जाणवते. त्याचप्रमाणे अपूऱ्या प्रलोभनामुळेही प्रशासकिय सेवा खराब झाली आहे. या साऱ्यामुळे शासन कार्यक्षमतेने कार्यरत राहू शकत नाही.

बंद संस्कृतीमुळे पूर्वोत्तर राज्यांचा कुरुप चेहरा समोर येतो. बंद म्हणजे राज्यव्यापी बंद. आसाम, मणीपूर आणि नागालँड या राज्यांमध्ये याचे सर्वाधिक प्रमाण आहे. या मुळे वैयक्तिक हक्कांची पायमल्ली होते. स्थानिक प्रशासनाला हा कलंक आहे त्याचप्रमाणे हे कृत्य असंसदिय देखील आहे .आसामच्या बंदचा परिणाम पूर्वोत्तर राज्यांमध्ये चौफेर होताना दिसतो. याचे कारण म्हणजे रेल्वे वाहतूक असो कि रस्ते वाहतुक, दैनंदिन गरजेच्या साऱ्या वस्तु उदा. तांदुळ, डाळी, औषधे, भाजीपाला, कुक्कुट उत्पादने वगैरे वगैरे आसाम राज्यातुनच इतर राज्यांना पाठविली जातात. आसाम, नागालँड, मणिपूर राज्यातील नागरिकांना आता बंद सारखी नकारात्मक गोष्ट बंद करणे गरजेचे आहे. बंद हा सशस्त्र गटांनी स्वत:च्या कोशातुन उभारलेल्या लढा आहे. स्थानिक प्रशासनाला जबाबदार धरत त्यांना आपला भविष्य कालीन स्वार्थ साधायचा आहे.

**येत्या दशकभराच्या काळात संपूर्ण देशाचा विकास किंवा वाढीचा दर आणि पूर्वोत्तर प्रदेशांचा विकास दर यातील दरी मिटवावी लागेल. या करिता प्रशासनात सुधारणा घडवून आणाव्या लागतील केवळ आर्थिक मदतीचा ओघ वाढवून हे साध्य होणार नाही. केवळ आर्थिक स्रोतच नव्हे तर संस्थात्मक आणि वैयक्तिक क्षमतांचा वापर करुन उपलब्ध स्रोतांचा अधिकाधिक वापर करुन विकासाच्या आड येणारे अडथळे दूर करणे गरजेचे आहे.**

येत्या दशकभराच्या काळात संपूर्ण देशाचा विकास किंवा वाढीचा दर आणि पूर्वोत्तर प्रदेशांचा विकास दर यातील दरी मिटवावी लागेल. या करिता प्रशासनात सुधारणा घडवून आणाव्या लागतील केवळ आर्थिक मदतीचा ओघ वाढवून हे साध्य होणार नाही. केवळ आर्थिक स्रोतच नव्हे तर संस्थात्मक आणि वैयक्तिक क्षमतांचा वापर करुन उपलब्ध स्रोतांचा अधिकाधिक वापर करुन विकासाच्या आड येणारे अडथळे दूर करणे गरजेचे आहे. पूर्वोत्तर क्षेत्रातील सर्व शासन संस्थांनी साऱ्या देशवासीयांनी तांत्रिक सहाय्य करुन या करिता लढा उभारावा लागेल शासन व्यवस्था बळकट करण्याकरिता शासनाला मदत करण्याकरिता आपण सिध्द व्हायला हवे. राज्यशासन आणि नागरी समाज यांची चांगली भागीदारी निर्माण होणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाचे बळकटीकरण येथे महत्वाचे आहे. या अशाच ठिकाणी भारत सरकारला भविष्यात लक्ष देणे आवडेल.

एक शाश्वत असे ध्येय ठरवून निश्चित अशी फलनिष्पत्ती योजून उत्तम नियोजन, सहकार्य, धोरणे आदींचा वापर केल्यास संपूर्ण पूर्वोत्तर प्रदेश निश्चितपणे बलवंत, स्वयंपूर्ण व मुख्य म्हणजे देशाच्या खजिन्यामध्ये सकारात्मक योगदान देणारा ठरेल यात शंका नाही. याची सुरुवात करणे हे अतिमहत्त्वाचे आहे. उत्तम प्रशासन राबविल्यास पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करता येईल. हा नीतिमत्ता आणि प्रशासन या दोहोंचा भाग आहे. सत्तेचे परिणामकारक हस्तांतरण राबविल्यास त्याचप्रमाणे सोशल ऑडिटच्या माध्यमातून आपल्याला सशक्त शासन निर्माण करता येईल, चांगली देखरेख करता येईल, समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचता येईल आणि हळूहळू शासनाचे अस्तित्त्व जाणवू लागेल. शिवाय संस्थात्मक सहभाग आणि स्वयंक्षमतेत वाढ हे महत्त्वाचे मुद्दे दुर्लक्षित करता येणार नाहीत.

■■■

*लेखक पुर्वाश्रमीच्या नियोजन आयोगाचे माजी सचिव असून भारत सरकारच्या अनेक खात्यांच्या सचिवपदाची जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे.*

*email: naresh.saxena@gmail.com*

फोकस

# ईशान्य भारतातील कौशल्यविकास

इबु संजीब गर्ग



**देशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात कार्यरत लोकसंख्या (१५ ते ६४ वयोगट) वाढली असल्यास ती देशाची ताकद, संपत्ती मानली जाते. गेल्या दोन दशकात, जेव्हा जगातल्या इतर देशात कार्यरत लोकसंख्येचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे, तेव्हाच भारतात, मात्र ते प्रमाण वाढते आहे. जगभरातल्या अर्थतज्ज्ञांनी याला देशाच्या जनशक्तीची विभागणी म्हटलं असून, येत्या तीन दशकांत भारताला पाच हजार अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्यात ही जनशक्ती महत्वाची भूमिका बजावेल, असं अर्थतज्ज्ञांचं मत आहे.**

एकविसाव्या शतकातल्या अर्थव्यवस्थेने जगाला नवे आर्थिक आकलन दिले आहे आणि वित्तीय भांडवलीची तसेच देशाच्या शक्तीची नवी परिभाषा करण्यास भाग पाडले आहे. या आर्थिक सामर्थ्याचा महत्वाचा घटक म्हणजे भारताच्या लोकसंख्येची विभागणी. कोणत्याही देशाची लोकसंख्या ही देशाच्या विकासाची क्षमता समजली जाते, देशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात कार्यरत लोकसंख्या (१५ ते ६४ वयोगट) वाढली असल्यास ती देशाची ताकद, संपत्ती मानली जाते. गेल्या दोन दशकात, जेव्हा जगातल्या इतर देशात कार्यरत लोकसंख्येचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे, तेव्हाच भारतात, मात्र ते प्रमाण वाढते आहे. जगभरातल्या अर्थतज्ज्ञांनी याला देशाच्या जनशक्तीची विभागणी म्हटलं असून, येत्या तीन दशकांत भारताला पाच हजार अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्यात ही जनशक्ती महत्वाची भूमिका बजावेल, असं अर्थतज्ज्ञांचं मत आहे.

हे लक्ष्य समोर असताना, भारताने आपल्या कार्यरत लोकसंख्येला अशाप्रकारे तयार करायला हवे जेणेकरून ही लोकसंख्या देशाची लोकशक्ती म्हणून उपयोगात आणता येईल.आणि याच ठिकाणी कौशल्य विकासाच्या महत्वपूर्ण संकल्पनेचे काम सुरु होते. कौशल्य विकास योजनांविषयी केंद्र सरकारने निश्चित केलेल्या नियमावलीची अधिसूचना १५ जुलै २०१५ रोजी जारी केली असून त्यानुसार, कुठल्याही क्षेत्रासाठी दिले जाणारे कौशल्य प्रशिक्षण ज्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील किंवा असे कुठलेही कौशल्य मिळवणे, जे तटस्थ आणि निष्पक्ष संस्थेकडून प्रमाणित करण्यात आले आहे आणि ज्याद्वारे त्याला किंवा तिला नोकरी अथवा स्वयंरोजगारातून आपले उत्पन्न वाढवण्याची संधी मिळेल. त्याशिवाय,एखाद्या कौशल्याचे औपचारिक प्रमाणपत्र मिळेल, ज्यातून त्यांना असंघटीत क्षेत्राकडून संघटीत क्षेत्रातल्या नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. किंवा एखाद्या क्षेत्रात उच्च शिक्षणाची/प्रशिक्षणाची संधी मिळू शकते. कौशल्य विकास हे कुठल्याही व्यक्तीला दिले जाणारे प्रशिक्षण असून त्याद्वारे ती व्यक्ती आपल्या ज्ञान आणि कौशल्याच्या आधारावर एखाद्या नोकरीसाठी पात्र होऊ शकते.

गेल्या दहा वर्षातल्या प्रत्येक सरकारने वित्तीय विकासासाठीचा

महत्वाचा घटक म्हणून कौशल्य विकासाला प्राधान्य दिले. आज तर, कौशल्य विकास आणि उद्यमशिलतेसाठी स्वतंत्र मंत्रालय असून त्या खात्याद्वारे देशातील कौशल्य विकासाची गती आणि रोख याकडे लक्ष दिले जाते. राज्य कौशल्य विकास अभियानासारख्या काही समकक्ष प्रमुख संस्था राज्य पातळीवर कार्यरत असून, त्या राज्यात कौशल्य विकासाचे काम करतात.

आज सगळ्या देशात कौशल्य विकासाकडे लोक आकर्षित होत असताना, ईशान्य भारतात त्याची काय परिस्थिती आहे, हे बघणे रोचक ठरेल. गेल्या काही वर्षात ईशान्य भारताला देशाच्या राजकारणात आणि प्रशासनात अत्यंत महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. ईशान्य भारताला, 'नव्या भारताच्या विकासाचे नवे इंजिन' म्हणून नवी ओळख देणे, हे आज देश ईशान्य भारताकडे कोणत्या दृष्टीने बघतो आहे, याचेच द्योतक आहे. ईशान्य भारतात कौशल्य विकासाच्या क्षेत्रात आजवर झालेली प्रगती, त्या भागाला मिळालेली नवी ओळख सार्थ ठरवते.

अरुणाचल प्रदेशात, अलीकडेच राज्य सरकारने ईशान्य भारत विकास वित्त महामंडळाशी समन्वय साधत, एक सर्वेक्षण अध्ययन हाती घेतले आहे. या अध्ययनाद्वारे, राज्यात कौशल्य विकासाचा पाया बळकट करण्यासाठीचे काम केले जाईल.

केंद्र सरकारने प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत ८७ हजार युवकांना नोकऱ्या देण्याचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे, त्याशिवाय, २०१८-२०१९ या वर्षात चार नव्या तंत्रशिक्षण संस्था उभारण्याचेही लक्ष्य आहे. कौशल्य विकास आणि उद्यमशीलता मंत्रालयाने राज्यभर ग्रामीण कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारी- खाजगी भागीदारीतून ही केंद्रे उभारली जाणार आहेत. ईशान्य भारतात एक विशेष कौशल्य विकास विद्यापीठही लवकरच सुरु केले जाणार असून, देशातला पहिलाच घरात प्रशिक्षण देणारा कौशल्य विकास कार्यक्रम तवांग येथे सुरु करण्यात आला आहे.

**गेल्या काही वर्षात ईशान्य भारताला देशाच्या राजकारणात आणि प्रशासनात अत्यंत महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. ईशान्य भारताला, 'नव्या भारताच्या विकासाचे नवे इंजिन' म्हणून नवी ओळख देणे, हे आज देश ईशान्य भारताकडे कोणत्या दृष्टीने बघतो आहे, याचेच द्योतक आहे. ईशान्य भारतात कौशल्य विकासाच्या क्षेत्रात आजवर झालेली प्रगती, त्या भागाला मिळालेली नवी ओळख सार्थ ठरवते.**

आसाममध्ये रोजगार निर्मिती अभियानाअंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते. त्याशिवाय, आसाम राज्य उपजीविका अभियानाअंतर्गत आणि राष्टीय नागरी उपजीविका योजनेअंतर्गत कौशल्य प्रशिक्षण दिले जात आहे. गेल्या काही वर्षांत, या योजना अतिशय यशस्वी झाल्या आहेत. २०१७ सालच्या शेवटी सरकारने घोषणा केली की, रोजगार केंद्रांचे रुपांतर कौशल्य विकास केंद्रात केले जाईल.

आसाममध्ये नव्यानेच सुरु झालेल्या कौशल्य विकास विभागानेही राज्यात कौशल्य विकास अभियान यशस्वी करण्यासाठी कंबर कसली आहे. येत्या पाच वर्षात आसाममधील ३ लाख नवोदित युवकांना कौशल्य प्रशिक्षित करण्याचे महत्वाकांक्षी ध्येय आसाम सरकारने ठेवले आहे. जेलमधल्या कैद्यांना कौशल्य शिक्षण देणारी 'काराघोर पोरा कारीघोर स्कीम' ही योजना राबवणारे आसाम हे देशातील पहिल्या काही राज्यांपैकी एक राज्य आहे राज्य आहे. या योजनेमुळे कैदी शिक्षा भोगून समाजाच्या मुख्य प्रवाहात परत आल्यानंतर नव्याने आयुष्य सुरु करण्यासाठी व्यवसाय कौशल्य त्यांच्या हाती असणार आहे. त्याशिवाय सरकारने यासंदर्भात सिस्को आणि डाबरसारख्या कंपन्यांशी भागीदारी करार केला असून या कराराअंतर्गत, विभागवार कौशल्य विकास कार्यक्रम राबवले जाणार आहेत. या कार्यक्रमांचा मोठ्या लोकसंख्येला निश्चितच फायदा होईल.

मणिपूर राज्यानेही कौशल्य विकास कार्यक्रम राबवण्याच्या दृष्टीने विविध हितसंबंधी गटांशी चर्चा करण्यासाठी अनेक समित्या स्थापन केल्या आहेत. मणिपूर सरकारने अलीकडेच राज्यातल्या प्रत्येक कुटुंबातल्या एका सदस्याला याप्रमाणे एकूण दीड लाख युवकांना नोकरी देण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यासाठी देशात व्यवसायिक शिक्षण/

प्रशिक्षण देणारी ४० महाविद्यालये सुरु करण्यात आली आहेत. त्याशिवाय आदिवासी महिला आणि शरणागती पत्करलेल्या दहशतवाद्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यावरही मणिपूर सरकारने भर दिला आहे.

मेघालय राज्यातल्या कौशल्य विकास मंत्रालयाने पहिल्या टप्प्यात ७७०० युवकांना कौशल्य प्रशिक्षित केले आहे.इतकेच नाही, तर वेगवेगळ्या उद्योगांमध्ये आणि क्षेत्रात त्यांना नोकरी मिळेल, याचीही व्यवस्था केली आहे. दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना ग्रामीण भागातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण देते आणि त्यांच्यासाठी उद्योग व्यवसायाची दारे उघडून देते. त्याशिवाय पर्यटन, स्वयंचलित मशीन्स आणि देखभाल-व्यवस्था यांसारखी रोजगाराच्या विशेष संधी असलेली क्षेत्रे हेरुन त्यात कौशल्य प्रशिक्षण देण्याचे कामही या योजनेअंतर्गत केले जात आहे.

मिझोराम आणि नागालँड या दोन्ही राज्यांनी त्यांच्या कौशल्य विकास योजनांची सांगड, देशाच्या कौशल्य विकासाच्या उद्दिष्टाशी सुसंगत ठेवली आहे. त्रिपुराने कौशल्य विकासाला प्राधान्य देण्यासाठी वेगळे कौशल्य विकास अभियान हाती घेतले आहे. सिक्कीमने उपजीविका शाळा सुरु केल्या असून तिथे युवकांना विविध क्षेत्रांसाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण तसेच विविध कला आणि हस्तकौशल्याचे प्रशिक्षण दिले जाते. सिक्कीममधल्या या उपजीविका शाळांची कामगिरी सातत्याने उत्तम ठरली आहे. त्यांच्या या शाळांमुळे, राज्यातल्या पारंपारिक कला आणि हस्तकौशल्य उद्योगाला नवसंजीवनी मिळाली आहे. जपानच्या एजुवर्क केंद्राने आपले पहिले उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence), म्हणजेच पहिले कौशल्य विकास केंद्र सिक्कीममध्ये सुरु केले आहे.

ईशान्य भारतातील कौशल्य विकास चळवळ आता उत्तम वेगाने वाटचाल करते आहे, हे तर स्पष्टच आहे, मात्र तरी आजही या मोहिमेसमोर बरीच आव्हाने आहेत. त्यामुळेच, कौशल्यविकास अभियानाची ही गती पुढेही कायम राहावी आणि तिची उद्दिष्टे पूर्ण व्हावीत या दृष्टीने काही आवश्यक पावले उचलणे महत्वाचे आणि गरजेचे आहे. त्यादृष्टीने, पहिली पायरी म्हणजे, प्रत्येक राज्याचे एक सर्वसमावेशक कौशल्य आरेखन तयार करणे. कौशल्य आरेखनामुळे, काही विशिष्ट भागात असलेल्या पारंपारिक ज्ञानकौशल्याची आपल्याला माहिती मिळेल आणि त्या ज्ञानाची सांगड आपल्याला कौशल्याशी घालून रोजगाराचा नवा स्त्रोत आपण निर्माण करु शकू.

**मिझोराम आणि नागालँड या दोन्ही राज्यांनी त्यांच्या कौशल्य विकास योजनांची सांगड, देशाच्या कौशल्य विकासाच्या उद्दिष्टाशी सुसंगत ठेवली आहे. त्रिपुराने कौशल्य विकासाला प्राधान्य देण्यासाठी वेगळे कौशल्य विकास अभियान हाती घेतले आहे. सिक्कीमने उपजीविका शाळा सुरु केल्या असून तिथे युवकांना विविध क्षेत्रांसाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण तसेच विविध कला आणि हस्तकौशल्याचे प्रशिक्षण दिले जाते.**

अशा कौशल्य आरेखनामुळे, विशिष्ट भागात राहणाऱ्या स्थानिक युवकांना त्यांच्याच भागात रोजगार मिळू शकेल. त्यामुळे ग्रामीण भागातल्या युवकांचे शहरी भागात होणारे स्थलांतर कमी होईल. आसाम सरकारने या संदर्भात एक आराखडा आधीच कार्यान्वित केला आहे. उदाहरणार्थ, आसाम राज्यातील बारपेटा जिल्हा. हा जिल्हा स्थानिक फाटके उद्योग आणि बेल धातू हस्तकला यासाठी ओळखला जातो. या विषयाचे प्रशिक्षण देणाऱ्या आय टी आय आणि इतर संस्था आहेत. स्थानिक युवकांना पारंपारिक कौशल्ये आणि आधुनिक तंत्रज्ञान हे दोन्ही शिकता यावे या दृष्टीने ह्या संस्थांचा अभ्यासक्रम नव्यानें तयार करता येईल जेणेकरून या संस्थांमधून प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी बाजाराच्या मागणीनुसार कुशल झालेले असतील. त्याचवेळी या क्षेत्रात मध्यम छोट्या आणि सूक्ष्म उद्योगांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या औद्योगिक वसाहती विकसित करता येतील. या संपूर्ण व्यवस्थेमुळे युवकांना मिळालेले कौशल्य प्रशिक्षण त्यांच्यासाठी रोजगार मिळवून देणारेही ठरेल, हे आपण सुनिश्चित करु शकतो. कुंभारकाम आणि सीताल पट्टी प्रसिद्ध असलेला कछार जिल्ह्यात अशाच प्रकारची व्यवस्था विकसित केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे सोनितपूर जिल्ह्यातले धान उत्पादन आणि त्याचा अनुभव बघता तिथे राईस मिल सुरु करता येतील.

ईशान्य भारतातील इतर राज्यांनीही आपापल्या प्रदेशातले पारंपारिक उद्योग आणि कौशल्ये तसेच

इतिहास आणि भौगोलिक परिस्थितीचा विचार करून त्यानुसार रोजगार निर्माण करणारी कौशल्य विकास आरेखने तयार करायला हवी आणि त्या त्या प्रदेशाशी सुसंगत रोजगार निर्माण होतील असे प्रशिक्षण द्यायला हवे. रबर शेती मध्ये आघाडीवर असलेल्या त्रिपुरामध्ये याच उद्योगात महत्वाकांक्षी स्थान निर्माण करण्याची क्षमता आहे. त्रिपुरामध्ये निर्माण होणारे रबर आजूबाजूच्या देशातही निर्यात करता येईल. ईशान्य भारताला पूर्व आशियाई शेजारी देशांशी जोडण्याच्या रेल्वेच्या योजनेमुळे अशा व्यापाराला अधिकच चालना मिळेल. त्यामुळेच आज रबर उद्योगासाठी युवकांना प्रशिक्षित करणारी एक भक्कम कौशल्य विकास यंत्रणा विकसित करणे नितांत गरजेचे आहे. नागालँडमध्ये दर वर्षी होर्नबील महोत्सव साजरा केला जातो. आज राष्ट्रीय उत्सव झालेल्या या महोत्सवाला केंद्रस्थानी ठेऊन नागालँडमध्ये पर्यटन विकसित केले जाऊ शकते. पर्यटनामध्ये केवळ वरवरची पर्यटनस्थळे न दाखवता त्यापेक्षाही अधिक खोलवर त्याचा विकास केला पाहीजे. उदाहरणार्थ मेघालय इथले पर्यटन सोहरा, दावकी किंवा अद्याप फारशा परिचित नसलेल्या जैंतिया टेकड्यांपर्यंत पोहोचविले जाऊ शकते. या भागात खाणे पिणे, आतिथ्यशीलता, साहसी खेळ अशा सर्व व्यवस्था विकसित करून पर्यटनातले उत्कृष्टता केंद्र बनविणे शक्य आहे.

कौशल्य विकासाला अधिक महत्व देऊ शकणारी दुसरी उपाययोजना म्हणजे त्याचा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी समन्वय साधणे. हे करण्यासाठी इथे बनणाऱ्या पारंपारिक वस्तू आणि खाद्यपदार्थांना जागतिक स्तरावर विशेषत: शेजारी राष्ट्रांमध्ये बाजारपेठ कशी मिळेल हे शोधले पाहिजे. बांगलादेशमधल्या प्राण फूड्स यांनी हे मॉडेल राबविले आहे. बांगलादेशमधल्या या अन्न प्रक्रिया कंपनीने ईशान्य भारतात लीची ज्यूस आणि इतर खाद्य पदार्थ पोहोचवून अगदी दूरवर आपली बाजारपेठ निर्माण केली आहे. गेल्या काही वर्षात या कंपनीने

**रबर शेती मध्ये आघाडीवर असलेल्या त्रिपुरामध्ये याच उद्योगात महत्वाकांक्षी स्थान निर्माण करण्याची क्षमता आहे. त्रिपुरामध्ये निर्माण होणारे रबर आजूबाजूच्या देशातही निर्यात करता येईल. ईशान्य भारताला पूर्व आशियाई शेजारी देशांशी जोडण्याच्या रेल्वेच्या योजनेमुळे अशा व्यापाराला अधिकच चालना मिळेल. त्यामुळेच आज रबर उद्योगासाठी युवकांना प्रशिक्षित करणारी एक भक्कम कौशल्य विकास यंत्रणा विकसित करणे नितांत गरजेचे आहे.**

ईशान्य भारतातल्या अनेक प्रदेशांत आपले भक्कम स्थान निर्माण केले आहे. ईशान्य भारतातील राज्येही या सीमापार व्यापाराचा फायदा घेऊ शकतात आणि आजुबाजूच्या राज्यांमधल्या गरजा लक्षात घेऊन त्यानुसार आपली उत्पादने तयार करून निर्यात करु शकतात. उदाहरणार्थ, ईशान्य भारतातील कशिदाकारीची उत्तम परंपरा असलेले गमछे आणि शाली आजूबाजूच्या राज्यात विकल्या जाऊ शकतात. प्राण फूड कंपनीच्या विस्ताराचा अभ्यास करून, त्यानुसार, शेजारच्या देशात नेमक्या कोणत्या प्रदेशात ईशान्य भारतातील उत्पादनांना बाजारपेठ मिळू शकेल, हे सुनिश्चित केले पाहिजे. पूर्व आशियाई देशांशी लागून असण्याचा फायदा घेत ईशान्य भारतातील राज्यांनी आपला विकास साधायालाच हवा.

तिसरी उपाययोजना म्हणजे, राष्ट्रीय कौशल्य गुणवत्ता आराखडा मानक स्वीकारून त्यानुसार लाभआधारित दृष्टीकोन ठेवणे. एकदा हे मॉडेल स्वीकारले की ते प्रत्येक राज्याच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेईल आणि त्यातल्या त्रुटी लक्षात आणून देत त्या दूर करण्यासाठी निरंतर प्रयत्न करत राहावे लागतील.

महत्वाकांक्षी युवकांना तरुण वयातच हेरून त्यांच्यातल्या क्षमता विकसित करण्याचा आधीपासूनच प्रयत्न करायला हवा, म्हणजे शाळा कॉलेज सोडून जाण्याचे प्रमाण कमी करता येईल. याच दृष्टीने शाळा कॉलेजमध्ये व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा निर्णय एक स्वागतार्ह पाऊल आहे. ईशान्य भारतातील युवकांमधल्या उद्यमशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी, त्या त्या प्रदेशातील यशस्वी उद्योजकांच्या यशोगाथा शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करायला हव्यात.

कौशल्य विकासाचे काम नक्कीच मोठे आहे, यात शंका नाही. मात्र त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा सध्या मर्यादित आहेत. त्यामुळेच, ईशान्य भारतातील राज्य सरकारांनी आतापर्यंत वापरात न आलेल्या सरकारी पायाभूत सुविधांचा वापर, कौशल्य विकासासाठी केला तर पायाभूत सुविधांची कमतरता

थोड्याफार प्रमाणात भरून निघू शकेल.

कौशल्य विकासासाठीच्या सुधारित राष्ट्रीय धोरणानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधांचा कौशल्य विकासासाठी जास्तीत जास्त उपयोग कसा होऊ शकेल, याविषयी मार्गदर्शन मिळू शकेल.या प्रदेशात खाजगी प्रशिक्षण संस्थाचा वावरही वाढवायला हवा.


कदाचित कंपन्याच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या तत्वाची (CSR) प्रशिक्षणाशी सांगड घालून त्यांना त्या अंतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्था म्हणून काम करण्यास सांगितले जाऊ शकते. आसाम वगळता,सध्या इतर कुठल्याही राज्यात प्रशिक्षण आणि प्रशिक्षणार्थीसाठी वेगळी संस्था नाही, याकडे लक्ष देऊन अशा संस्था सुरु करण्यासाठी त्वरित प्रयत्न करायला हवेत.

गेल्या काही वर्षात, या राज्यात, कौशल्य विकास क्षेत्रात फार मोठी वाढ झाली आहे. यामुळे या भागात रोजगाराच्या संधीही वाढल्या आहेत. मात्र आज ईशान्य भारताला मिळालेले आर्थिक महत्व लक्षात घेता, या भागात कौशल्य विकास आणखी मजबूत करण्याची गरज आहे. जपान आणि कोरिया सारख्या आशियाई देशातील लोक वार्धक्याकडे झुकू लागतील, तेंव्हा या देशांना कुशल कामगारांची गरज भासणार आहे. भारत ही दरी भरून काढू शकतो. ही दरी भरून काढण्यासाठी त्यातल्या त्यात ईशान्य भारत सर्वोत्तम जागा आहे. ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर, ईशान्य भारतात कौशल्य विकासाची सद्यस्थिती आणि त्यानंतरच्या रोजगार निर्मितीच्या काळात येणारी आव्हाने पेलण्याच्या दृष्टीने नवनवी धोरणे आखली आणि सध्याचा वेग कायम राखला तर ईशान्य भारतातील युवकांचे भविष्य उज्वल आहे.

■■■

*लेखक दिल्ली येथे सहायक सहकार आयुक्त असून ईशान्य भारताशी संबंधित विकास आणि धोरणाविषयक घडामोडींचे अभ्यासक आहेत.*

*email : pabloo8690@gmail.com*



# शिक्षणासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद

**शालींदर शर्मा आणि डॉ. शशीरंजन झा**



**नुकताच जाहीर झालेला अर्थसंकल्प, हा गेल्या दशकातल्या अर्थसंकल्पापेक्षा आगळा आहे.या वर्षीच्या अर्थसंकल्पात शिक्षणावर स्पष्ट भर देण्यात आला असून शिक्षण, शैक्षणिक, शिक्षक हे शब्द ३५पेक्षा जास्त वेळा वापरण्यात आले आहेत, कदाचित गेल्या दशकात सर्वात जास्त वेळा. अर्थसंकल्पीय भाषणात सर्वंकष दृष्टीकोनावर स्पष्ट भर देण्यात आला असून ते व्यवस्थेवर विचार करण्याला चालना देणारे आहे.**

भारतीय शिक्षण क्षेत्र सध्या मोठ्या सुधारणा अनुभवत आहे.एकीकडे सल्ला मसलतीच्या माध्यमातून नवे शिक्षण धोरण विकसित करण्यात येत आहे तर दुसरीकडे आय आय टी, आय आय एम, केंद्रीय विद्यापीठे आणि उच्च शिक्षण आणि संशोधन या संबंधी विविध कायदेविषयक सुधारणा/ विधेयके तयार करण्यात येत असून उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था बळकट करून त्यांच्या विस्ताराकडे लक्ष पुरवण्यात येत आहे.शिक्षण व्यवस्था नेहमीच शिक्षक, धोरण, आर्थिक पाठबळ, या किंवा दुसऱ्या एखाद्या समस्येने ग्रासलेली असते.


नुकताच जाहीर झालेला अर्थसंकल्प, हा गेल्या दशकातल्या अर्थसंकल्पापेक्षा आगळा आहे.या वर्षीच्या अर्थसंकल्पात शिक्षणावर स्पष्ट भर देण्यात आला असून शिक्षण, शैक्षणिक, शिक्षक हे शब्द ३५पेक्षा जास्त वेळा वापरण्यात आले आहेत, कदाचित गेल्या दशकात सर्वात जास्त वेळा. अर्थसंकल्पीय भाषणात सर्वंकष दृष्टीकोनावर स्पष्ट भर देण्यात आला असून ते व्यवस्थेवर विचार करण्याला चालना देणारे आहे. शालेय शिक्षण क्षेत्रात एकात्मता, एकात्मिक बी एड या सारखी उचललेली पाऊले यातून हे स्पष्ट होते. प्रशिक्षित नसलेल्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यावर, अर्थसंकल्पीय भाषणात लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.


शिक्षणातल्या गुंतवणूकीकडे केवळ आर्थिक गुंतवणूक या दृष्टीने न पाहता, संसाधनांची गुंतवणूक म्हणून आणि उपलब्ध निधीचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. एस एस ए,आर एम एस ए यासारख्या उपक्रमात दीर्घकालीन सातत्य पूर्ण भांडवली गुंतवणूक केल्यानंतर या क्षेत्रात दर्जा उंचावण्यासाठी आणि बळकट करण्यासाठी गुंतवणूक केली जात आहे.

आर टी ई कायद्याच्या १२ (१) (c) नुसार खाजगी विना अनुदानित शाळांनी,प्रवेश स्तरावरच्या वर्गात वंचित क्षेत्रातल्या मुलांना २५ टक्के जागा राखीव ठेवणे कायद्याने बंधनकारक केले आहे. यासह इतर घटकांमुळे सरकारी शाळात विद्यार्थ्यांची नोंदणी घटली असून खाजगी शाळात विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. नोंदणी आणि अर्थसंकल्पीय तरतूद यांचे विश्लेषण याप्रमाणे आहे.

सरकारी शाळात,एस एस ए आणि आर एम एस ए सारख्या योजनांअंतर्गत प्रत्येक मुलामागे उपलब्ध सरासरी रकमेत वाढ झाल्याचे आढळून येत आहे. (पूढील तक्ता )

यंदाच्या अर्थसंकल्पीय भाषणात आणखी एक मोठे आणि धाडसी पाऊल अधोरेखित करण्यात आले आहे ते म्हणजे शिक्षणाशी संबंधित केंद्र पुरस्कृत योजनांच्या सुसूत्रीकरणावर लक्ष केंद्रित करणे. केंद्र पुरस्कृत शिक्षण विषयक सध्याच्या विविध योजनांचे एकत्रीकरण आवश्यकच होते कारण या योजना कप्प्याकप्प्या प्रमाणे राबवल्या जात होत्या आणि ताळमेळ तसेच लवचिकता यांच्या अभावामुळे त्या अकार्यक्षम ठरत होत्या.यामुळे अनेकदा अंमलबजावणीच्या सर्व स्तरावर व्यवस्थापकीय प्रयत्नांची पुनरावृत्ती आणि गोंधळाबरोबरच निधीच्या ओघात लवचिकतेला वाव राहत नसे.





दुसऱ्या योजनेत निधीचा पुन्हा विनियोग शक्य नाही ,एका योजनेला अतिरिक्त निधीची तातडीने आवश्यकता असली आणि दुसऱ्या योजनेत निधी पडून असला तरी निधी वळवता येत नसल्याने काही योजनांसाठी निधीची चणचण तर काही योजनांचा निधी वापराविना पडून राहत असे. संस्थात्मक स्तरावर तर परिस्थिती अधिकच गंभीर असे. पहिली ते बारावी पर्यंतच्या सरकारी शाळांना ( एस एस ए,आर एम एस ए,एमडीएम, राज्य)यांचे वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळे निकष पाळावे लागत असत आणि या सर्व योजनांसाठी वेगवेगळ्या प्राधिकरणासाठी स्वतंत्र देखरेख विषयक माहिती पुरवावी लागत असे त्याच बरोबर वेगळी खाते नोंद ठेवावी लागते.ही बहुस्तरी रचना शालेय स्तरापासून उच्चशिक्षण स्तर म्हणजे राष्ट्रीय स्तर, एमएचआरडी पर्यंत आहे.

आदिवासी भागात शिक्षण स्थिती सुधारण्याबाबत या अर्थ संकल्पात मोठी आघाडी घेण्यात आली आहे. याचे फलित म्हणून ईशान्य भागातल्या राज्यांसह देशाच्या मोठ्या भागात, व्यापक प्रमाणात शिक्षण क्षेत्र बळकट होईल. प्रत्येक राज्यात १ सरकारी वैद्यकीय महाविद्यालय असेल अशी तरतूद अर्थ संकल्पात करण्यात आली आहे. आदिवासी विद्यार्थी विशेषत: ईशान्येकडील विद्यार्थ्यांची गळती रोखण्याच्या सध्याच्या प्रयत्नांना अर्थसंकल्पीय भाषणात चालना देण्यात आली आहे,त्यासाठी मॅट्रीकपूर्व आणि मॅट्रीक नंतरच्या शिष्यवृत्तीच्या खर्चात वाढ करण्यात आली आहे. ही वाढमॅट्रीकनंतरच्या १९ लाख विद्यार्थ्यांना तर मॅट्रीक पूर्व २० लाख आदिवासी विद्यार्थ्यांना लाभदायक ठरेल अशी अपेक्षा आहे. अर्थ संकल्पीय तरतुदी खेरीज ईशान्येकडच्या राज्यात जिथे बरेचसे विद्यार्थी किमान शिक्षण पातळी गाठल्या शिवायच शाळा सोडतात अशा भागात शिक्षणाचा दर्जा उंचावण्यावर भर देण्यात आला आहे.

## पुढचा मार्ग

शिक्षणावरच्या सार्वजनिक खर्चात भारत पूर्वापार रुढीप्रिय राहिला आहे.एनपीई द्वारे सुधारणांसाठी, शिक्षणासाठीच्या सार्वजनिक खर्चात भरीव वाढ आवश्यक आहे. त्याच बरोबर सी एस आर आणि सी एस ओ च्या माध्यमातून पाठिंबाही गरजेचा आहे. शिक्षण क्षेत्राला भक्कम बळ मिळण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी आंतरराष्ट्रीय विकास भागीदाराच्या शोधात राहिले पाहिजे. डी एफ आय डी, जागतिक बँक,ए डी बी यासारखे आंतरराष्ट्रीय भागीदार केवळ आर्थिक सहाय्याद्वारे योगदान देतात असे नव्हे तर उत्तम प्रथांचा आंतरराष्ट्रीय अनुभवही घेऊन येतात.तंत्र विषयक सहकार्य आणि क्षमता वृद्धी कार्यक्रमाद्वारेही विकास भागीदार आपले योगदान देऊ शकतात.

शैक्षणिक योजनांचे एकत्रीकरण अनेक बाजूनी उपयुक्त ठरणार असून १) या क्षेत्रासाठीच्या उपलब्ध




निधीचा पुरेपूर वापर २) राज्यांच्या आणि केंद्र शासित प्रदेशांच्या वैविध्यपूर्ण गरजा पूर्ण करणे ३)प्रभावी व्यवस्थापन, देखरेख ठेवणे सुलभ ४) प्रशासकीय खर्चात कपात ५) निधीचा ओघ वाहता ठेवणे ६)वित्तीय नियंत्रण आणि शिस्त यासाठी संस्थागत यंत्रणा याद्वारे अपेक्षित आहे.

जागतिक पातळीवर स्पर्धेत टिकून राहण्यासाठी, भारताकरिता शिक्षणात दर्जात्मक सुधारणा अतिशय आवश्यक आहे. शैक्षणिक धोरणात, शाळांचे आकारमान,त्यांच्या आर्थिक क्षमता, शिक्षकांचा सातत्याने व्यावसायिक विकास, शिक्षणाच्यादर्जाचे मुल्यांकन यासारख्या विस्तृत मुद्द्यांची दखल घेणे आवश्यक ठरते. संस्थात्मक आणि स्थानिक स्तरावर निर्णय प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठीचा मार्ग मोकळा करण्याची आवश्यकता आहे. यामुळे यशस्वी शैक्षणिक परिवर्तनाच्या जलदगती अंमलबजावणीला मदत होणार आहे.

येत्या काळात नव्या धोरणाची अंमलबजावणी कशी होते हे पाहावे लागेल. हे धोरण जास्तीत जास्त प्रभावी ठरण्यासाठी बारकाईने लक्ष ठेवणे नक्कीच आवश्यक आहे.

■■■

*लेखक द्वयी एज्युकेशन अ‍ॅण्ड स्किल डेव्हलपमेंट आय.पी.ई. ग्लोबल लिमिटेड या संस्थेचे अनुक्रमे उपाध्यक्ष आणि वरिष्ठ व्यवस्थापक आहेत.*

*email : shalender@gmail.com*
*email : siha@ipeglobal.com*





**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**


**एका पुस्तकाची किरकोळ**
**विक्री**
**किंमत ३० रुपये प्रत्येकी**

**चार पुस्तकांचा संच**
**१०० रु.**

परिप्रेक्ष्य

# बांबू मिशन - आर्थिक उत्कर्षासाठीचे एक साधन

निरेंद्र देव



**आदिवासींसह तिथल्या स्थानिक लोकांच्या शेती करण्याच्या पारंपरिक पद्धती या कृषी- जैव विविधता आणि ज्ञान यावर आधारीत आहेत. सर्वसाधारणपणे शेतकरी झूम किंवा बदलत्या प्रकारची शेती करतात, आणि त्या बरोबरच काही बैठे कृषी व्यवसाय करतात. साधन संपत्ती वापरताना आदिवासी आणि इतर समुदायातले लोक स्थानिक आणि पारंपारीक ज्ञानाचा आधार घेतात, त्यामुळे साधनसंपत्तीचा वापर सातत्याने करण्यासाठी मदत होते.**

ईशान्य भारताच्या कुठल्याही गोष्टीचे मूळ हे त्यांच्यात असलेल्या स्वाभाविक लवचिक शक्तीमध्ये आहे. त्यांची कृषी व्यवस्था आणि लागवड करण्याची पारंपरिक पध्दत म्हणजे त्यांच्यातल्या लवचिकपणाच्या सामर्थ्याचा मुख्य पैलू आहे.डोंगरावर असो किंवा खोऱ्यामध्ये शेती हाच या भागातल्या लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. स्थानिक लोक पिकवत असलेले भात,धान्य किंवा इतर कोणत्याही पीकाची शेती पारंपरीक पध्दतीनेच केली जाते. ही पद्धत पारंपरीक ज्ञानाबरोबरच पर्यावरणातल्या घटकांशी जुळवून घेत बनली आहे. सात बहिणी असे कौतुकाने म्हटले गेलेल्या या ईशान्येकडच्या सात राज्यातल्या लोकांना शेतीच्या या पारंपरिक पद्धतीमुळेच पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य झाले आहे.

आदिवासींसह तिथल्या स्थानिक लोकांच्या शेती करण्याच्या पारंपरिक पद्धती या कृषी- जैव विविधता आणि ज्ञान यावर आधारीत आहेत. सर्वसाधारणपणे शेतकरी झूम किंवा बदलत्या प्रकारची शेती करतात, आणि त्या बरोबरच काही बैठे कृषी व्यवसाय करतात. साधन संपत्ती वापरताना आदिवासी आणि इतर समुदायातले लोक स्थानिक आणि पारंपारीक ज्ञानाचा आधार घेतात, त्यामुळे साधनसंपत्तीचा वापर सातत्याने करण्यासाठी मदत होते.

स्थानिक शेतकरी त्यांच्या शेतीच्या स्थानिक पद्धतीनुसार लहान मोठी पिके घेतात, ज्यामुळे त्यांचा जोखमीच्या आणि कठीण परिस्थिती मध्ये निभाव लागू शकतो. लागवड केलेल्या पिकाच्या प्रकारावरच शेतीची पद्धत, उर्जेची कार्यक्षमता आणि उत्पन्न अवलंबून असते. साहजिकच, एक उदाहरण द्यायचे झाले तर, ज्या क्षेत्रात तांदळाबरोबरच मका किंवा ज्वारी बाजरी इत्यादी धान्य पिकतात त्या क्षेत्रात जास्त उत्पादकता आढळून येते असे पारंपारीक शेतकऱ्याचे मत आहे.

सर्वसाधारणपणे वेगवेगळे पारंपरिक समाजातले लोक दोन महत्वाच्या प्रकारच्या शेती करतात. बदलती शेती आणि जाळून करायची शेती. याशिवाय पठारावरही शेती केली जाते. पठारावरची शेती ही खोऱ्यामधे आणि डोंगराच्या पायथ्याशी केली जाते. तर जंगलामध्ये आणि आजुबाजूला बदलती शेती केली जाते. बदलत्या लागवड पद्धतीला ईशान्येमध्ये झूम लागवड असे म्हणतात. ही प्राचीन पद्धत आहे. यामध्ये मोसमी पाऊस सुरु होण्याअगोदर डोंगरावरच्या

जमिनीवरचा झाड-पाला साफ करून जमीन जाळली जाते आणि शेतीसाठी तयार केली जाते. सुरवातीला झूम पद्धतीने शेतीचे चक्र चांगले चालले होते. त्यानंतर मात्र वाढती लोकसंख्या आणि जमिनीवरचा वाढता ताण यामुळे झूम पध्दतीचा वापर कमी होत गेला, परिणामी जमीनीचा कस कमी झाला आणि त्या परिसरातल्या पर्यावरणालाही धोका उत्पन्न झाला.

### नाविन्य हाच उपाय

तथापि ईशान्य भारतातले आदिवासी शेतकरी आपली कल्पकता आणि कौशल्य वापरू शकतात. परिणामी स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या साधनांचा ते सर्वोत्क्रृष्ट वापर करतात. यामध्ये एक वेगळी पद्धत म्हणजे पायरी पद्धतीने डोंगर उतारावर लागवड करणे. यामध्ये मातीची धूप थांबवण्यासाठी आणि वाफ्यांची चांगली देखभाल व्हावी म्हणून दगड आणि गोणपाटाच्या पिशव्या यांचा देशी पध्दत वापरून कल्पकतेने वापर केला जातो. डोंगरावरच्या झऱ्यांचे पाणी अडवून चरांच्या सहाय्याने सगळीकडे खेळवले जाते. अश्याप्रकारे पाण्याची आवश्यकता पूर्ण होते. या पद्धतीमध्ये उतार असल्यामुळे वरच्या बाजूकडून खालच्या बाजूकडे पाणी पुरवठा अखंड सुरु रहातो. कस नसलेल्या जमिनीसाठी, विशेषत:भाताचे पीक घेताना या प्रकारचे प्रयोग यशस्वी झाले आहेत. तज्ञांच्या मतानुसार, या पद्धतीचा आणखी एक महत्वाचा फायदा म्हणजे डोंगरावरून पाण्याबरोबर वाहून जाणारी माती ही अतिशय पोषक असते. पायरी पद्धतीने प्रामुख्याने भाताची लागवड करताना मका, द्विदल धान्य आणि बटाटे, ज्यांना कमी पाण्याची गरज असते ते उताराच्या वरच्या बाजुला लावतात आणि तांदूळ आणि ताग हे उताराच्या खालच्या बाजूला लावतात.

जिथे शेतीची अतिशय कष्टाची कामे असतात, तिथे ‘आर्थिक परताव्याचे’ महत्त्व शेतकऱ्यांच्या लक्षात आलेले आहे, विशेषत: नागालँड, मेघालय आणि मणिपूरमधल्या शेतकऱ्यांना याची जाणीव आहे. त्यामुळे वृक्ष लागवडीवर आधारीत शेतीच्या पध्दतीला सुध्दा पारंपारीक लोकांकडून प्रोत्साहन दिले जाते, यामध्ये शेती करताना पीक उत्पादन आणि वृक्ष लागवडीला मोठ्या प्रमाणावर एकत्र केले जाते. शेतीचा प्रकार आणि हवामान या दोन्हींवर लक्ष केंद्रीत केले जाते.

**ईशान्य भारतातले आदिवासी शेतकरी आपली कल्पकता आणि कौशल्य वापरू शकतात. परिणामी स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या साधनांचा ते सर्वोत्क्रृष्ट वापर करतात. यामध्ये एक वेगळी पद्धत म्हणजे पायरी पद्धतीने डोंगर उतारावर लागवड करणे. यामध्ये मातीची धूप थांबवण्यासाठी आणि वाफ्यांची चांगली देखभाल व्हावी म्हणून दगड आणि गोणपाटाच्या पिशव्या यांचा देशी पध्दत वापरून कल्पकतेने वापर केला जातो. डोंगरावरच्या झऱ्यांचे पाणी अडवून चरांच्या सहाय्याने सगळीकडे खेळवले जाते.**

ज्या झाडांपासून अन्न, फायबर, औषधे तसेच इतर लहान कृषी उत्पादने मिळू शकतील अशाच झाडांची लागवड केली जाते, असे स्थानिक जाणकारांचे म्हणणे आहे. त्यामुळे भाज्या, फळे,जंगलातील विविध झाडे, पिकांची लागवड आणि शेतातील पिके यासाठी जमिनीचा वापर केला जातो. तसंच पारंपारीक वृक्ष आणि झुडुपांची लागवडीसाठी निवड करताना त्यांचे उपयोग आणि आर्थिक परतावा लक्षात घेऊन प्राधान्यक्रम दिला जातो.

जेव्हा शाश्वत काम आणि आर्थिक सुधारणा यांचा मुद्दा येतो त्यावेळी ईशान्येकडचे लोक हे वर्षानुवर्षे बांबूच्या लागवडीवर अवलंबून रहातात.

ईशान्येकडच्या भागातल्या जमिनीचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जंगल पर्यावरण. या जंगल पर्यावरणाचा एक अतिशय महत्वाचा घटक म्हणजे बांबू. इथल्या आदिवासींची तसेच इतर रहिवीशांची पारंपरिक जीवनशैली, या विविध प्रकारांनी उपयोगी पडणाऱ्या बांबूवर पूर्णपणे अवलंबून आहे. आधुनिक समाजामधे सामाजिक – आर्थिक प्रगती होण्यासाठी लागणारे अमर्याद सामर्थ्य बांबूमध्ये आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. या प्रदेशात, ग्रामीण अर्थव्यवस्था, औद्योगिक विकास तसेच भक्कम आर्थिक पाया याबाबत शाश्वत प्रगती होण्याकरता बांबूमध्ये प्रचंड क्षमता आहे.

### हिरवे सोने

२०१८-१९ च्या केंद्रिय अर्थसंकल्पामध्ये बांबूला ‘हिरवे सोने’ असे यथार्थपणे म्हटले आहे. बांबू हा गवताचा एक महत्वाचा प्रकार आहे. मात्र त्याचे वर्गीकरण वृक्ष या प्रकारात केल्यामुळे ईशान्येकडचे मूळ रहिवासी गेले शतकभर त्याचा पूर्णपणे व्यावसायिक उपयोग करु शकले नाहीत. संपूर्ण भारतापैकी सुमारे

६८ % बांबू हा भारताच्या ईशान्य भागात होतो.त्याचप्रमाणे भारतात संपूर्ण जगाच्या अंदाजे ३०% बांबू लागवड आहे, मात्र जागतिक बाजारपेठेत भारताचा फक्त ४% सहभाग आहे. या साठी कमी उत्पादन ही समस्या आहे आणि ईथेच केंद्र सरकारच्या मिशन बांबू या योजनेचे महत्व दिसून येते.

ही योजना केंद्र सरकारने राज्यांच्या समन्वयाने प्रायोजित केलेली असून या मध्ये १०० टक्के निधी केंद्र सरकार कडून मिळतो. बांबूवर आधारीत हस्तकलेच्या वस्तूंना आणि बांबूला प्रोत्साहन देणे तसेच कुशल आणि अकुशल लोकांसाठी विशेषत: बेरोजगार तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या योजनेचे ऊद्दिष्ट आहे.

ईशान्येमध्ये पिढ्यानपिढ्या तिथल्या मूळच्या पारंपरिक बांबू उत्पादकांनी बांबूचा वापर एकुणच शहरी तसेच ग्रामीण भागाच्या फायद्यासाठी केला. बांबूची लागवड अकृषिक जमीनीवरही करता येते आणि वार्षिक पीकही घेता येते म्हणून लोकांनी त्याचा पुरेसा व्यापारी उपयोग केलेला आहे.

औद्यौगिक लाभाव्यतिरिक्त काही समाजात बांबूच्या अंकुरांचा पौष्टिक अन्न म्हणुनही उपयोग केला जातो. बांबूचे अंकूर हे वैद्यकीय दृष्ट्याही महत्वाचे आहेत. बांबूमुळे जमिनीचे संरक्षण होते, मातीची जलधारण क्षमता वाढण्याबरोबरच मातीच्या दर्जात सुधारणा होते,तसेच मोठ्या प्रमाणात पाण्याची साठवण आणि पुनर्भरण करुन शेती आणि अन्नसुरक्षेला अतिशय फायदेशीर ठरणारे बांबू हे उत्पादन आहे, ही वस्तुस्थिती मिझोराम, त्रिपुरा आणि नागालँड राज्यातल्या आदिवासी बांबू उत्पादकांना चांगली माहिति आहे.

नोव्हेंबर २०१७ मध्ये सरकारने बांबूचे नाव वृक्षांच्या यादितून काढून टाकले आणि त्याबरोबरच बांबुच्या, तोडणी, वाहतूक आणि प्रक्रियेबाबत नियम शिथील केले. यामुळे गेली ९० वर्षे लागू असलेले निर्बंध नष्ट झाले आणि बांबू उत्पादनाच्या मुक्त निर्यातीला प्रोत्साहन मिळाले. तसेच नवीन संधी खुल्या झाल्या. दरम्यान आसाममधल्या नुमालीगढ इथल्या शुद्धीकरण कारखान्याच्या आगामी जैव-शुद्धिकरणासाठी बांबूचा पुरवठा करण्याचे अरुणाचल प्रदेश आणि मणिपुरच्या सरकारने मान्य केले आहे. यासाठी आर्थिक कार्य नुकतेच सुरू झाले आहे.

**नोव्हेंबर २०१७ मध्ये सरकारने बांबूचे नाव वृक्षांच्या यादितून काढून टाकले आणि त्याबरोबरच बांबुच्या, तोडणी, वाहतूक आणि प्रक्रियेबाबत नियम शिथील केले. यामुळे गेली ९० वर्षे लागू असलेले निर्बंध नष्ट झाले आणि बांबू उत्पादनाच्या मुक्त निर्यातीला प्रोत्साहन मिळाले. तसेच नवीन संधी खुल्या झाल्या. दरम्यान आसाममधल्या नुमालीगढ इथल्या शुद्धीकरण कारखान्याच्या आगामी जैव-शुद्धिकरणासाठी बांबूचा पुरवठा करण्याचे अरुणाचल प्रदेश आणि मणिपुरच्या सरकारने मान्य केले आहे. यासाठी आर्थिक कार्य नुकतेच सुरू झाले आहे.**

इतक्यावरच सरकारचे समाधान झाले नाही. या सर्वांव्यतिरिक्त बांबू उत्पादकांना कायम स्वरुपी महसूलाचे साधन मिळावे म्हणून बांबू क्षेत्रासाठी सरकार नाविन्यपूर्ण योजनांची आखणी करत आहे. यामुळे अनेक राज्यांमधल्या बांबूवनांची मालकी असलेल्या स्थानिक गटांना लाभ मिळेल.

राष्टीय बांबू मिशन या योजनेची ''सर्वंकष दृष्टीकोनातून पुनर्रचना'' करण्यासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी १२९० कोटी रुपये मंजूर केले आहेत.

त्रिपुरासारख्या राज्यात उपजीविकेचे महत्वाचे साधन म्हणून बांबू क्षेत्राचा विकास होऊ शकतो तसेच सुमारे २० हजार बांबू उत्पादकांना विश्वासार्ह आणि सन्मानजनक रोजगाराच्या संधी मिळू शकतात असे अधिकृत अंदाजपत्रकात सुचवले आहे.

एखाद्या क्षेत्रामध्ये बांबूपासून मिळणारी वेगवेगळी उत्पादने आणि उप – उत्पादने समजून घेण्यासाठी खाली दिलेल्या यादीकडे बघणे इष्ट ठरेल.

यामध्ये – बांबूचे लोणचे, बांबूचा सिरका, फुलदाणी, टोपल्या,अगरबत्तीच्या काड्या, मोबाईल फोनचे कव्हर, दात कोरणे, पेन स्टॅंड, लाकडी वस्तू, दागिने, खाण्यासाठी उपयुक्त बांबूचे अंकूर, शवपेटी, झाडू,चहाचा कप ठेवण्यासाठी ताटल्या, की चेन, तसबिरीसाठी चौकट, हॅंगर्स, ॲश ट्रे, शिड्या आणि पाण्याच्या बाटलीसाठी कव्हर – यांचा समावेश आहे.

स्थानिक कारागिर त्यांच्या पारंपारिक कौशल्याचा वापर करून वेताच्या आणि काही जंगली पानांचा

उपयोग करून सुंदर गोलाकार टोप्या बनवतात. या गोलाकार टोप्या तसेच इतर उत्पादनांमध्ये, मोठ्या प्रमाणात निर्यात होण्याची क्षमता असुनही या बाजारपेठेचा अजून पुरेपूर उपयोग केला गेलेला नाही. यासाठी ईशान्येमध्ये खाजगी कंपन्या आणि मोठे व्यावसायिक यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे नक्कीच फायदेशीर ठरेल.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेचकऱ्यांना कोठारांमध्ये धान्य ठेवण्यासाठी जे मोठे डबे लागतात त्यासाठीही बांबू उपयुक्त ठरतो. धान्य- मग ते वापरण्यासाठी असो किंवा बियाणं म्हणून साठवण्यासाठी असो- यासाठी बांबूचे वेगवेगळ्या आकाराचे घट्ट विणलेले डबे असतात. त्यांना आतुन मातीचा गिलावा दिलेला असतो. बांबूचे बियाणे साठवायचे विशेष डबे असतात त्यांना मेघालय इथे 'थिआर' से म्हणतात. हा डबा बांबू उभा चिरून त्याच्या पाताळ पट्यांनी सैलसर विणलेला असतो. आतमध्ये भाताच्या पेंढ्याचा जाड थर दिलेला असतो. त्याचप्रमाणे मेघालयातल्या स्थानिक खासी जमातीच्या लोकांनी बनवलेल्या लाकडी डब्याला 'दुली' असे म्हणतात. यामध्ये बांबूची दुहेरी थरांची टोपली असते. तिच्या दोन्ही बाजुंना गायीचे शेण आणि माती याचा वापर करून गिलावा दिलेला असतो. धान्य साठवण्यासाठी हा डबा सर्वात प्रभावी ठरला आहे. पुन्हा या प्रदेशातील काही भागात मका न सोलता, सालासकट साठवला जातो. काही वेळा उंदरांना दूर ठेवण्यासाठी बांबूच्या शंकूच्या आकाराचे डबे खांबांवर उलटे बसवले जातात.

**सारांश**


सरतेशेवटी अंतिम विश्लेषणात, हे अधोरेखित करणे गरजेचे आहे की ईशान्येकडच्या प्रदेशात जी शेती केली जाते ती सेंद्रीय शेती किंवा सेंद्रीय लागवड म्हणून ओळखली जाते.

१८ जानेवारी २०१६ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सिक्कीम या राज्याला भारतातले सेंद्रीय राज्य म्हणून घोषित केले आहे. त्यानंतरच्या ईशान्य भागात सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी ऑरगॅनिक व्हॅल्यू चेन डेवलपमेंट ही केंद्रीय क्षेत्रीय योजना लागू केली आहे. २०१५ ते २०१८ या कालावधीसाठी ४०० कोटींचा आर्थिक निधी राखून ठेवला आहे.

देशातले सेंद्रीय शेतीचे क्षेत्र वाढावे म्हणून 'परंपरागत कृषि विकास योजना' हा कार्यक्रमही भारत सरकारने चालू केला आहे.

■■■

*लेखक कृषि– अर्थव्यवस्था, ग्रामीण विकास आणि ईशान्य भारत याचे सखोल निरीक्षक आहेत. ते सध्या युनायटेड न्यूज ऑफ इंडिया - यु एन आय या वृत्तसंस्थेचे विशेष प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत.*
*email : nirendev1@gmail.com*



सखोल

# ईशान्य भारत: सद्यस्थिती व आव्हाने

डॉ. विजय गायकवाड



**या राज्यांमध्ये वेगवेगळ्या वंशाच्या जाती-जमातींचे लोक वास्तव्य करतात. त्यामुळे येथे भारतातील विविधता पहावयास मिळते. यासारख्या जमेच्या बाजु असताना ईशान्येकडील राज्ये विकासासाठी झगडत आहेत. विकास प्रक्रियेत समावेशन साधण्यासाठी शासनाचे प्रयत्न असले तरी तेथील स्थानिक आव्हानांमुळे पुरेसा वाव मिळत नाही. प्रस्तुत लेखात ईशान्य भारताचे सामाजिक, सांस्कृतिक वेगळेपण व त्यांच्यासमोरील आव्हाने याविषयी मांडणी करण्यात आली आहे.**

प्रस्तुत लेखात ईषान्येकडील राज्यांच्या भौगोलिक, सामाजिक व राजकीय स्थितीचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ईषान्य भारतातील १३ राष्ट्रीय उद्याने आणि ३० वन्यजीव अभयारण्ये हा अनमोल ठेवा आहे. भारतातील एकूण जमातींच्या लोकसंख्येपैकी १२ टक्के लोकसंख्येचे वास्तव्य येथे असून त्यांची सामाजिक ओळख, परंपरा व रीतिरिवाजांच्या रक्षणासाठी राज्यघटनेत अनुसूचि ६ ची तरतूद करण्यात आली आहे. या राज्यांमध्ये वेगवेगळ्या वंशाच्या जाती-जमातींचे लोक वास्तव्य करतात. त्यामुळे येथे भारतातील विविधता पहावयास मिळते. यासारख्या जमेच्या बाजु असताना ईशान्येकडील राज्ये विकासासाठी झगडत आहेत. विकास प्रक्रियेत समावेशन साधण्यासाठी शासनाचे प्रयत्न असले तरी तेथील स्थानिक आव्हानांमुळे पुरेसा वाव मिळत नाही. प्रस्तुत लेखात ईशान्य भारताचे सामाजिक, सांस्कृतिक वेगळेपण व त्यांच्यासमोरील आव्हाने याविषयी मांडणी करण्यात आली आहे.

भारतातील विशाल समाजापासून आदिवासींचे वास्तव्य भौगोलिक व सामाजिक स्तरापासून भिन्न आहे. वसाहतकालीन कालखंडात झालेले दीर्घ शोषण, नैसर्गिक संसाधनांपासून उदरनिर्वाहाला विविध कायद्यांद्वारे आदिवासींना अटकाव निर्माण केला गेला. त्यामुळे विविध संधीपासून आदिवासी समूहांना वंचिततेला सामोरे जावे लागत आहे. यावर मात करण्यासाठी व आदिवासींच्या संस्कृतीचे रक्षण करण्याच्या नावाने तत्कालीन ब्रिटीश शासनाने विलगतेचे धोरण आखले. या धोरणाचा उद्देश वसाहतवाद्यांना राज्य करता यावे असा होता. याउलट मानवशास्त्रज्ञ 'व्हेरियर एल्वीन' यांनी आदिवासींच्या संस्कृतीचे रक्षण होण्याच्या दृष्टीने 'राष्ट्रीय पार्क' असावा असे धोरण मांडले. स्वातंत्र्योतर काळात आदिवासींच्या विकासाबाबतची धोरणे ठरविताना पंडित नेहरूंवर एल्वीन यांचा प्रभाव असल्याने त्यांनी पंचशील तत्वांच्या माध्यमातून आदिवासींच्या विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला.

ईशान्येकडील भाग हा भूतान, चीन, म्यानमार आणि बांगला देश या देशांच्या सीमेलगत आहे. हा भाग जंगलव्याप्त असल्याने ब्रिटीश काळात अदिवासी भागांच्या केलेल्या वर्गवारीत 'पूर्णत: वर्जित' म्हणून ओळखला जातो. १९४७ पासून ईशान्येकडील राज्यांमध्ये जमाती-जमातींमध्ये तसेच बिगर आदिवासींमध्ये संघर्ष सुरू असून

यामध्ये राज्यसंस्थेचा देखील सहभाग राहिला आहे. येथील लष्कराला १९५८ च्या कायद्यानुसार विशेषाधिकार देण्यात आले आहे. हा कायदा मणिपूर, आसाम, नागालँड याबरोबर त्रिपुरा व अरूणाचल प्रदेशच्या काही भागात लागू आहे. पूर्वांचलामध्ये अरूणाचल प्रदेश (इटानगर), आसाम (गुवाहाटी), मणिपूर (इम्फाळ), मेघालय (शिलाँग), मिझोराम (ऐझवाल), नागालँड (कोहिमा), त्रिपुरा (आगरतळा) ही सात राज्ये असून यांना सप्तभगिनी असेही म्हणतात. २०११ च्या जनगणनेनुसार या राज्यांत १३५ आदिवासी जमाती असून देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी १२.४१ टक्के आदिवासी येथे वास्तव्यास आहेत.

**ईशान्येकडील राज्यांची सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये:**

**त्रिपुरा:** पूर्वांचलातील राज्य असूनही शेजारच्या पश्चिम बंगालच्या संस्कृती, भाषा व रीतिरिवाजाचा प्रभाव आहे. आगरतळा राजधानी असून, आगर म्हणजे या प्रदेशात आढळणारी एक सुगंधी वनस्पी आणि ताला म्हणजे गुदाम या दोन शब्दांनी मिळून बनलेलं आहे. आठशे एकरांच्या परिसरात व्यापलेला उजयंता पॅलेस हे इथले वैशिष्टे आहे. उजयंता हे नाव गुरूदेव रबिंद्रनाथ टागोर यांनी दिले आहे. राजघराण्याकडून हा राजवाडा त्रिपुरा षासनाने विकत घेतला तिथे २०११ पर्यंत विधानसभा भरत होती.

**मिझोराम-** या राज्याच्या सीमा भारतातल्या त्रिपुरा, आसाम, मणिपूर या राज्यांबरोबर बांगला देश व म्यानमार या देशांनाही भिडलेल्या आहेत. मिझोराम याचा अर्थ मि-म्हणजे लोक, झो - म्हणजे टेकडी, राम - म्हणजे भूमी. अर्थात पहाडी लोकांची भूमी असा अर्थ होतो. १९७२ पर्यंत मिझोराम आसाम राज्याचाच भाग होते. १९८७ साली ते भारताचं २३ वे राज्य बनलं. या राज्यात मरलेन हे राष्ट्रीय उद्यान आहे. आज या राज्याच्या लोकसंख्येपैकी ९५ टक्के लोक हे वेगवेगळ्या आदिवासी जमातींचे थेट वंशज आहेत. येथील सण उत्सव शेतीशी निगडित आहेत. इथले लोक प्रामुख्याने मंगोलाईड वंशाचे आहेत. १९ व्या शतकात येथे आलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांमुळे येथील जमाती आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या असल्या तरी साक्षर आहेत. येथे हमार, फानाईस, लँगलॅन्स, पॅन्सी, पाकी, लाखेर, रियांग व चकमा या आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत. येथील ८९ टक्के जनता ख्रिश्चन आहे. १९६५ पासून येथे बाप्तिस्ट चर्च ऑफ मिझाराम ही संघटना कार्यरत आहे.

---

**ईशान्येकडील भाग हा भूतान, चीन, म्यानमार आणि बांगला देश या देशांच्या सीमेलगत आहे. हा भाग जंगलव्याप्त असल्याने ब्रिटीश काळात अदिवासी भागांच्या केलेल्या वर्गवारीत 'पूर्णत: वर्जित' म्हणून ओळखला जातो. १९४७ पासून ईशान्येकडील राज्यांमध्ये जमाती-जमातींमध्ये तसेच बिगर आदिवासींमध्ये संघर्ष सुरू असून यामध्ये राज्यसंस्थेचा देखील सहभाग राहिला आहे. येथील लष्कराला १९५८ च्या कायद्यानुसार विशेषाधिकार देण्यात आले आहे. हा कायदा मणिपूर, आसाम, नागालँड याबरोबर त्रिपुरा व अरूणाचल प्रदेशच्या काही भागात लागू आहे.**

---

**मणिपूर** - हे मेरी कोमचे राज्य म्हणून आज ओळखले जाते. १९७२ मध्ये भारताचे २० वे राज्य आहे. सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद सेना ब्रम्हदेशमार्गे भारतात आली ती प्रथम मणिपूरमध्ये. या राज्याला महाभारत काळापासून इतिहास आहे. अर्जुनाची एक पत्नी उलुपी ही याच प्रांतातील होती. मणिपूर राज्यातील निसर्गवन असलेला लोकटक लेन हा ईशान्य भारतातील गोड पाण्याचा सर्वात मोठा तलाव आहे. जलविद्युत केंद्रापासून ते पिण्याच्या पाण्यापर्यंत अनेक बाबतीत हा तलाव मणिपूर राज्यासाठी वरदान आहे. या तलावावर तरंगता नॅशनल पार्क निर्माण करण्यात आला आहे. इम्फाळमध्ये कांगला फोर्टच्या रूपाने इथल्या प्राचीन राजवटीचे त्यांच्या गतकाळातील समर्थ आणि समृध्द राजवटींचे साक्ष देणारे अवशेष आहेत. मणिपूरचा ६६ टक्के भाग डोंगराळ आहे आणि मधल्या ३३ टक्के भागावर मईतई नावाचे लोक राहतात. याबरोबर नागा, मिझो व कुकी लोकांचे वास्तव्य आहे. केईबुल लामजाओ राष्ट्रीय उद्यान या राज्यात आहे.

**नागालँड** - ईशान्येकडील आकाराने लहान असलेल्या नागालँड राज्याचा समावेश भारतातील तीन ख्रिश्चन बहुल राज्यांमध्ये केला जातो. १ डिसेंबर १९६३ रोजी भारतातील संघराज्यातील सोळावे राज्य म्हणून नागालँडची निर्मिती झाली. नटांगकी राष्ट्रीय उद्यान या राज्यात आहे. महाभारतात ज्या किरात वंशाच्या सुवर्णवर्णी लोकांचा उल्लेख आहे ते या भूमीतले असावेत असे मानले

जाते. राजधानीत येथे कोहीचे फूल उमलते ती भूमी म्हणजे कोहीमा. नागालँडमधील दिमापूर हे व्यापारी शहर म्हणून ओळखले जाते.

**अरूणाचल प्रदेश** - २० एप्रिल १९७४ पासून इटानगर या राज्याची राजधानी म्हणून ओळखली जाते. नामदाफा हे प्रसिध्द राष्ट्रीय उद्यान अरूणाचल प्रदेशमध्ये आहे. पूर्वांचलातील अरूणाचल प्रदेश या राज्याचे जुने नाव होते नेफा अर्थात नॉर्थ इस्टर्न फ्रंटीयर एजन्सी. लाल बहादूर शास्त्रीजींनी हे नाव बदलून 'अरूणाचल प्रदेश' हे नाव ठेवले. या राज्यातील तवांग येथे अत्यंत तुटपुंज्या शस्त्रास्त्रांच्या मदतीने चीन आक्रमणाच्या वेळी भारतीय सैन्याने शौर्य दाखविले. थर्मोमीटरमधला पारा शून्याला टेकलेला असताना प्रतिकूल परिस्थितीत आपले जवान लढले. या युध्दात २४२० शहीद झाले असून त्यांची नावे बौध्द स्तुताच्या आकारात उभारलेल्या स्मारकात सुवर्णाक्षरात कोरलेली आहेत. हिमालयाच्या कुशीत ८५०० फूटांवर बसलेल्या गोमादिलाच्या निसर्गरम्य परिसरात ही मॅनेस्ट्री आंतरिक शांतता शोधणाऱ्या भिक्षुंसाठी हक्काचा निवारा आहे.

**मेघालय** - मेघालय हे राज्यदेखील पूर्वी असामचा हिस्सा होतं. या राज्यात आजही मातृसत्ताक पध्दती आहे. इथे कुटुंबाच्या संपत्तीचा वारसा कुटुंबातील सर्वात तरूण मुलगी असते. भारतातील सर्वात ओले राज्य म्हणूनही मेघालय ओळखले जाते. वर्षभरात १२०० सें.मी पाऊस पडतो. मॉसनराम हे सर्वात जास्त पाऊसाचे ठिकाण आहे. मेघालयची राजधानी शिलाँगला ब्रिटीशांनी 'स्कॉटलंड ऑफ इंडिया' म्हटलं होतं. शिलाँगजवळच्या उमियम नदीवर धरण असून येथे एक सुंदर तलाव आहे. जेथे पर्यटक जलक्रीडांचा आनंद घेतात. मेघालय राज्यातील मॉलिन्नॉन्ग हे गाव 'गॉड्स ओन गार्डन' म्हणून प्रसिध्द आहे. या गावाचा आशियातील सर्वात स्वच्छ गाव असा गौरव झाला आहे. वडाच्या झाडांच्या पारंब्यांचा नैसर्गिकरित्या वापर करून या गावानजीक लिंव्हिंग रूट ब्रिज पहायला मिळतो. पारंब्यांचा एक पूल तयार व्हायला १५ वर्षे लागतात, आणि तो तयार झाला की ४०० ते ५०० वर्षे वापरता येतो. जास्त पावसासाठी प्रसिध्द असलेल्या मेघालयामध्ये चेरापुंजीतील एलिफंट फॉल्स आणि मॉस्माई केव्हज् पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात.

**मेघालयची राजधानी शिलाँगला ब्रिटीशांनी 'स्कॉटलंड ऑफ इंडिया' म्हटलं होतं. शिलाँगजवळच्या उमियम नदीवर धरण असून येथे एक सुंदर तलाव आहे. जेथे पर्यटक जलक्रीडांचा आनंद घेतात. मेघालय राज्यातील मॉलिन्नॉन्ग हे गाव 'गॉड्स ओन गार्डन' म्हणून प्रसिध्द आहे. या गावाचा आशियातील सर्वात स्वच्छ गाव असा गौरव झाला आहे. वडाच्या झाडांच्या पारंब्यांचा नैसर्गिकरित्या वापर करून या गावानजीक लिंव्हिंग रूट ब्रिज पहायला मिळतो. पारंब्यांचा एक पूल तयार व्हायला १५ वर्षे लागतात, आणि तो तयार झाला की ४०० ते ५०० वर्षे वापरता येतो.**

**आसाम** - आसामची राजधानी गुवाहाटी असून याचा अर्थ गुवा म्हणजे सुपारी व हाट म्हणजे बाजार, यावरून गुवाहाटी हे नाव पडले. शैव (शाक्त) पंथामुळे येथे हिंदू धर्माचा प्रसार झाला आहे. १२८२ मध्ये ब्रम्हदेशातून आलेल्या आहोम राजांनी कामरूपावरून वर्चस्व प्रस्थापित केले. ते हिंदू होते की नव्हते याबद्दल पुरेशी माहिती नसली तरी त्यांचा वंश 'ताई' किंवा 'शान' सांगितला जातो. ब्रिटीशांनी आपला अंमल बसविल्यानंतर १८२३ मध्ये येथे चहाची मोठ्या प्रमाणात लागवड केली. आज भारतातील एकूण चहापैकी ५५ टक्के चहा आसामच्या मळ्यांमध्ये तयार होतो. असे असले तरी, आज येथील चहाच्या मळ्यांची मालकी गैरआसामी लोकांच्या हातात आहे. चहाच्या उत्पादनाबरोबर असाममध्ये पूर्वी मोठ्या प्रमाणात इमारती लाकूड व बांबूची वने होती. एकेकाळी देशाच्या एकूण बांबू उत्पादनापैकी ४२ टक्के आसाममध्ये होत होते. तथापि, नियोजनाअभावी जंगलांचा गैरवापर झाल्याने येथे सरसकट वृक्षतोड झाली. आर्थिक, सामाजिक, राजकीय शोषणाचे कारण देत भारतातून फूटून निघण्याच्या हेतूने अरविंद राजखोवा यांच्या अध्यक्षतेखाली 'उल्फा जन्माला आली. तर स्वतंत्र राष्ट्राऐवजी स्वतंत्र अस्मिता जपण्यासाठी बोडोंची संघटना येथे कार्यरत आहे.

चहाप्रमाणे आसामची ओळख निर्माण झाली ती एकशिंगी गेंड्यांचे आश्रयस्थान म्हणून. हा अजस्त्र प्राणी येथील काझिरंगा अभयारण्यात पहायला मिळतो. गौहत्ती शहरातील निमाचल टेकडीवरचे कामाख्या मंदिर हे भारतातील ५१ शक्तीपीठांपैकी एक मानले जाते. या मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात त्रिपुरसुंदरी, मातंगी आणि कमला या देवतांची पूजा केली जाते. या मंदिराच्या अनोख्या

वास्तुशैलीला निलाचल शैली म्हणून ओळखतात. आसामी भाषेला १९६० मध्ये राजभाषेचा दर्जा मिळाला. काझीरंगा आणि मानस राष्ट्रीय उद्यान या राज्यात आहे. आसाममध्ये तिवा जमातीचे लोक दरवर्षी एकत्र जमतात आणि व्यापार मेळा भरवितात यामध्ये पैशाऐवजी वस्तुविनिमय केले जाते.

**ईशान्यतील आव्हाने -**

२०११ च्या जनगणना अहवालानुसार ईशान्य भारतातील राज्यांत साक्षरतेचे प्रमाण ७७.७६ टक्के जे देशाच्या एकूण ७४.०४ टक्क्यांच्या तुलनेने अधिक असले तरी, येथील शिक्षण व्यवस्थेवर सभोवतालच्या वातावरणाचा प्रभाव आहे. असामाजिक व्यवहार व सामाजिक अस्थिरतेमुळे वर्षभर १०० दिवसांपर्यंत शालेय कामकाज बंद ठेवावे लागतात. सीमावर्ती भागातील असुरक्षित वातावरण, स्थानिक जमातींमधील परस्परविरोधी भावना यामुळे शिक्षित युवा पिढी इतर राज्यांकडे रोजगारासाठी स्थलांतराचा मार्ग स्वीकारतात जे की त्यांच्यासाठी सक्तीचे ठरते. आसाममध्ये अनेक गावांतील आदिवासी जमातीमध्ये आजही चेटकीण समजून महिलांचा अनन्वित छळ केला जातो. याच्याविरूध्द आवाज उठविण्याचे काम १९८५ पासून बिरूबाला राभा यांनी सुरू केले आहे. आजपर्यंत त्यांनी अशा जाचक प्रथेतून पन्नास हून अधिक महिलांची मरणातून सुटका केली आहे. १९७९ ते २०१२ या कालावधीत मणीपूरमध्ये झालेल्या हिंसाचारात सुमारे १५०० जणांचा मृत्यु झाला आहे. अनेक प्रकरणांमध्ये सुरक्षा दलांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित केले जातात. यासंदर्भात इरोम शर्मिला यांचा लढा सर्वज्ञात आहे. याबरोबर दहशतवाद व ईशान्यकडील विविध संघटना व लष्कर यांच्या चकमकीत ठार झालेल्यांची १९९२ ते २०१८ ची आकडेवारी अभ्यासता २००८ मध्ये सर्वाधिक म्हणजे १०५१ (नागरिक ४०४, लष्करी जवान ४० तर ६०७ दहशतवादी) जण ठार झाले आहेत. (Source: http://www.satp.org).

नागालँड, अरूणाचल प्रदेश, मिझोराम, मेघालय व मणिपूरचा पर्वतीय प्रदेश आणि आसाममधील काही जमातींच्या प्रदेशात जमिनींची कोणतीही लिखित नोंद नसल्याने जमिनीची मालकी येथील प्रस्थापित जमातींच्या हातात आहे. येथील राज्ये जैव विविधतेच्या साधनसंपत्तीने नटलेली असली, तरी जागतिक हवामान बदलामुळे ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यात दरवर्षी येणाऱ्या पुराच्या नुकसानीमुळे येथील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात सक्तीचे स्थलांतर होते. वारंवार पूरसदृश्य स्थितीमुळे दैनंदिन जीवनमानावर याचा परिणाम होत आहे.

**सारांश**

भारतासारख्या वसाहतिक प्रभाव असलेल्या देशाच्या धोरण निर्मितीवर स्वातंत्र्योत्तर काळातही प्रभाव राहिल्याने ईशान्य भारतासाठी धोरणप्रक्रियेवर देखील याचा परिणाम झालेला दिसतो. भाषिक व लोकसंख्येच्या आधारावर राज्य निर्मितीच्या प्रक्रियेसाठी नेमण्यात आलेल्या SRC (State Reorganisation Commission) आयोगाच्या शिफारशींच्या आधारे ईशान्येकडील राज्यांची निर्मिती झाली मात्र भाषेची लिपी नसणे व जमातींची मर्यादित लोकसंख्या या आधारे आदिवासी भाषिक राज्ये होऊ शकली नाही. कालांतराने आसामी व बोडो या भाषांना संबंधित राज्याची भाषा म्हणून मान्यता देण्यात आली. या आयोगामध्ये समाजशास्त्रज्ञ, मानवशास्त्रज्ञांचा अभाव असल्याने याबाबत सर्वसमावेशक विचार होऊ शकला नाही. इतर देशांच्या लगत असलेल्या सीमांमुळे ईशान्येकडील राज्यांत ४ ते ५ मिलियन लोकांनी घुसखोरी केली आहे. (Oommen, २०१४). अशा प्रकारे घुसखोरी केलेले या भागात बेकायदेशीर वास्तव्यास आहेत. यासारख्या सामाजिक समस्यांवर मात करून या राज्यांच्या प्रगतिसाठी राज्यसंस्थेकडून विविध धोरण आखली जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून या राज्यांतील वाढते पर्यटन विचारात घेऊन २०१४-१५ पासून पर्यटन मंत्रालयाने स्वदेश दर्शन व प्रसाद या दोन योजना जाहीर केल्या आहेत. पर्यटन मंत्रालयाच्या २०१४ च्या आकडेवारीनुसार १,१८,५५२ पर्यटकांनी भेटी दिल्या आहेत. पर्यटन व दळणवळणाचा विकास होण्याच्या दृष्टीने आसामधील लोहित नदीवर धोला-सादिया हा पुल बांधण्यात आला आहे. विकासाच्या दृष्टीने शासनाचे हे महत्वाचे पाऊल असले तरी या राज्यांमध्ये असणाऱ्या उल्फा, मुल्फा, हिंदू युनायटेड लिबरेशन फ्रंट, बोडो यासारख्या संघटनांमुळे वारंवार उद्भवणारी अंतर्गत अशांतता ही विकासाला आव्हान ठरत आहे.

■■■

*लेखक आदिवासी विकास या विषयाचे अभ्यासक आहेत.*
*email : vijay.gaikwad09@gmail.com*

नियोजन

# ईशान्येतील महिलांना मुख्य प्रवाहात आणताना

**डॉ. शैलेंद्र चौधरी, मिहीन डोलो आणि डिम्पल एस दास**



**महिला सक्षमीकरण करताना आव्हाने आणि संधींच्या आगळ्यावेगळ्या संचासह गुंतागुंतीची सामाजिक सांस्कृतिक चौकट या प्रदेशात पहायला मिळते. महिला सक्षमीकरण याचा अर्थ महिलांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि कायदेशीर सामर्थ्य वाढवणे आणि सुधारणा करणे, महिलांच्या समान हक्कांची खात्री करून देणे आणि आपल्या हक्कांवर दावा सांगण्याइतका विश्वास त्यांच्यात निर्माण करणे असा होतो. अनेक बाबतीत ईशान्येकडील राज्यांमध्ये लिंग समानतेचे निदर्शक सरासरी भारतीय स्थितीच्या तुलनेत अतिशय अनुकूल आहेत. परंतु यातून संपूर्ण स्थितीचे आकलन होणार नाही.**

भारताचा ईशान्य प्रदेश हा २५० हून अधिक विविध वांशिक जमातींचा निवारा असून या जमाती वैविध्यपूर्ण सांस्कृतिक आणि सामाजिक-आर्थिक वास्तवता असलेल्या अशा आहेत. महिला सक्षमीकरण करताना आव्हाने आणि संधींच्या आगळ्यावेगळ्या संचासह गुंतागुंतीची सामाजिक सांस्कृतिक चौकट या प्रदेशात पहायला मिळते. महिला सक्षमीकरण याचा अर्थ महिलांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि कायदेशीर सामर्थ्य वाढवणे आणि सुधारणा करणे, महिलांच्या समान हक्कांची खात्री करून देणे आणि आपल्या हक्कांवर दावा सांगण्याइतका विश्वास त्यांच्यात निर्माण करणे असा होतो. अनेक बाबतीत ईशान्येकडील राज्यांमध्ये लिंग समानतेचे निदर्शक सरासरी भारतीय स्थितीच्या तुलनेत अतिशय अनुकूल आहेत. परंतु यातून संपूर्ण स्थितीचे आकलन होणार नाही. महिला ज्या पद्धतीची दैनंदिन कामे करतात, त्यांच्या स्वरूपामुळे महिलांना पुरुषांपेक्षा जास्त अवघड परिस्थितीला सामोरे जावे लागते. ईशान्य भारतात महिलांनी मुलांची काळजी घेणे आणि त्यांना भरवणे आणि घरातील स्वयंपाक करणे अशी जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. हे त्यांनी पर्याय नाही म्हणून केलेले नाही तर विशिष्ट ऐतिहासिक आणि पारंपरिक कारणांमुळे ओझे घेतले आहे. निर्णय प्रक्रियेत त्यांची भूमिका शून्य आहे आणि पारंपरिक संस्थांमध्ये त्यांचे अस्तित्व जवळपास नगण्य आहे. राजकीय आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेतून वगळले गेल्याने पुरुषांच्या तुलनेत त्यांचे स्थान अत्यंत हीन दर्जाचे राहिले आहे. महिला शेती आणि पशुधन संवर्धनात प्रमुख भूमिका बजावत असल्या तरीही पारंपरिक संस्था ज्या बहुतांशी नियामक संस्था आहेत आणि जमिनीचे व्यवस्थापन, पारंपरिक आणि रूढी परंपरा, तंटे सोडवणे, वन व्यवस्थापन आणि महसूल गोळा करणे यांच्याकडे लक्ष देणाऱ्या संस्थांमधून महिलांना वगळले आहे.

### नेरकॉर्म्प योजना

उंच प्रदेशातील ईशान्य प्रदेश समुदाय साधनसंपत्ती व्यवस्थापन (NERCORMP) प्रकल्प १९९९ वर्षापासून अस्तित्वात आला असून ईशान्य मंडळ, ईशान्य प्रदेश विभाग मंत्रालय, भारत सरकार आणि इंटरनॅशनल फंड फॉर अ‍ॅग्रीकल्चर डेव्हलपमेंट यांनी संयुक्तपणे तो सुरु केला. त्याचे एकंदरीत उद्दिष्ट, "दुर्बल घटकांचे राहणीमान त्यांच्या साधनसंपत्तीच्या पायाचे व्यवस्थापन शाश्वत पद्धतीने सुधारण्याच्या

माध्यमातून उंचावणे आणि त्याच बरोबर पर्यावरण संरक्षण आणि जतनाला योगदान दिले जाईल हे पाहणे असे होते.''नेरकॉर्म्पमध्ये २६४० गावांचा समावेश असून १,८८,८४३ कुटुंबापर्यंत ते पोहोचले होते. तसेच २९६० नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन गट नावाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा स्थापन करण्यात आली जी ग्राम स्तरावर नियोजनाची जबाबदारी पार पाडत असते आणि ८३२६ स्वयं सहायता गट तयार केले गेले ज्यात महिला बचत आणि व्यवसायात गुंतलेल्या असतात. या प्रकल्पात अरुणाचल प्रदेशातील चांगलांग, तिर्प आणि लोंगडिंग जिल्हे; आसाममधील कर्बी अंग्लोंग आणि दिमा हसाओ जिल्हे, चंदेल, चुराचांदपुर, उखरूल आणि सेनापती हे मणिपूरमधील जिल्हे आणि मेघालयातील पश्चिम खासी आणि पश्चिम गारो जिल्हे यांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाची भूमिका अशी आहे की, महिला गटाच्या माध्यमातून महिला स्नेही उपक्रम राबवून महिलांचा विश्वास वाढवणे आणि व्यवस्थापकीय कौशल्य विकसित करायचे तसेच समुदायाच्या बैठकांमध्ये महिलांचा आवाज बुलंद करायचा.

प्रकल्पाच्या उपक्रमांच्या अंमल बजावणीत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी नेरकॉर्म्प विविध उपाय योजत असते.

-समुदाय स्त्रोत व्यवस्थापन योजना ठरवण्यापूर्वी ग्राम स्तरावर महिलांच्या गरजांना अनुरूप योजना बनवताना महिलांच्या कल्पना जाणून घेण्यासाठी सहभागी नियोजन प्रक्रियेचा भाग म्हणून महिलांशी स्वतंत्र संवाद साधण्यात आला. प्रकल्पांतर्गत दिल्या गेलेल्या कोणत्याही प्रशिक्षणात महिला संवेदिकरण करण्यात आले.

- उत्पादनाचा विकास, तांत्रिक दर्जा उंचावणे, कौशल्य वृद्धी आणि बाजारपेठीय हस्तक्षेप यांच्या प्रमुख लाभार्थी महिला असल्याने विशेषत: हातमाग क्षेत्रात प्रशिक्षण आणि सुधारित उत्पादन पद्धतीत महिलांना समान प्रवेश देण्यात आला.

**स्वस्तातील स्वच्छतागृहे, शुद्ध पिण्याचे पाणी पुरवणे, गावागावातील रस्ते, प्रतीक्षालये आणि संकलन केंद्रे यासारख्या मुलभूत पायाभूत सुविधांमुळे महिलांची कठोर कष्टाची कामे खूप कमी झाली आहेत. याशिवाय अधिक चांगल्या आरोग्य सुविधा आणि पोषक आहार पुरवल्याने डायरिया, जुलाब, ॲनेमिया आणि मलेरिया यासारखे वारंवार होणारे आजार कमी झाले आहेत.**

-प्रकल्पाच्या उपक्रमांत महिलांना सहभागी करून घेतल्याने ग्रामीण महिलांना आपली गतिशीलता वाढवून अधिक चांगले आरोग्य आणि परिणामी उत्पादकता वाढवणे शक्य झाले. महिला केंद्रित विकास पुढाकाराने महिलांना अधिक फावला वेळ दिला आणि कठोर परिश्रमातून बाहेर काढले. आज त्यांना साधन संपत्ती आणि अर्थ सहाय्यापर्यंत प्रवेश आहे आणि यामुळे गावाच्या भवितव्याचा विचार करण्यात त्यांनी सक्रीय सहभाग घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

-स्वस्तातील स्वच्छतागृहे, शुद्ध पिण्याचे पाणी पुरवणे, गावागावातील रस्ते, प्रतीक्षालये आणि संकलन केंद्रे यासारख्या मुलभूत पायाभूत सुविधांमुळे महिलांची कठोर कष्टाची कामे खूप कमी झाली आहेत. याशिवाय अधिक चांगल्या आरोग्य सुविधा आणि पोषक आहार पुरवल्याने डायरिया, जुलाब, ॲनेमिया आणि मलेरिया यासारखे वारंवार होणारे आजार कमी झाले आहेत. स्वस्तात स्वच्छतागृहे उपलब्ध करून दिल्याने ग्रामीण महिलांची पूर्वीची प्रतिष्ठा परत प्राप्त होण्यास मदत झाली आहे कारण आता त्यांना खासगी जागा आहे. रस्ता संपर्क व्यवस्था सुधारल्याने स्वयं सहाय्यता गटांना बाजारपेठ सहज उपलब्ध झाली आहे.

- या प्रकल्पांतर्गत समाविष्ट असलेल्या १० जिल्ह्यांत नेरकॉर्म्पने ५९,२८२ कमी खर्चातील स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहेत. स्वच्छतागृहे बांधण्यात नेरकॉर्म्पने दिलेले योगदान स्वच्छ भारत अभियान यशस्वी करण्याच्या दृष्टीने आणि ईशान्य प्रदेशातील उंचावरील प्रदेशात राहणाऱ्या गरीब आणि कमकुवत समुदायांचे जीवनमान सुधारण्यासाठी फार उपयुक्त सिद्ध होणार आहे. कारण ग्रामीण महिला वर्गाची प्रतिष्ठा आणि खासगीपणा पुन्हा प्रस्थापित झाला आहे. गावांना शुद्ध राखण्यासाठी प्रकल्पातील समाविष्ट गावामध्ये स्वच्छता मोहीम राबवण्याबाबत प्रोत्साहन देऊन जनजागृती करण्यात येते.

-समुदाय संवर्धीत भागांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने महिलांचा सहभाग मुख्यप्रवाहात आणण्यासाठी नेरकॉर्म्पने एक धोरण तयार केले असून त्या द्वारे महिला सदस्यांना

इमारती लाकूड विरहित वन्य उत्पादने काढून त्यांचा वापर करण्याचा किंवा त्यांची विक्री करण्याचा अधिकार दिला असून त्यांना सूचीबद्ध केले आहे. अशी वन्य उत्पादने कधी गोळा करता येतील, त्यांच्या वापरासंबंधी पारंपरिक नियम जसे की हे करू नका आणि हे करा आणि कोणत्या किमान बाजारभावाने त्यांची विक्री करता येईल हे सारे महिला गटसुनिश्चित करतात. समुदाय संवर्धीत भागांच्या म्हणजे सीसीएशी संबंधित पारंपरिक आणि अध्यात्मिक श्रद्धा आणि त्याला चिकटून राहण्यासाठी विशिष्ट नियमही महिला गट ठरवून देतात. पुरुष जेव्हा हंगामात बाहेर रोजगारासाठी जातात तेव्हा सीसीएचे व्यवस्थापन करताना महिला गट महिला आणि युवकांची भूमिका आणि जबाबदारी निश्चित करतात.

### महिला सक्षमीकरणात एनएआरएमजी आणि स्वयं सहाय्यता गटांची उत्प्रेरक म्हणून भूमिका

ग्रामीण विकासात एनएआरएमजी आणि स्वयं सहाय्यता गट हे शाश्वत, मजबूत आणि समावेशक हस्तक्षेप म्हणून काम करतात. केवळ समुदाय सदस्यांच्या पसंतीला प्रतिसाद देण्यासाठीच संस्थात्मक उभारणी आवश्यक आहे असे नाही तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा परिणामकारक विनियोग आणि नाविन्यपूर्ण पारंपरिक ज्ञान आणि रीतींची प्रतिकृती तयार करून त्यांचा आकार वाढवण्यासाठी आवश्यक आहे. सध्याच्या पारंपरिक संस्थांना पूरक म्हणून आणि समुदायांनी विकासाभिमुख संस्थात्मक चौकट विकसित करण्यासाठी मदत करण्यास हे सीबीओ स्थापन करण्यात आले होते. एनएआरएमजी गटाचा सदस्य म्हणून महिलेचे सक्षमीकरण आणि सहभागाची जोपासना करतात आणि गावाच्या नियोजनात निर्णय प्रक्रियेत महिलेला सहभाग देऊन महिलेची पदाधिकारी म्हणून निवड करणे बंधनकारक केले जाते.

स्वयं सहाय्यता गट मुख्यत: महिलांना सक्षम करण्यास आणि उपजीविका आणि सामाजिक क्षेत्रात महिलांशी संबंधित मुद्दे निकालात काढण्यासाठी स्थापन करण्यात येतात. आदर्श एसएचजी मार्गदर्शक तत्वांचे ते पालन करतात जसे की, बचत, पत पुरवठा, काटकसर, बैठका, उपजीविका आणि उत्पन्न मिळवणारे उपक्रम तसेच सामाजिक गतिशीलता. सदस्यांचे मूळ सामर्थ्य उभारण्यासाठी अनेकविध क्षमता उभारणीचे कार्यक्रम घेतले जात असून त्यांची पत ग्रहण करण्याची क्षमता वाढवली जात आहेत. जिची परिणती शाश्वततेत होईल.

**स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहेत. स्वच्छतागृहे बांधण्यात नेरकॉर्मने दिलेले योगदान स्वच्छ भारत अभियान यशस्वी करण्याच्या दृष्टीने आणि ईशान्य प्रदेशातील उंचावरील प्रदेशात राहणाऱ्या गरीब आणि कमकुवत समुदायांचे जीवनमान सुधारण्यासाठी फार उपयुक्त सिद्ध होणार आहे. कारण ग्रामीण महिला वर्गाची प्रतिष्ठा आणि खासगीपणा पुन्हा प्रस्थापित झाला आहे. गावांना शुद्ध राखण्यासाठी प्रकल्पातील समाविष्ट गावामध्ये स्वच्छता मोहीम राबवण्याबाबत प्रोत्साहन देऊन जनजागृती करण्यात येते.**

याही पुढे जाऊन एनएआरएमजी गटांचा महासंघ करून समूह स्तरावर एनएआरएमजी संघटना आणि जिल्हा स्तरावर सर्वोच्च एनएआरएमजी संघटना तयार करण्यात येते आणि त्याच प्रमाणे एसएचजी संघटना समूह स्तरावर आणि जिल्हा स्तरावर सर्वोच्च एसएचजी संघटना स्थापन केली जाते. ज्या विकासात्मक गरजा भागवण्यासाठी एकत्रित काम करत आहेत तसेच त्यांच्या उत्पादित मालाच्या मार्केटिंगला चालना देत आहेत. या एनएआरएमजी समूह संघटना आणि एसएचजी महासंघांनी प्रकल्पाचे मॉडेल प्रकल्प नसलेल्या शेजारच्या गावांत याच नेरकॉर्मच्या धर्तीवर एनएआरएमजी आणि एसएचजी स्थापन करण्यासाठी विस्तारित केला असून त्यासाठी कोणतीही आर्थिक मदत घेतलेली नाही.

हा प्रकल्प महिला आधारित एसएचजी, निर्णय प्रक्रियेत समान सहभाग, ग्राम विकास कामांची अंमल बजावणी, गटाच्या बैठकीत आर्थिक बाबतीत निर्णय घेऊन आर्थिक पारदर्शकता, लेखा आणि नोंदी ठेवणे, गटाचे वर्षिक लेखा परीक्षण सनदी लेखापालाकडून करणे याद्वारे बचतीची सवय भिनवतो. महिलांना बँक खाते उघडण्यास सांगून आणि बँक खाते हाताळण्याबाबत प्रशिक्षण देऊन तसेच प्रकल्पाचा सर्व निधी बँक खात्यात थेट वर्ग करून प्रकल्पाने महिलांना बँकिंगची सवय लावली आहे, जो सध्याच्या केंद्र सरकारचा मुख्य अजेंडा आहे. ज्याने नुकतीच प्रधानमंत्री जनधन योजना, रोकड विरहित व्यवहार वगैरे सुरु केली आहे. या प्रकल्पाने साध्य केलेली मुख्य कामगिरी म्हणजे मानसिकतेत घडवून आणलेला बदल होय. जसे

की समुदाय आता अनुदानाच्या ऐवजी कर्जाची मागणी करतात, गावातील सामायिक मालमत्ता उभारण्यासाठी सामुदायिक योगदान देतात. ज्यात समुदायांना स्वतःचा पैसा किंवा श्रमदानाने तयार केलेल्या मालमत्तेची अधिक मजबूत मालकी मिळू शकते.

उदाहरण १ : मणिपूरच्या उखरूल जिल्ह्यात पितृसत्ताक पद्धतीपासून महिला सक्षमीकरणापर्यंत झालेला आमुलाग्र बदल (श्री तायचीकस वाशुम, जिल्हा प्रकल्प संचालक, उखरूल जिल्हा, मणिपूर)

उखरूल जिल्हा हा प्रामुख्याने तंगखूल जमातीचे वास्तव्य असलेला असून काही थोडी लोकसंख्या कुकी आणि मारिंग जमातीची आहे. तंगखूल समाज हा पुरुषी वर्चस्व असलेला असून महिलांना कौटुंबिक अथवा सामाजिक निर्णय प्रक्रियेतून वगळण्यात आलेले असते; त्यांना मालमत्तेत हक्क आणि वारसा हक्क नाकारण्यात येतो. परिवार आणि आर्थिक बाबतीत कणा असूनही महिलांना पुरुषी वर्चस्वात कोणतेही महत्व नव्हते. अर्धशिक्षित किंवा अशिक्षित महिलांमध्ये महिला नेतृत्व ही कल्पना कुणी ऐकलीही नव्हती मात्र काही महिलांनी लक्षणीय यश प्राप्त केले असून समाज उभारणीत महत्वपूर्ण योगदान दिले आहे. नेरकॉर्म्पने हस्तक्षेप करण्याच्या अगोदर महिलांनी परिवाराच्या कक्षेच्या बाहेर जाऊन आर्थिक बाबी हातात घेणे अत्यंत आक्षेपार्ह आणि अस्वीकारार्ह समजले जात होते. महिला कितीही सक्षम आणि सामर्थ्यवान असल्या तरीही त्यांचे क्रियाकलाप सहसा घरगुती गोष्टी आणि कृषिविषयक कामे इथपर्यंत मर्यादित होते. स्वयं सहाय्यता गट स्थापन करेपर्यंत एतद्देशीय संस्कृतीत बचत आणि काटकसर या कल्पना संपूर्ण परक्या होत्या. शिवाय महिलांना बचतीच्या पैशाचे व्यवस्थापन करण्याची संधी क्वचितच मिळे. आज अनेक महिला व्यावसायिक आहेत. लेखा नोंदी ठेवणे हे अप्राप्य समजले जात असे. कावेबाज सावकारांनी कोणत्याही दिलेल्या कर्जावर दरमहा १० टक्के व्याज आकारून या स्थितीचा गैरफायदा उठवला. प्राथमिक बँकिंग सुविधा आणि आर्थिक जागृतीचा अभाव यामुळे जिल्ह्यात विकास प्रक्रिया आणखीच बिघडली.

**स्वयं सहाय्यता गट मुख्यत: महिलांना सक्षम करण्यास आणि उपजीविका आणि सामाजिक क्षेत्रात महिलांशी संबंधित मुद्दे निकालात काढण्यासाठी स्थापन करण्यात येतात. आदर्श एसएचजी मार्गदर्शक तत्वांचे ते पालन करतात जसे की, बचत, पत पुरवठा, काटकसर, बैठका, उपजीविका आणि उत्पन्न मिळवणारे उपक्रम तसेच सामाजिक गतिशीलता. सदस्यांचे मूळ सामर्थ्य उभारण्यासाठी अनेकविध क्षमता उभारणीचे कार्यक्रम घेतले जात असून त्यांची पत ग्रहण करण्याची क्षमता वाढवली जात आहेत.**

गरजू विशेषत: महिलांना सक्षम करण्याचा अजेंडा घेऊन नेरकॉर्म्प अगदी योग्य वेळी जिल्ह्यात आले, असे श्रेय समुदाय देतात. महिलांमध्ये समानता आणि हक्कांची जाणीव निर्माण करणे या प्रकल्पाची भूमिका आणि धोरणाला प्रचंड यश प्राप्त झाले हे सिद्ध झाले आहे. महिला आणि पुरुषांच्या प्रकल्पातील योगदानाने मूर्त आणि शाश्वत विकासात प्रकल्पाने योगदान दिले आहे. अंतिमत: लोकांच्या मानसिकतेत विशाल बदल झाल्याचे दिसते आणि जिल्ह्याच्या एकंदरीत विकासात आमुलाग्र बदल झालेला जाणवतो. आता, ग्राम विकासाच्या प्रत्येक निर्णय प्रक्रियेत महिलांना आपले मत मांडण्याची समान संधी असते आणि नैसर्गिक स्त्रोत व्यवस्थापन गटासारख्या समुदाय आधारित संघटनेत महिलांना महत्व असते. म्हणून उखरूल जिल्ह्यात नेरकॉर्म्प हे महिलांसाठी आशेचा किरण घेऊन आलेले आहे असे मानले जाते.

जिल्ह्यातील बँकिंग सुविधांचा अभाव लक्षात घेऊन आर्थिक सेवा देणारी संस्था तातडीने स्थापित करण्याची गरज होती जी अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीची कर्ज देऊ शकेल. अशा पद्धतीने जिल्ह्यातील सर्व एसएचजी एकत्र येऊन उखरूल जिल्हा महिला सूक्ष्म पत पुरवठा संस्था (युडीडब्ल्यूआयएम) स्थापन करण्यात आली. युडीडब्ल्यूआयएमकडे ८१० स्वयं सहाय्यता गट असून एकूण १५,३९० सदस्य आहेत जे २०४ गावांतून आले आहेत. संस्थेच्या कार्यपद्धतीबाबत ते निर्णय घेतात आणि ग्रामीण महिलांच्या आर्थिक गरजांबाबत सर्वोत्कृष्ट तोडगा काढण्यावर जोर देतात. या पुढाकाराने महिलांना गरीबीवर मात करणे शक्य झाले असून अधिक चांगल्या उपजीविकेच्या दिशेने त्यांची उन्नती झाली आहे. २००८ मध्ये अवघ्या १ कोटी ३० लाख रुपयांनी (सदस्य गटांकडून जमवलेला निधी) सुरु झालेल्या या प्रकल्पाकडे आज

५ कोटी रुपयांचा निधी असून घटत्या मुद्दलावरील दीड टक्का व्याज दराने १५,००० सदस्यांना त्याचा फायदा होत आहे. हे यश अनेकविध कारणांनी मिळाले आहे..

युडीडब्ल्यूआयएम ही समुदायाने व्यवस्थापन करत असलेली सूक्ष्म आर्थिक संस्था असून तिने अनेक सक्षम महिलांना पत पुरवठा आणि बचतीची कल्पना त्यांच्या मनात बिंबवून मदत केली आहे. ज्यामुळे या महिला शाश्वत उपजीविका, अन्न सुरक्षा आणि एकंदरीत सामाजिक विकास प्राप्त करण्यात सक्षम झाल्या आहेत.

**महिला कितीही सक्षम आणि सामर्थ्यवान असल्या तरीही त्यांचे क्रियाकलाप सहसा घरगुती गोष्टी आणि कृषिविषयक कामे इथपर्यंत मर्यादित होते. स्वयं सहाय्यता गट स्थापन करेपर्यंत एतद्देशीय संस्कृतीत बचत आणि काटकसर या कल्पना संपूर्ण परक्या होत्या. शिवाय महिलांना बचतीच्या पैशाचे व्यवस्थापन करण्याची संधी क्वचितच मिळे. आज अनेक महिला व्यावसायिक आहेत.**

नेरकॉम्र्प प्रकल्पाने महिलांचे काबाडकष्ट लक्षणीय रित्या कमी केले असून महिला सक्षमीकरण धर्तीवर ग्राम विकासाचे नियोजन आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा अधिक चांगला सहभाग तयार होण्यासाठी वातावरण निर्माण केले आहे; प्रधानमंत्री जनधन योजनेच्या धर्तीवर महिला आधारित एसएचजी सदस्यांची बँक खाती खोलून आर्थिक साक्षरता पुरवली आहे; स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महिलांसाठी कमी खर्चातील स्वच्छतागृहे आणि शुद्ध पिण्याचे पाणी पुरवून महिलांचे आरोग्य सुधारले आहे; राष्ट्रीय अन्न सुरक्षा कार्यक्रमाच्या धर्तीवर उपजीविकेसाठी विविध उपक्रम सुरू करून देऊन अन्न आणि पोषक आहार सुरक्षितता प्रदान केली आहे.

नेरकॉम्र्प महिलांसाठी सुयोग्य वातावरण तयार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत असून भारताच्या ईशान्य प्रदेशात भूक मुक्त समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने काम करत आहे. प्रातिनिधिक नमुना आणि ग्रामस्थांच्या साक्षी आम्ही योग्य दिशेने निघालो असल्याचे दर्शवतात. ग्रामीण समुदायांसाठी विशेषत: ईशान्य भारतासारख्या दुर्गम आणि अवघड प्रदेशात राहणाऱ्या महिलांसाठी अधिक चांगले भविष्य प्राप्त करण्याच्या सकारात्मक दिशेने प्रकल्पाची वाटचाल सुरु आहे.

■■■

*लेखक त्रयी नेरकॉम्र्पचे अनुक्रमे व्यवस्थापकीय संचालक, संचालक आणि समन्वयक आहेत.*

*email :dimkimson@yahoo.com*




विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

**आगामी अंक**

**मे २०१८**

**‘पोषण आहार’**


**सुवर्णसंधी!**

योजना मासिकाचे जुने अंक वाचकांच्या खास आग्रहास्तव उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुकांनी यासाठी योजना कार्यालयात संपर्क साधावा.

दूरध्वनी- ०२२-२७५६६५८२
email : myojanadpd@gmail.com

# भारताच्या विकासाला गती देणारी कृत्रिम बुध्दिमत्ता

डॉ. अविक सरकार



**प्राईस वॉटरहाऊस कूपर्स (पीडब्ल्यूसी) या संस्थेच्या अंदाजाप्रमाणे सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये जागतिक व्यापारात कृत्रिम बुध्दिमत्ता क्षेत्रात अतिरिक्त १५.७ ट्रीलीयन डॉलर्सच्या व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील. त्यामुळे ही सर्वात मोठी व्यावसायिक संधी असेल. या लेखामधे कृत्रिम बुध्दिमत्तेच्या उत्क्रांतीबाबत काही पार्श्वभूमी देताना या विषयावरची वस्तुस्थिती काही प्रमाणात स्पष्ट करून सांगितली आहे.**

आकलन होणे, निष्कर्ष काढणे, पर्यावरणाशी जुळवून घेणे, प्रश्न सोडवणे, सर्जनशीलता अशी मानवी मनाची जाणण्याची क्षमता जेव्हा एखाद्या यंत्रामध्ये येते तेव्हा त्याला कृत्रिम बुध्दीमत्ता (आर्टीफीशियल इंटेलिजन्स – एआय् ) असे म्हणतात. जगभरात कृत्रिम बुध्दीमत्तेबाबत वेगवेगळे दृष्टिकोन आहेत – काहींच्या मते वाढ आणि उत्पादकता वाढवणारे आणि आमूलाग्र बदल करणारे हे तंत्रज्ञान आहे, तर इतर काहींचा काहीसा नकारात्मक दृष्टीकोन असून त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार कमी होणार आहे असे त्यांचे म्हणणे आहे. प्राईस वॉटरहाऊस कूपर्स (पीडब्ल्यूसी) या संस्थेच्या अंदाजाप्रमाणे सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये जागतिक व्यापारात कृत्रिम बुध्दिमत्ता क्षेत्रात अतिरिक्त १५.७ ट्रीलीयन डॉलर्सच्या व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील. त्यामुळे ही सर्वात मोठी व्यावसायिक संधी असेल. या लेखामधे कृत्रिम बुध्दिमत्तेच्या उत्क्रांतीबाबत काही पार्श्वभूमी देताना या विषयावरची वस्तुस्थिती काही प्रमाणात स्पष्ट करून सांगितली आहे. कृत्रिम बुध्दिमत्ता आणि त्यासंबधी इतर बाबींचा भारताला कसा लाभ होऊ शकेल, यासंबंधी नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पातल्या घोषणा आणि त्याचे परिणाम यावर हा लेख आहे.

कृत्रिम बुध्दिमत्ता आणि त्यावर आधारीत इतर तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी आपण 'थ्री इडियट्स' या २००९ मधल्या लोकप्रिय चित्रपटातल्या परमोच्च प्रसंगाचे उदाहरण घेऊ. यातले प्रमुख पात्र रांचो (आमीर खान) हा अभियांत्रिकी शाखेचा विद्यार्थी आहे. एका गरोदर बाईला बाळंतपणाच्या कळा येत असतात. या गंभीर परिस्थितीमध्ये तिची प्रसूती कशी करावी याचे कोणतेही वैद्यकीय प्रशिक्षण त्याला नाही. ग्रामीण भागात किंवा एखाद्या दूरच्या खेडेगावात विशेषत: आदिवासी भागात, जिथे अत्यल्प वैद्यकीय मदत असते तिथे अशी परिस्थिती बऱ्याचदा आढळते. या चित्रपटात अशा वेळी तंत्रज्ञानाच्या मदतीने त्या बाईची सुटका होते. त्या गरोदर बाईची बहीण पिया (करीना कपूर) ही प्रशिक्षित डॉक्टर असते, व्हिडिओ कॉलच्या मदतीने रांचोला सहाय्य करते आणि एका निरोगी बाळाचा जन्म होतो. डिजिटल इंडीया कार्यक्रमाअंतर्गत आर इ सी एल (ग्रामीण विद्युतीकरण) किंवा भारतनेट (ग्रामीण भागातला जलदगती इंटरनेट संपर्क) या प्रमुख सरकारी योजनांमुळे दूरच्या खेडेगावातसुध्दा आता असे दूरस्थ वैद्यकीय उपचार शक्य झाले आहेत.

चित्रपटाच्या या प्रसंगामध्ये प्रसूतीच्या संपूर्ण काळात रांचोला सहाय्य करण्यासाठी पिया (प्रशिक्षित डॉक्टर) उपलब्ध असते. ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या प्रत्येक परिचारिकेमागे एक प्रशिक्षित डॉक्टर (प्रतिनिधी डॉक्टर) असण्याची गरज आहे. प्रत्यक्षात मात्र भारतातल्या सर्व खेडेगावांमध्ये अशी व्यवस्था करणे अडचणीचे आहे. कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत सल्ला देणारी यंत्रणा अशावेळी कामी येऊ शकते. कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत सल्ला देणारी यंत्रणा परिचारिकेला निदान करण्याच्या कामी तसेच त्यानुसार पुढचे पाऊल उचलण्यासाठी मदत करू शकते. हे रुग्णांच्या अनेक सामान्य आजारांमध्ये शक्य होऊ शकते. आधीच्या रूग्णांना झालेल्या आजाराची लक्षणे आणि तशाच लक्षणात आणि निदानात डॉक्टरांनी दिलेली औषधे याबाबत माहिती साठवली तर अशा पूर्वीच्या माहितीच्या प्रचंड साठ्यावरून कृत्रिम बुध्दिमत्ता यंत्रणा शिकू शकते. कृत्रिम बुध्दिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापरामुळे ज्ञान आणि कृतिशील बुध्दिमत्तेत वाढ करून नागरिकांना सक्षम करता येईल. या उदाहरणामध्ये ग्रामीण आरोग्य केंद्रामधल्या परिचारिकेला कृत्रिम बुध्दिमत्तेमुळे सक्षम करणे हा कृत्रिम बुध्दिमत्तेचा प्रभावी वापर आहे.

**कृत्रिम बुध्दिमत्तेचा इतिहास –**

साधारण १९५० च्या मध्यापासून कृत्रिम बुध्दिमत्ता हा संगणक शास्त्रातला एक महत्त्वाचा संशोधनपर विषय आहे. १९५८ मध्ये आर्टिफिशियल न्यूरल नेटवर्क (एएनएन्) या संस्थेने परसेप्ट्रॉन अल्गॉरिदम, या पध्दतीचा शोध लावून कृत्रिम बुध्दिमत्ता या विषयाचा पाया रचला. साधारण याच काळात ॲलन टूरींग यानी एक प्रबंध प्रकाशित केला. याचे शिर्षक होते ‘कॉम्प्युटिंग मशिनरी ॲण्ड इंटेलिजन्स’ (यंत्र आणि बुध्दिमत्ता यांची गणना). मानवी बुध्दिमत्ता आणि वर्तणूक याची हुबेहुब नक्कल करू शकेल असे यंत्र तयार करण्याचा उद्देश यामागे होता. मानवी तर्क, निष्कर्ष, भाषा, आकलन, प्रतिक्रिया आणि संवाद या मानवी बुध्दिमत्तेच्या विविध गुणांशी जुळणारे यंत्र विकसित करायचे असे संशोधकांचे खूप पूर्वीपासून ध्येय होते. संशोधक तसेच विज्ञानावर आधारित चित्रपट तयार करणाऱ्या निर्मात्यांच्या मनात अशा प्रकारच्या बुध्दिमान यंत्राची कल्पना सर्वप्रथम आली. १९९६-९७ मध्ये नामांकित बुध्दिबळपटू गॅरी कास्पारोव्ह याला आय् बी एम् च्या ‘डीप ब्लू’ कॉम्प्युटरने बुध्दिबळात हरवले. हे मोठे यश होते. ‘डीप ब्लू’ यंत्राने साध्य केलेले कार्य बऱ्यापैकी तर्कशुध्द प्रकारात बसणारे होते आणि त्यामध्ये दृष्टि किंवा भाषा अशा मानवी भावनांशी निगडीत आकलनशक्तीचा अंतर्भाव नव्हता.

**ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या प्रत्येक परिचारिकेमागे एक प्रशिक्षित डॉक्टर (प्रतिनिधी डॉक्टर) असण्याची गरज आहे. प्रत्यक्षात मात्र भारतातल्या सर्व खेडेगावांमध्ये अशी व्यवस्था करणे अडचणीचे आहे. कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत सल्ला देणारी यंत्रणा अशावेळी कामी येऊ शकते. कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत सल्ला देणारी यंत्रणा परिचारिकेला निदान करण्याच्या कामी तसेच त्यानुसार पुढचे पाऊल उचलण्यासाठी मदत करू शकते. हे रुग्णांच्या अनेक सामान्य आजारांमध्ये शक्य होऊ शकते.**

गेल्या काही दशकांनी डिजिटल तंत्रज्ञानात झालेले मोठे बदल पाहिले. प्रचंड माहितीचे पाठबळ असलेल्या कृत्रिम बुध्दिमत्तेचे महत्त्व यामुळे पुन्हा अधोरेखित झाले आहे. साधारण १९६०-७० च्या दशकाने जागतिक डिजिटायझेशनचा मोठा टप्पा बघितला. बँकींग, विमा यापासून ते किरकोळ व्यवसायापर्यंत सगळ्या व्यवसायांचे स्वरूप कागदाच्या वापराकडून इलेक्ट्रॉनिक पध्दतीच्या वापराकडे वळले. संगणकीय शक्ती आणि संकलित माहितीचा साठा मोठ्या प्रमाणात आणि रास्त दरात उपलब्ध होण्याची गरज निर्माण झाली. यामुळे ‘बिग डेटा’ ही संकल्पना विकसित झाली. यामुळे माहितीच्या प्रचंड साठ्यावर प्रक्रिया आणि विश्लेषण करता येऊ लागले. बिग डेटा, संगणकाचा प्रचंड प्रमाणात वापर आणि कमी खर्चात माहितीची साठवणूक यामुळे कृत्रिम बुध्दिमत्तेच्या क्षेत्राचे पुनरुज्जीवन झाले.

डीप लर्निंग अल्गॉरिदमच्या शोधामुळे कृत्रिम बुध्दिमत्तेचा नव्याने उदय झाला असे काही जणांचे मत आहे. १९६५ मध्ये ‘डीप लर्निंग’अल्गॉरिदमच्या निरिक्षणाखाली मल्टीलेयर आर्टिफिशियल न्यूरॉन नेटवर्क्स चा (ए.एन्.एन्.एस् )शोध लागला. त्याकाळात प्रचंड प्रमाणात असलेल्या या कृत्रिम बुध्दिमत्ता यंत्रणेला प्रशिक्षण देण्यासाठी तितकीच प्रचंड प्रमाणावर गणना यंत्रणा किंवा गिगाबाईट आणि टेराबाईट आकाराची माहिती उपलब्ध नव्हती. मानवी संभाषण समजून घेऊन त्याला योग्य प्रतिसादाची रचना करण्याच्या

मानवी भाषेच्या अंगांना सादर करणे हे अत्यंत जटील काम मानले जात होते. आय् बी एम् ची प्रश्नांना उत्तरे देणारी यंत्रणा, म्हणजेच 'वॉटसन' ने, 'जिओपार्डी!' हा खेळ खेळणाऱ्या दोन बलाढ्य खेळाडूंना २०११ मध्ये हरवले. 'जिओपार्डी!' हा अमेरीकी दूरचित्रवाणीवर दाखवण्यात येणारा एक वेगळाच खेळाचा कार्यक्रम आहे. यामध्ये खेळाडूंना आधी उत्तरे देण्यात येतात आणि काही संकेत सांगितले जातात, त्याआधारे खेळाडूंना प्रश्न तयार करायचे असतात. मानवाचे आणखी एक गुंतागुंतीचे काम हे दृष्टीवर आधारीत असते. वस्तू पाहिल्यावर मग त्यांना ओळखले जाते आणि आकलन होते. कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत यंत्रणेने २०१२ मध्ये इमेजनेट ने आयोजित केलेली प्रतिमेचे वर्गीकरण करण्यावर आधारीत स्पर्धा खूप मोठ्या फरकाने जिंकली होती. कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत यंत्रणांच्या कामगिरीची मानवी कामगिरीशी तुलना करून 'एआय् इंडेक्स' हे परिमाण स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने तयार केले आहे. भाषा ओळखणे/आकलन करणे आणि वस्तू आणि त्यांच्या प्रतिमा ओळखणे या कसोट्यांबाबत कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत सर्वोत्तम यंत्रणांची कामगिरी, मानवी कामगिरीशी बरोबरी करेल अशी ठरली आहे.

## कृत्रिम बुध्दिमत्तेचा उपयोग भारताला कसा होऊ शकतो ?

आता हेच आरोग्यसेवचे उदाहरण घेऊ. भारतात दर हजार माणसांमागे डॉक्टरांचे प्रमाण एक टक्क्यापेक्षा कमी (०.७२५) आहे. आणि दर हजार माणसांमागे तज्ञ डॉक्टरांचे प्रमाण त्याहूनही कमी आहे. तसेच नवीन डॉक्टर्स आणि तज्ञ डॉक्टरांचे ग्रामीण भागात काम करण्याचे प्रमाण बघता नजीकच्या भविष्यात या परिस्थितीत सुधारणा होण्याची शक्यता नाही. त्यामुळे ग्रामीण आरोग्यकेंद्रासाठी डॉक्टर उपलब्ध होत नसून केवळ परिचारिकाच ही केंद्रे चालवत आहेत. आदिवासी भागात तसेच दूरच्या खेडेगावात तर ही परिस्थिती आणखी बिकट आहे.

**साधारण १९६०-७० च्या दशकाने जागतिक डिजिटायझेशनचा मोठा टप्पा बघितला. बँकींग, विमा यापासून ते किरकोळ व्यवसायापर्यंत सगळ्या व्यवसायांचे स्वरूप कागदाच्या वापराकडून इलेक्ट्रॉनिक पध्दतीच्या वापराकडे वळले. संगणकीय शक्ती आणि संकलित माहितीचा साठा मोठ्या प्रमाणात आणि रास्त दरात उपलब्ध होण्याची गरज निर्माण झाली. यामुळे 'बिग डेटा' ही संकल्पना विकसित झाली. यामुळे माहितीच्या प्रचंड साठ्यावर प्रक्रिया आणि विश्लेषण करता येऊ लागले. बिग डेटा, संगणकाचा प्रचंड प्रमाणात वापर आणि कमी खर्चात माहितीची साठवणूक यामुळे कृत्रिम बुध्दिमत्तेच्या क्षेत्राचे पुनरुज्जीवन झाले.**

रेडीओलॉजिस्ट किंवा पॅथोलॉजिस्ट्स यासारख्या चिकित्साविषयक तज्ञांची कमतरता अधिक तीव्र आहे. प्रतिमा बघून रुग्णाला विशिष्ट आजार झाला आहे का याची खात्री करण्यात या व्यावसायिकांचा बराच वेळ जातो. आपण आताच पाहिले की प्रतिमा ओळखण्यात कृत्रिम बुध्दिमत्ता यंत्रणांनी अतिशय प्रभावी कामगिरी केली आहे. कृत्रिम बुध्दिमत्ता यंत्रणेतली प्रचंड माहिती अशा वेळी वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या कामी येऊ शकते. प्रतिमा पाहून साठवलेल्या माहितीच्या आधारे कृत्रिम बुध्दिमत्ता यंत्रणा उपचाराविषयी शिफारस करू शकतात आणि रेडीओलॉजिस्ट किंवा पॅथोलॉजिस्ट्सचा वेळ वाचवू शकतात. यामुळे वैद्यकीय तज्ञ त्यांचा वेळ जास्त गुंतागुंतीच्या प्रकरणांना देऊ शकतात. अशातऱ्हेने वैद्यकीय तज्ञ अधिक सक्षम होतील.

रुग्णाची सेवा करतानाच एकीकडे परिचारिका रूग्णाची महत्त्वाची लक्षणे आणि तपासण्या केल्यानंतरचे परिणाम याची हातातल्या कृत्रिम बुध्दिमत्ता यंत्रात नोंद करू शकतात. ही लक्षणे आणि नोंदी पाहून कृत्रिम बुध्दिमत्ता यंत्र रुग्णाचे निदान करेल आणि योग्य त्या उपचारांची शिफारस करेल. या औषधयोजनेचे सविस्तर स्पष्टीकरणही देता येऊ शकेल. अशा परिस्थितीत अनुभवी डॉक्टरांनी ज्याप्रमाणे उपचार सांगितले असते तसे उपचार परिचारिका देऊ शकेल. सध्याच्या रुग्णाच्या अवस्थेत जर हे उपचार उपयोगी ठरणार नाहीत असे परिचारिकेला वाटले तर ती शिफारशींना नाकारू शकते. हा पर्यायही आहे. यंत्राने सुचविलेल्या शिफारशी जेव्हा दिसत असतात तेव्हा यंत्रात मागच्या बाजूला बिग डेटा वर आधारित आर्टिफिशियल इंटेलिजन्स अल्गॉरिदम च्या सहाय्याने यापूर्वीच्या अनेक निनावी रुग्णांच्या आजारांची लक्षणे आणि त्यांना दिलेले उपचार याबद्दलच्या प्रचंड माहितीचे विश्लेषण करून, त्याच्याशी आत्ताच्या रुग्णाची माहिती जुळवून घेण्याचे काम चालू असते. भारतात आरोग्य क्षेत्रात कुशल

लोकांची कमतरता असून कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत तंत्रज्ञानाने ही पोकळी भरून काढली जाऊ शकते. यामुळे नागरीक जास्त सक्षम होतील आणि दैनंदिन जीवनात उत्पादकतेचे प्रमाण वाढू शकेल.

'विद्युतशक्तीने १०० वर्षांपूर्वी जवळपास सगळ्याच गोष्टी बदलल्या, आज मी खूप विचार केला तरी असा एकही उद्योग मला आढळून येत नाही ज्या ठिकाणी कृत्रिम बुध्दिमत्ता कायापालट करू शकणार नाही', असे प्रसिध्द उद्गार स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर आणि कोर्सेराचे सह संस्थापक ॲण्ड्रयू एन् जी यांनी काढले. ते म्हणाले,'कृत्रीम बुध्दिमत्ता ही नवी विद्युतशक्ती आहे.' भारताच्या बाबतीत कृत्रीम बुध्दिमत्तेचे अमर्याद उपयोग आहेत. प्रलंबीत खटले कमी करण्यासाठी एआय् वर आधारीत यंत्रणेचा न्यायालयात वापर होऊ शकतो. विद्यार्थ्याची गती पाहून त्यानुसार शैक्षणिक साहित्याची निर्मिती करण्यात येऊ शकते. कृषी क्षेत्रात उपग्रहाने प्रक्षेपित केलेल्या प्रतिमांचे कृत्रिम बुध्दिमत्तेच्या सहाय्याने विश्लेषण करून पिकांचा अंदाज घेता येऊ शकतो.

जीवनात परिवर्तन आणणाऱ्या इतर तंत्रज्ञानाप्रमाणेच आजच्या लोकांच्या राहणीमानात आणि काम करण्यात कृत्रिम बुध्दिमत्ता बदल घडवून आणणार आहे. देशभरातल्या बँका आणि इतर संस्थांमध्ये संगणकाच्या वापराला सुरवात झाली तेव्हा असा बदल झाला होता. त्यावेळी संगणकाला खूप विरोधही झाला होता. संगणकामुळे माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडली, त्यामुळे भारताला माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडी घेता आली. भारतामधल्या संस्था जगातल्या सर्वोत्तम माहिती तंत्रज्ञान कंपन्यांबरोबर स्पर्धा करत आहेत. भारत हा सर्वाधिक सॉफ्टवेअर निर्यात करणारा देश झाला आहे. जेव्हा संगणकाने भारतात प्रवेश केला तेव्हा देशात त्याचे कौशल्य असलेले तज्ञ नव्हते पण आता मात्र भारताकडे याक्षेत्रातल्या कुशल व्यावसायिकांची संख्या सर्वात जास्त आहे. त्याचप्रमाणे कृत्रिम बुध्दिमत्तेसारख्या नविन तंत्रज्ञानामुळे रोजगारात आमूलाग्र बदल होईल- नविन कौशल्ये विकसित होतील आणि लोकांना पुन्हा कुशल बनवण्यासाठी सरकारला महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल. उत्पादन क्षेत्रातही स्वयंचलित यंत्रे येतील, त्यामुळे लोक कमी उत्पन्न देणाऱ्या नोकऱ्यांकडून जास्त उत्पन्न देणाऱ्या महत्त्वाच्या कामाकडे वळतील.

**'कृत्रीम बुध्दिमत्ता ही नवी विद्युतशक्ती आहे.' भारताच्या बाबतीत कृत्रीम बुध्दिमत्तेचे अमर्याद उपयोग आहेत. प्रलंबीत खटले कमी करण्यासाठी एआय् वर आधारीत यंत्रणेचा न्यायालयात वापर होऊ शकतो. विद्यार्थ्याची गती पाहून त्यानुसार शैक्षणिक साहित्याची निर्मिती करण्यात येऊ शकते. कृषी क्षेत्रात उपग्रहाने प्रक्षेपित केलेल्या प्रतिमांचे कृत्रिम बुध्दिमत्तेच्या सहाय्याने विश्लेषण करून पिकांचा अंदाज घेता येऊ शकतो.**

कोणत्याही नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केला की त्यामुळे परिस्थिती बदलते आणि या बदलणाऱ्या परिस्थितीचे व्यवस्थापन करण्याच्या कामाचाही स्वीकार करावा लागतो. नवीन तंत्रज्ञान स्वीकारताना, बदलाचे व्यवस्थापन हा खूप महत्त्वाचा घटक आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या यश आणि अपयशामधे पुसट सीमारेषा असते. बदलाच्या व्यवस्थापनाची सुरवात हीच यशापयशातली पुसट सीमारेषा आहे. प्रचंड माहितीच्या साठ्यावर आधारीत कृत्रिम बुध्दिमत्ता यंत्राचा वापर करून ग्रामीण आरोग्य केंद्रातल्या परिचारिकेचे सक्षमीकरण करण्याच्या, याआधीच्या उदाहरणातही बदलणाऱ्या परिस्थितीच्या व्यवस्थापनाच्या कामाचा समावेश होतो. डिजिटल तंत्रज्ञानाशी परिचारिकेला जुळवून घेता आले पाहिजे. त्यामुळेच ती सक्षम होणार असते. यामध्ये थोडे नवीन कौशल्य आत्मसात करावे लागू शकते. तसे न केल्यास नव्या तंत्रज्ञानाला अपयश येऊ शकते. याचा परिणाम म्हणून नोकरी गमावावी लागू शकते. उदाहरणार्थ, परिचारिका ही रुग्णाला तपासण्यात आणि निरिक्षणे नोंदविण्यात तरबेज असली तरी हातातले नवीन उपकरण, त्यातले विविध पर्याय इत्यादी वापरण्याची माहिती तिला नसू शकते. अशा परिस्थितीत, वैद्यकीय क्षेत्रात निष्णात असलेल्या या परिचारिकेला आवश्यक कौशल्यांची जोड देऊन कृत्रिम बुध्दिमत्ता वापरण्यासाठी सक्षम केले पाहिजे.

### कृत्रिम बुध्दिमत्तेबाबत भारतातली परिस्थिती

देशाच्या नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पात याविषयी केलेली घोषणा: 'जागतिक अर्थव्यवस्थेचे आता डिजिटल अर्थव्यवस्थेत रुपांतर होत आहे. यासाठी डिजिटल विश्वातल्या मशीन लर्निंग, कृत्रिम बुध्दिमत्ता, इंटरनेटवरच्या विविध गोष्टी, थ्री डी प्रिंटींग आणि यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे आभार. 'डिजिटल इंडिया',

'स्टार्ट अप इंडिया' आणि 'मेक इन इंडिया' सारख्या उपक्रमात पुढाकार घेतल्यामुळे डिजिटल आणि ज्ञानावर आधारीत समाज म्हणून प्रस्थापित व्हायला भारताला मदत होईल. निती आयोग कृत्रिम बुध्दिमत्तेच्या क्षेत्रात राष्ट्रीय कार्यक्रम सुरू करेल. या कार्यक्रमात कृत्रिम बुध्दिमत्तेच्या वापराबाबत संशोधन आणि विकास करण्याचाही समावेश असेल.'

आज राष्ट्राच्या विकासासाठी तसेच आर्थिक वाढ वेगाने होण्यासाठी महत्त्वाचे तंत्रज्ञान म्हणून कृत्रिम बुध्दिमत्तेकडे बघितले जात आहे. काही देशांनी याआधीच आपल्या विकासाला चालना देण्यासाठी कृत्रिम बुध्दिमत्तेच्या क्षेत्रासाठी धोरणे आखली आहेत. कृत्रिम बुध्दिमत्तेचा परिणाम देशांच्या सीमा ओलांडून खाजगी आणि सरकारी या दोन्ही क्षेत्रांमध्ये दिसून येऊ शकतो. सध्या भारत माहिती तंत्रज्ञान सेवा क्षेत्रात आणि कृत्रिम बुध्दिमत्ता / बिग डेटा या क्षेत्रांशी निगडीत सेवांमध्ये आघाडीच्या स्थानावर असून देखिल कृत्रिम बुध्दिमत्ता क्षेत्रात भारताच्या नेतृत्वाचा विचार होत नाही. कृत्रिम बुध्दिमत्तेतल्या संशोधनाची, तसेच प्रयोगशाळेतल्या, शिक्षण संस्थांमधल्या, स्टार्ट अप तसेच खाजगी पातळीवरच्या प्राथमिक अवस्थेतल्या संशोधनाची अनेक उत्कृष्ट उदाहरणे आपल्याला दिसून येतात. आपल्याला हे ही लक्षात घेतले पाहिजे की अनेक व्यावसायिकांना कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर करण्यासाठी आवश्यक त्या तंत्रज्ञानाची थोडीफार माहिती आहे. कृत्रिम बुध्दिमत्तेचा अवलंब करण्यामध्ये एक मोठा अडथळा म्हणजे या व्यावसायिकांमध्ये एकमेकांसोबत दिर्घकाळ सहकार्य देण्याचा अभाव दिसून येतो. जागतिक स्तरावर कृत्रिम बुध्दिमत्तेच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व सिध्द करण्यासाठी आवश्यक असणारे महत्त्वाचे घटक कोणते आहेत?

ॲक्सेंच्युअर यांच्या संशोधनानुसार विद्यापीठे, स्टार्ट अप कार्यक्रम, मोठ्या कंपन्या, धोरणकर्ते तसेच अनेक-भागधारक असलेल्या भागीदार कंपन्या, हे सर्व भारतामध्ये या क्षेत्रात अशा प्रकारचे संशोधन विकसित करण्यासाठी आधारस्तंभाप्रमाणे आहेत. भारतातील विद्यापीठे आणि संशोधन प्रयोगशाळा गेली ४० वर्षे कृत्रिम बुध्दिमत्तेच्या क्षेत्रात संशोधन करत आहेत. जगातल्या काही सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान कंपन्या भारतात असून सर्व बहुराष्ट्रीय कंपन्यांची संशोधन आणि विकास केंद्रे यापूर्वीच भारतात स्थापन झालेली आहेत. भारतात भांडवल निधी उद्योग मोठ्या प्रमाणावर असल्याने स्टार्ट अप अर्थव्यवस्थेसाठी उत्साही वातावरण आहे. देशात स्टार्ट अप उद्योगांना सरकारही चांगला पाठिंबा देत आहे. नाविन्यपूर्ण अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी याबाबत धोरण ठरवणाऱ्या निती आयोगानेही कंबर कसली आहे. अटल इनोव्हेशन मिशन या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना संशोधनासाठी शाळांमध्ये प्रयोगशाळा उभारायला प्रोत्साहन देण्यात येते आणि स्टार्ट-अप साठी मदत करण्यात येते. स्टार्ट-अप आणि भांडवल निधी उद्योग यांच्यात बऱ्यापैकी भागीदारी आहे पण त्याबाबतची माहिती विस्कळीत आहे.

**संगणकामुळे माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडली, त्यामुळे भारताला माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडी घेता आली. भारतामधल्या संस्था जगातल्या सर्वोत्तम माहिती तंत्रज्ञान कंपन्यांबरोबर स्पर्धा करत आहेत. भारत हा सर्वाधिक सॉफ्टवेअर निर्यात करणारा देश झाला आहे. जेव्हा संगणकाने भारतात प्रवेश केला तेव्हा देशात त्याचे कौशल्य असलेले तज्ञ नव्हते पण आता मात्र भारताकडे या क्षेत्रातल्या कुशल व्यावसायिकांची संख्या सर्वात जास्त आहे. त्याचप्रमाणे कृत्रिम बुध्दिमत्तेसारख्या नविन तंत्रज्ञानामुळे रोजगारात आमूलाग्र बदल होईल**

कंपन्यांच्या भागीदारीतून आणि सहयोगातून भारतातील कृत्रिम बुध्दिमत्तेसाठीचे वातावरण अतिषय पोषक होऊ शकते. स्टार्ट-अप कंपन्या कृत्रिम बुध्दिमत्तेसाठी नवनवीन उपाय विकसित करण्याच्या कामी उत्साहवर्धक आणि लवचिक दृष्टीकोन ठेवतात पण बहुतेक वेळा त्यांच्याकडे सखोल संशोधन करण्यासाठी पुरेशी साधनसंपत्ती नसते. अशाठिकाणी याच क्षेत्रातल्या संशोधकांशी जर त्यांना संपर्क करण्याची सोय झाली तर ते खरोखरी सहाय्यक ठरेल. विविध पातळ्यांवर अशी भागीदारी स्थापन करण्यात सरकारला मुख्य भूमिका घ्यावी लागेल. शैक्षणिक संस्था/संशोधक यांच्यासोबत उद्योग आणि स्टार्ट-ॲपची भागीदारी घडवून आणली तर संशोधनाचा उपयोग करून कृत्रिम बुध्दिमत्तेला पाठबळ देता येईल. याचप्रकारे उद्योग आणि शैक्षणिक संस्थांनी हातमिळवणी केली तर अनेक क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमत्तेला वाव मिळेल. आरोग्य, कृषी, शिक्षण, इत्यादी अनेक क्षेत्रात अशी भागीदारी


**भारतातील विद्यापीठे आणि संशोधन प्रयोगशाळा गेली ४० वर्षे कृत्रिम बुध्दिमत्तेच्या क्षेत्रात संशोधन करत आहेत. जगातल्या काही सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान कंपन्या भारतात असून सर्व बहुराष्ट्रीय कंपन्यांची संशोधन आणि विकास केंद्रे यापूर्वीच भारतात स्थापन झालेली आहेत. भारतात भांडवल निधी उद्योग मोठ्या प्रमाणावर असल्याने स्टार्ट अप अर्थव्यवस्थेसाठी उत्साही वातावरण आहे. देशात स्टार्ट अप उद्योगांना सरकारही चांगला पाठिंबा देत आहे. नाविन्यपूर्ण अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी याबाबत धोरण ठरवणाऱ्या निती आयोगानेही कंबर कसली आहे.**

करता येईल. भांडवली गुंतवणूक उद्योग आणि व्यापार मंडळांचा, उद्योग जगताशी संपर्क साधला तर कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत तंत्रज्ञानाला सेवा, ॲप्लिकेशन किंवा एंबेडेड हार्डवेअर म्हणून पुरस्कृत करता येईल.

येत्या काही दशकात भारताच्या विकासाला चालना देण्याची शक्ती कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत तंत्रज्ञानात आहे. या विकासाला प्राथमिक पातळीवर खाजगी कंपन्या चालना देतील आणि विविध क्षेत्रात भागीदारी वाढवण्याच्या कामी सरकार महत्त्वाची भूमिका बजावेल. या बदल घडवणाऱ्या तंत्रज्ञानामुळे अनेक नवीन रोजगार निर्माण होतील आणि सध्याच्या काही रोजगारांची जागा घेतील. त्यामुळे लोकांना कौशल्याचे पुन्हा प्रशिक्षण देण्याच्या कामी लक्ष दिले पाहिजे. कृत्रिम बुध्दिमत्तेच्या क्रांतीचा लाभ मिळण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत निर्णायक ठरेल.

■■■

*लेखक निती आयोगाच्या माहिती विश्लेषण कक्षाचे विशेष कार्य अधिकारी असून कृत्रिम बुद्धमत्ता या विषयातील तज्ञ आहेत.*
*email : avik.sarkar@gov.in*




## India 2018/भारत २०१८

भारत सरकारच्या प्रकाशन विभागाच्या वतीने हिंदी आणि इंग्रजी भाषेत दरवर्षी प्रकाशित केली जाणारी संदर्भ पुस्तिका India 2018/भारत २०१८ विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रकाशन विभागाच्या सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयात हे बहुप्रतीक्षित प्रकाशन विक्रीसाठी ठेवण्यात आले असून त्याची किरकोळ विक्री किंमत रु.३५० इतकी आहे. एकाच वेळी तीन किंवा जास्त पुस्तिका खरेदी करणाऱ्यांना आकर्षक सवलत दिली जाणार आहे. किमतीएवढ्या रकमेचा डीडी अथवा मनी ऑर्डर 'Business Manager, Publications Division, Mumbai' च्या नावे पाठविल्यास पुस्तिका रजिस्टर पोस्टाने घरपोच पाठविल्या जातील. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा- Business Manager, Sales Emporium, Publications Division, 701, 'C' Wing, 7th Floor, Kendriya Sadan, Sector 10, CBD Belapur, Navi Mumbai-400614. Ph.No. 022-27570686, Email: dpdsenavimumbai@gmail.com


New Arrivals
BOOK YOUR COPY NOW
Visit our
Book Gallery
at
Soochna Bhawan,
CGO Complex
Lodhi Road,
New Delhi-110003
HISTORY OF THE FREEDOM MOVEMENT IN INDIA
भारतीय संविधान और आम आदमी
सुभाष काश्यप
HOMAGE TO MAHATMA GANDHI
HISTORY OF INDIAN JOURNALISM
INDIAN TRIBES THROUGH THE AGES
R.C. VERMA
indian Dance THROUGH A CRITIC'S EYE
Leela Venkataraman
INDIAN COSTUMES
A. BISWAS
EVERYDAY ELECTRICITY
G. SREENIVASAN
भवभूति के नाटक
भास के नाटक
कालिदास के नाटक
To buy online visit: www.bharatkosh.gov.in
For placing orders, please contact: Ph : 011-24367260, 24365609, e-mail: businesswng@gmail.com
Publications Division
Ministry of Information & Broadcasting, Government of India
Soochna Bhawan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi-110003
website: www.publicationsdivision.nic.in
@ DPD_India
www.facebook.com/publicationsdivision
www.facebook.com/yojanaJournal

# UPSC Foundation
## Batch 2018-19

**Prelim + Mains + Interview**

Batch Starts **3 July 2018**

Time : 8 to 10 am

Introductory Lecture

4th June 2018 | @ 5:00pm

# MPSC Foundation
## Batch 2018-19

**Prelim + Mains + Interview**

Batch Starts

**2 July 2018**

Time : 4-8pm

Batch Duration **11 Months**

Admission Starts **First Week of June**

Bhagirath IAS Academy

UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
**Ph.: 020-65233450 | 7378406920**
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197**
**Web:**www.bhagirathacademy.co.in
**E-mail:** bhagirathacademypune@gmail.com
**Facebook:** Bhagirath IAS Academy

**Yojana Marathi** (Monthly) **April, 2018**

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18

Published Date: 12th **April,** 2018
Date of Posting : 16th **April,** 2018




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.